नोव्हेंबर २०१२ । किंमत : ₹ १०

# लोकराज्य

## सर्वांगीण प्रगतीची तीन वर्षे



RABHA

# शुभ दीपावली

ही दिवाळी आणि नूतन वर्ष आमच्या
साऱ्या रसिक वाचकांना, लेखकांना,
वर्गणीदारांना, हितचिंतकांना सुखसमृद्धीचे
आणि भरभराटीचे जावो!
महाराष्ट्राची देशातील आघाडी सदैव
टिकून रहावी यासाठी
कटिबद्ध होऊया !!

– लोकराज्य परिवार





वर्ष ६४ वे | अंक ८ | नोव्हेंबर २०१२

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

| | |
|---|---|
| मुख्य संपादक | प्रमोद त्र्यं. नलावडे |
| व्यवस्थापकीय संपादक | प्रल्हाद जाधव |
| संपादक | सुरेश वांदिले |
| कार्यकारी संपादक | प्रभाकर मुराळकर |
| उपसंपादक | किरण केंद्रे |
| प्रशासन व वितरण अधिकारी | दिगंबर पालवे |
| वितरण अधिकारी | विलास बोडके<br>दत्तात्रय कोकरे |
| साहाय्य | विद्या कदम |
| मुखपृष्ठ | राभा |
| मांडणी, सजावट | संदीप पवार |
| मुद्रण | एच. टी. मीडिया लि.<br>दिघे, नवी मुंबई |

'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...

वार्षिक वर्गणी - वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/-) लेखांमधील आकडेवारीसाठी आणि मजकुराच्या अचूकतेसाठी कृपया मूळ संदर्भ पाहावेत.

संपर्क : संपादकीय ०२२-२२८८२८८८, वर्गणीदार व तक्रार निवारणासाठी - ०२२-२२०२१५३०
वितरण संपर्क - ०२२-२२०२३९५७

e-mail : lokrajya2011@gmail.com
Website : http://dgipr.maharashtra.gov.in

# अंतरंग



## पारदर्शक आणि गतिमान

आघाडी शासनाच्या मागील तीन वर्षांत कृषी, शिक्षण, आरोग्य उद्योग, पायाभूत सुविधा, दळणवळण, परदेशी गुंतवणूक इ. सर्वच क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राने मोठी झेप घेतली आहे. या कालावधीत राज्याने उत्तम पायाभूत सुविधा निर्माण केल्याने देशात सर्वाधिक गुंतवणूकदार महाराष्ट्रात आकर्षित झाले आहेत. ऊर्जा निर्मितीला प्राधान्य आणि ऊर्जा वितरणाचे सुयोग्य व्यवस्थापन यामुळे महाराष्ट्रात भारनियमनमुक्ती दृष्टिक्षेपात आली आहे. पारदर्शक आणि गतिमान कारभार करण्यात यश मिळाले आहे. महाराष्ट्राचा विविध क्षेत्रांतला पहिला क्रमांक कायम ठेवणारे अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. या सर्व बाबींचा विस्तृत आढावा मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी घेतला आहे........ ५


## याशिवाय

| | |
|---|---|
| मराठीसाठी सारे काही.......... | १४ |
| सर्वाधिक विशाल उद्योग महाराष्ट्रात.......... | १७ |
| विकासाचा महामार्ग.......... | १८ |
| हायटेक पोलीस दल.......... | २० |
| जलाशयातील पाणी पिण्यासाठी राखीव (मदत आणि पुनर्वसन)..... | २२ |
| लोकसंख्येच्या प्रमाणात निधी (सामाजिक न्याय) .......... | २३ |
| दर्जेदार बियाणे आणि खत पुरवठ्याला प्राधान्य (कृषी).......... | २५ |
| ग्रामीण भारताचा आयकॉन (ग्रामविकास).......... | २७ |
| सामर्थ्य सहकाराचे.......... | २९ |
| नवी ऊर्जा नवे प्रकल्प (अपारंपरिक ऊर्जा).......... | ३० |
| पारदर्शक आणि हायटेक (महसूल).......... | ३१ |
| गावागावात स्वच्छ पाणी (पाणीपुरवठा).......... | ३२ |
| पारदर्शक धान्य वितरण.......... | ३३ |
| रस्ते चौपदरीकरण आणि उड्डाणपुले .......... | ३४ |
| गुटखा हद्दपार.......... | ३५ |
| वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा वाढला.......... | ३६ |
| सिंचनाचा भक्कम आधार (जलसंपदा).......... | ३७ |
| 'कृष्णा'ने गतिमान केले प्रगतीचे चक्र... (कृष्णा खोरे).......... | ३८ |
| आदिवासींचा सर्वांगीण विकास.......... | ४० |
| तंत्रशिक्षणात सुधारणा (उच्च व तंत्रशिक्षण).......... | ४२ |
| शैक्षणिक क्षेत्राला नवा जागतिक चेहरा (शालेय शिक्षण) .......... | ४४ |
| ४० हजार कोटींची गुंतवणूक (वस्त्रोद्योग).......... | ४५ |
| जीवनदायी-देशात आघाडी (सार्वजनिक आरोग्य).......... | ४७ |
| कामगारांच्या कल्याणासाठी.......... | ४८ |
| रोहयोचा कायापालट.......... | ४९ |
| पायाभूत सुविधांचे बळकटीकरण (पशूसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय). | ५१ |
| देशातील पहिले युवा व क्रीडा धोरण.......... | ५२ |
| कुपोषण : ३५ वरून १५ टक्क्यांवर (महिला व बालविकास).......... | ५३ |
| पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकास.......... | ५४ |
| अधिक तपशिलात.......... | ५५ ते ६२ |



मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनविण्यासाठी करण्यात आलेल्या विविध विकास योजनांचा सर्वंकष आढावा.
वर्ल्ड क्लास मुंबई ६४

# सर्वांगीण प्रगतीचा कालखंड



**आ**नंद, सौख्य, समाधान अन् तेजाची उधळण करीत या महिन्यात दिवाळीचे आगमन होत आहे. परस्परातील स्नेहसंबंध सुदृढ करण्यासाठी तसेच द्वेष, ईर्षा, असूया दूर करून आयुष्य सुखकारक आणि प्रकाशमान करण्याची प्रेरणा देणारा हा सण देशभरातील आबालवृद्धांना आनंद देऊन जातो. या महिन्यातच गुरू नानक यांची जयंती साजरी होत आहे. माणसाने आपले चारित्र्य, आचरण आणि वाणी शुद्ध व पवित्र ठेवली तर सारी दु:खे दूर होतील; आपले जीवन सुखमय होईल अशी त्यांची साधी सोपी शिकवण होती. ही शिकवण आजही तितकीच महत्त्वाची आहे.

जागतिक मंदीचे सावट असतानाही मागील तीन वर्षांत राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर सरासरी ९ टक्के राहिला. सर्वाधिक विशाल उद्योग व गुंतवणूक महाराष्ट्रात आली. शेतीचे उत्पन्न आणि उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या शिवारापर्यंत पोहोचविण्यात आले. शेतकऱ्यांना मोबाईल ग्रुप सिमकार्डांचे वितरण करण्यात आले. याचा लाभ ७ लाख शेतकऱ्यांना झाला.

विकासाला मानवी चेहरा असल्यास त्याचे लाभ समाजातील सर्वच घटकांना सुयोग्यरीत्या मिळू शकतात. हे लक्षात घेऊन दुर्बल घटकांची आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक प्रगती व्हावी यावर विशेष भर दिला गेला. आदिवासी विद्यार्थ्यांची शाळेतील गळती थांबावी यासाठी १० लाख विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येत आहे. आदिवासी युवक-युवतींना स्वयंरोजगारासाठी सहाय्यभूत ठरतील असे कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. सामाजिक न्याय विभागाने ऑनलाईन जातपडताळणी, व्यसनमुक्ती धोरण, अपंगाना कर्ज सवलत, स्वतंत्र घरकूल योजना, दलित वस्ती सुधारणा योजनेच्या निधीत वाढ, तालुका स्तरावर १०० वसतिगृहे अशी विविध कामे केली आहेत. ई-शिष्यवृत्ती योजनेंतर्गत १५ लाख विद्यार्थ्यांची बँक खाती उघडण्यात आली. त्यामध्ये १८०० कोटी रुपये जमा करण्यात आले. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी पात्रता ठरवण्याकरिता पालकांच्या उत्पन्नात वाढ करण्यात आली. अधिकाधिक अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख तांत्रिक शिक्षण सुलभपणे मिळावे म्हणून ४४ औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि अल्पसंख्याक बहुल क्षेत्रातील १२ तंत्रनिकेतनांमध्ये दुसऱ्या पाळीतील वर्ग सुरू केले गेले.

गेल्या दोन वर्षांत महाराष्ट्राच्या प्रशासकीय कार्यशैलीत नावीन्यपूर्ण बदल घडले. पारदर्शकतेवर विशेष भर दिला गेला. महाराष्ट्राचे प्रथम क्रमांकाचे स्थान आणखी बळकट होईल असे धोरणात्मक निर्णय घेतले गेले. ई-गव्हर्नन्सवर भर देण्यात आला. नागरिकांना विविध सेवा ते राहत असलेल्या गावामध्ये एकाच ठिकाणी मिळाव्यात यासाठी ११ हजार ८१८ महा-ई-सेवा केंद्रे स्थापन करण्यात आली.

राज्यातील २७ हजार ८९१ ग्रामपंचायतींपैकी २७ हजार ८४० ग्रामपंचायती ऑनलाईन झाल्या आहेत. २५ हजार ग्रामपंचायती ग्रामसेवा केंद्र म्हणून काम बघत आहेत. १३ प्रकारचे शासकीय दाखले या केंद्रांमधून देण्यात येतात.

महाराष्ट्रातील मुले जागतिक स्पर्धेला सक्षमरीत्या सामोरे जाऊ शकतील यासाठी शालेय शिक्षण विभागाने राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा तयार केला. उच्च तंत्रशिक्षणाच्या क्षेत्रात अधिकाधिक संशोधनाला प्रोत्साहन देण्यावर भर देण्यात येत आहे. सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि शासकीय रुग्णालये यांचे संगणकीकरण प्राधान्याने करण्यात येत आहे.

स्त्रीभ्रूणहत्येस आळा घालण्यासाठी सोनोग्राफी केंद्र व गर्भपात केंद्र यांच्या तपासणीची धडक मोहीम राबविण्यात येत आहे. ७८४१ सोनोग्राफी केंद्रांची तपासणी करण्यात येऊन ३५२ यंत्रे बंद करण्याची कार्यवाही करण्यात आली.

जलस्वराज्य योजनेमुळे ३ हजार गावे टँकरमुक्त झाली. शिवकालीन पाणी साठवण योजनेमुळे १५०० गावे टँकरमुक्त झाली. तरुण पिढीच्या आरोग्यावर विपरीत परिणाम करणाऱ्या गुटख्यावर बंदी टाकण्यात आली.

राज्याची सुरक्षा व्यवस्था हायटेक करण्यात येऊन अत्याधुनिक शस्त्रे व यंत्रसामग्री पोलीस दलाला उपलब्ध करून देण्यात आली. ४० हजार कोटी गुंतवणूक अपेक्षित असलेले व ११ लाखांहून अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याची क्षमता असलेले नवे वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले गेले. युवकांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला उपयुक्त ठरणारे युवा व क्रीडा धोरण जाहीर केले गेले. हे देशातील पहिले युवा व क्रीडा धोरण आहे.

राज्याच्या विकास प्रक्रियेत महसूल यंत्रणेचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेता या यंत्रणेमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्यास प्रारंभ झाला. सातबारांचे मोठ्या प्रमाणावर संगणकीकरण केले गेले.

बृहन्मुंबईतील बंद अथवा आजारी असलेल्या ५८ गिरण्यांपैकी १८ गिरण्यांच्या जमिनीवर तयार झालेल्या ६९२५ घरांचे वाटप गिरणी कामगारांच्या वारसदारास सुरू झाले आहे. जुन्या चाळींचा पुनर्विकास करताना पुनर्विकास केलेल्या सदनिकांचे क्षेत्रफळ २२५ चौरस फुटांवरून ३०० चौ. फूट करण्यात आले.

महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) विधेयक २०१२ मंजूर करण्यात आले. असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य होय. यामध्ये ग्राहकांच्या हिताला प्राधान्य देणाऱ्या आणि विकासकांवर कठोर कारवाई करणाऱ्या तरतुदी आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. लोकसहभागाने कुपोषणमुक्त ग्राम अभियान यशस्वीपणे राबवण्यात आले. मुंबई शहराला जागतिक दर्जाचे शहर बनविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांना गती मिळाली.

महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचा आलेख दर्शवणाऱ्या लेखांचा या अंकात समावेश करण्यात आला आहे. हा अंकही आपणास आमच्या इतर अंकांप्रमाणे आवडेल, अशी आशा आहे.

आपणास व आपल्या कुटुंबीयांस ही दिवाळी सुखाची, समाधानाची, आनंददायी व आरोग्यदायी जावो ही सदिच्छा !

**प्रमोद त्र्यं. नलावडे**
मुख्य संपादक तथा महासंचालक
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)
संपर्क : ०२२-२२०४१५८५/२२०२७९५६
dg@dgipr.maharashtra.gov.in



# पारदर्शक आणि गतिमान

'उद्योग, कृषी, पायाभूत सुविधांचा विकास, परदेशी गुंतवणूक, दळणवळण, शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षा अशा अनेक क्षेत्रांमध्ये आघाडीवर असण्याची परंपरा टिकविण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. महाराष्ट्रात तीन वर्षांपूर्वी जनाधारावर लागोपाठ तिसऱ्यांदा सत्तेवर आलेल्या आघाडी सरकारने गेल्या तीन वर्षांच्या कारकिर्दीत याद्दष्टीने मूलभूत आणि ठोस स्वरूपाचे काम केले आहे, असे मी आत्मविश्वासाने म्हणू शकतो...
आघाडी सरकारच्या तीन वर्षपूर्तीनिमित्त सांगत आहेत, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण.

एखाद्या राज्याचा विकास किंवा प्रगती म्हणजे नेमके काय, याचा विचार केला तर सर्वसामान्य माणसाचे जीवन अधिकाधिक सुसह्य होण्यासाठी निर्माण केलेल्या पुरेशा पायाभूत सोयीसुविधा, अन्न-वस्त्र-निवाऱ्याची शाश्वती, निर्भय वातावरणात जगण्यासाठी कायदा आणि सुव्यवस्थेची उत्तम परिस्थिती आणि कृषी व उद्योगांच्या आधारावर उभी केलेली सक्षम अर्थव्यवस्था होय, असे मी म्हणेन.

महाराष्ट्रात तीन वर्षांपूर्वी लागोपाठ तिसऱ्यांदा सत्तेवर आलेल्या आघाडी सरकारने गेल्या तीन वर्षांच्या कारकिर्दीत याद्दष्टीने मूलभूत आणि ठोस स्वरूपाचे काम केले आहे, असे मी आत्मविश्वासाने म्हणू शकतो. जनतेचा पाठिंबा, सरकारची इच्छाशक्ती आणि प्रशासनाने दिलेली साथ यामुळेच हे शक्य झाले आहे, यात शंका नाही.

देशामध्ये महाराष्ट्राचे स्थान आगळेवेगळे आहे. उद्योग, कृषी, पायाभूत सुविधांचा विकास, परदेशी गुंतवणूक, दळणवळण, शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षा अशा अनेक क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राने देशाचे पुढारपण केले आहे. आमची कोणाशी स्पर्धा नाही, पण ही परंपरा कायम टिकविण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत.

निसर्गाचा लहरीपणा, त्याचा शेतीला बसणारा फटका, सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा, जागतिकीकरण, जागतिक मंदीचे वातावरण, पेट्रोलियम पदार्थ आणि त्या अनुषंगाने होणारी अन्य वस्तूंची भाववाढ, बेरोजगारी, वाढत्या नागरीकरणामुळे निर्माण होणारे प्रश्न अशा प्रकारच्या अनेक समस्या आपल्यासमोर

आहेत. नैसर्गिक साधनसंपत्तीचे न्याय्य वाटप आणि विकासाचा समतोल ही दोन महत्त्वाची आव्हाने आपल्यासमोर आहेत. भविष्यकाळात पाण्याचा प्रश्न अधिकाधिक गंभीर होत जाणार आहे. वाढते नागरीकरण, शेतीमधील प्रगती आणि उद्योगांचा विस्तार यांची पाण्याची गरज, पिण्यासाठी, सिंचनासाठी आणि उद्योगांसाठी या प्राधान्यक्रमाने भागवावी लागणार आहे.

त्यातच निसर्गाचा लहरीपणा प्रत्येक वर्षी वाढतो आहे. मान्सूनचे आगमन आणि परतीचे वेळापत्रक पुरते बिघडले आहे. जागतिक हवामान बदल, जागतिक तापमानवाढ, निसर्गावरील मानवाचे अतिक्रमण, पर्यावरण आणि प्रदूषणाचे प्रश्न यामुळे निसर्गचक्र बिघडले आहे. एका भागात अवर्षण तर दुसऱ्या भागात पूर, कधी अवकाळी पाऊस तर कधी गारांचा वर्षाव, असे चित्र दिसू लागले आहे. या सर्वांचा सामना आपल्याला करावा लागणार आहे.

### राजकीय मतैक्य आवश्यक

राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मतभेद बाजूला ठेवून काही गोष्टींवर राजकीय मतैक्य असणे फार गरजेचे आहे. शहरी-ग्रामीण, गरीब-श्रीमंत, उत्पादक-ग्राहक आणि सुशिक्षित-अशिक्षितांमध्ये मोठी दरी आहे. ती कमी करण्यासाठी आपल्याला निर्णायक पावले उचलावी लागतील.



महाराष्ट्र हे प्रथमपासूनच देशातील आघाडीचे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. संपूर्ण भारतामध्ये महाराष्ट्राची गणना प्रगत राज्यामध्ये होते ही काही योगायोगाची बाब नव्हे. गेल्या अर्धशतकात महाराष्ट्राने अनेक क्षेत्रांत यशाची नवनवी शिखरे पादाक्रांत केली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्राला जे राजकीय स्थैर्य लाभले, त्यामुळेच हे शक्य झाले आहे. हे स्थैर्य, कर्तृत्ववान नेत्यांची परंपरा आणि कार्यकर्त्यांचे मोहोळ यामुळे महाराष्ट्र विकासाच्या मार्गावर आरूढ झाला.

महाराष्ट्राच्या आजवरच्या वाटचालीकडे नजर टाकली तर लक्षात येईल की, आपल्या राज्याने एकीकडे सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात संपूर्ण देशात स्वत:चे स्थान निर्माण केले आहे तर दुसरीकडे औद्योगिक, सहकार आणि कृषी क्षेत्रात ठसा उमटविला आहे. सामाजिक न्याय आणि सामंजस्याचा जो आदर्श राज्याने निर्माण केला, त्यामागे अनेक व्यक्तींची तपस्या आहे. राज्याच्या स्थापनेपासूनच सर्वंकष विकासासाठी अनेक दूरगामी निर्णय जाणीवपूर्वक घेण्यात आले.

रोजगार हमी योजनेसारखी क्रांतिकारी योजना महाराष्ट्राने देशाला दिली. महिला धोरण, महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण, माहितीचा अधिकार, महिला बचत गटांची चळवळ अशा कित्येक बाबींत महाराष्ट्र देशात सतत अग्रेसर राहिला आहे. इतिहास, संस्कृती, परंपरा, सामाजिक सुधारणा या क्षेत्रात कायम अग्रेसर असणारा महाराष्ट्र आज शेती, उद्योग, माहिती तंत्रज्ञान, प्रशासन, समाजकारण, पायाभूत सुविधा आदी अनेक क्षेत्रांमध्ये देशात अग्रणी आहे. त्याचे हे मोठेपण टिकविणे ही आपणा सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे, असे मला वाटते.

### समतोल विकासावर भर

राज्याचा समतोल आणि संतुलित विकास हे मला वाटते आपणा सर्वांसमोरचे सर्वांत मोठे आव्हान आहे. महाराष्ट्र भौगोलिक, प्रादेशिक, नैसर्गिक, सांस्कृतिक अशा वैविध्याने नटलेले राज्य आहे. विविधतेचे हे बलस्थानच विकासाच्या दृष्टीने कधी-कधी अडचणीचे ठरते. यामुळेच कोकण, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भ अशा वेगवेगळ्या भागांमध्ये विकासाचा असमतोल निर्माण झाला आहे. प्रशासन, उद्योग, गुंतवणूक, साहित्य, कला, संस्कृती अशा विविध क्षेत्रांत अग्रस्थानी असलेल्या आपल्या राज्यातील हा असमतोल नाहीसा करणे हे माझे ध्येय आहे. राज्याच्या सर्वांगीण आणि समतोल विकासावर भर देण्याचे धोरण मी पहिल्या दिवसापासून राबविले आहे. यासाठी विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे. योग्य नियोजनातून आपण ते नक्कीच साध्य करू शकू, असा मला विश्वास वाटतो.

### कृषी क्षेत्रात सुधारणा

वातावरणातील बदलामुळे राज्यातील काही भागांत अनियमित आणि अवकाळी पावसाचे प्रमाण गेल्या काही वर्षांत वाढलेले दिसते. अशा पावसामुळे नुकसान होणाऱ्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबरोबरच कायमस्वरूपी उपाय म्हणून पीक विमा योजना अधिक व्यापक स्वरूपात आणण्याबाबत केंद्राकडे आग्रही भूमिका घेण्यात आली आहे. गेल्या वर्षी विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशामध्ये सोयाबीन आणि धानाचा अभूतपूर्व पेचप्रसंग उभा राहिला. त्यावरही मात करून आम्ही दोन हजार कोटी रुपयांचे ऐतिहासिक पॅकेज त्या विभागासाठी जाहिर केले. मात्र, अशा प्रकारचे पॅकेज किंवा आर्थिक मदत हा तात्कालिक उपाय आहे. यामुळे शेतकऱ्यासमोरचे प्रश्न कायमस्वरूपी सुटणार नाहीत. यासाठीच आर्थिक मदत देण्याबरोबरच ठिबक सिंचन, गोदामांची सोय, कृषी उत्पन्न बाजार

**आतापर्यंत ५१ लाख शेतकऱ्यांना १५ हजार कोटींचे पीककर्जाचे वाटप झाले आहे.**

**तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी मोबाईलद्वारे एसएमएस सेवा सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.**




> **महाराष्ट्र हा उद्योगाच्या बाबतीत लिडर स्टेट आहे. देशातील एकूण थेट परदेशी गुंतवणुकीपैकी ४२ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे.**

समित्यांचे बळकटीकरण, शेतीविषयक पायाभूत सुविधांची निर्मिती करून शेती क्षेत्राचा शाश्वत विकास करण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे. असे केले तर शेतकरी या दुष्टचक्रातून मुक्त होईल.

नागरीकरण झपाट्याने वाढत असल्याने शेतीवर त्याचा अनिष्ट परिणाम होत आहे. जलव्यवस्थापनाचे नवे धडे गिरविण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न साधारणत: ७५ हजार रुपयांच्या आसपास आहे. मात्र, गरिबांची संख्याही बरीच आहे. ८९ टक्के सकल उत्पादन उद्योग आणि सेवा क्षेत्रातून तर केवळ ११ टक्के कृषी क्षेत्रातून मिळते. ५५ टक्के लोकसंख्या शेती आणि शेतीशी संबंधित क्षेत्रावर अवलंबून असल्यामुळे या क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन करण्याकडे शासनाचा कल आहे. किमान ४० टक्के लोकसंख्या कृषी उद्योगाकडे व कृषीवर आधारित सेवा क्षेत्राकडे वळविण्याची गरज आहे.

शेतीसाठी कर्जपुरवठा ही शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट आहे. शेतकऱ्यांना वेळेवर पतपुरवठा होण्यासाठी शासनाने सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. जमीन आणि पाण्याच्या उपलब्धतेवरील मर्यादांवर आपण तंत्रज्ञानाच्या आधारेच मात करू शकू. कृषी क्षेत्र हा ज्ञानाधिष्ठीत उद्योग आहे, हे मान्य करण्याची वेळ आली आहे. उपलब्ध जमिनीच्या तुकड्यांवर कमीत कमी पाणी वापरून अधिकाधिक उत्पादन करण्याची गरज आहे.

द्राक्ष, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, पेरू व काजू या फळपिकांसाठी ३३९ तालुक्यांत फळपीक विमा योजना कार्यान्वित झाली आहे. सर्वंकष पीक विमा योजनेसाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरू आहे.

कृषीविकासासाठी २८४ कोटी, तर कोरडवाहू शेतीविकासासाठी २०० कोटींचा अतिरिक्त निधी वितरित करण्यात आला आहे. सिंचनक्षमता वाढविण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांचा भाग म्हणून सिमेंट बंधारे, पाणी स्रोतांचे बळकटीकरण, सूक्ष्मसिंचन या उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. यासाठी केंद्राकडे २२०० कोटींचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना १ लाखापर्यंतचे पीककर्ज बिनव्याजी, तर एक लाखापासून तीन लाखांचे पीककर्ज १ टक्के व्याजदराने देण्याचा निर्णय आमच्या सरकारने घेतला.

### वस्त्रोद्योग क्षेत्रात मोठी गुंतवणूक

राज्याचे वस्त्रोद्योग धोरण नुकतेच आम्ही जाहीर केले आहे. शेती व्यवसायानंतर या उद्योगात जास्तीत-जास्त रोजगार निर्माण करण्याची क्षमता आहे. राज्यातील कापड उद्योगात वाढ, रोजगारात वाढ, तसेच कापूस उत्पादक क्षेत्रात प्राथम्याने दीर्घ मुदतीच्या आश्वासक विकासासाठी कापूस ते तयार वस्त्र निर्मितीच्या विविध स्तरावरील प्रक्रिया घटकाच्या उभारणीवर विशेष भर देणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

या धोरणाद्वारे पुढील पाच वर्षांत राज्यात शिल्लक राहणाऱ्या ४५ लाख गाठी रुईवर विविध स्तरावरील मूल्यवर्धनाच्या प्रक्रिया करणारे वस्त्रोद्योग घटक उभारले जाणार आहेत. या क्षेत्रात एकूण ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करणे व ११ लाख नवीन रोजगार निर्मिती करणे हे या धोरणाचे साध्य आहे. या धोरणांतर्गत विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र येथील नवीन वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली गुंतवणुकीच्या १० टक्के अनुदान देण्यात येईल.

### उद्योग क्षेत्रात भरारी

राज्यातील औद्योगिक क्षेत्राचा विकास व्हावा, निर्यातीला चालना मिळावी आणि मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती व्हावी, असे आमचे प्रयत्न आहेत. यादृष्टीने सर्वसमावेशक असे नवे औद्योगिक धोरण तयार करण्यात येत आहे. एकूण मंजूर ३२४ मेगा प्रोजेक्टस्पैकी १११ प्रकल्प मागास भागांमध्ये उभारण्यात येत आहेत. एकूण मेगा प्रोजेक्टस्पैकी ७५ टक्के प्रकल्प मागासभागात स्थापन झाले पाहिजेत, असा आमचा आग्रह आहे. महाराष्ट्राची स्पर्धा अन्य कुठल्याही राज्याबरोबर नाही. आपली स्पर्धा आपल्याशीच आहे. उद्योग-व्यवसाय यांचा विकास व्हावा म्हणून प्रत्येक राज्य आजच्या काळात नवनवीन मार्गाने मार्केटिंग करीत आहे.

### मुंबई विकासाचा फास्ट ट्रॅक

मुंबईच्या विकासाचे नुसते स्वप्न पाहून आम्ही थांबलो नाही. पंतप्रधानांनी देशाच्या या आर्थिक राजधानीला जागतिक दर्जाचे शहर बनविण्याचा मनोदय व्यक्त केला आणि गेल्या ७ ते ८ वर्षांत मुंबईचा कायापालट ज्या गतीने सुरू झाला आहे त्याबद्दल देशातूनच नव्हे, तर परदेशातूनही उत्सुकतेने पाहिले जात आहे. मुळात बेटांचे शहर असलेल्या मुंबईला विकासासाठी फारच थोडी जागा आहे. चिंचोळ्या जागेमुळे वाहतुकीची समस्या, जुन्या इमारतींचा पुनर्विकास, झोपडपट्ट्यांचा प्रश्न या जोडीनेच नवीन पायाभूत सुविधांचा विकास करण्याचे मोठे आव्हान होते. एमएमआरडीएच्या माध्यमातून या कामाला गती देण्यात आली.

गेल्या काही वर्षांत ११ उड्डाणपूल बांधून ते वाहतुकीसाठी खुले करण्यात आले आहेत. मुंबई नागरी पायाभूत सुविधेत ३ हजार कोटींची कामे सुरू आहेत. त्यात रस्ते, उड्डाणपूल अशी कामे आहेत. मेट्रो आणि मोनो रेलमुळे संपूर्ण मुंबई अद्ययावत रेल्वे वाहतुकीने जोडली जाईल. या दोन्ही रेल्वे येत्या चार-पाच

**''सात हजार गिरणी कामगारांना माफक दरात घरे मिळण्याचे आमचे वचन आम्ही पूर्णत्वास नेले असून सदनिका देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.''**

महिन्यांत धावू लागतील. नवी मुंबई विमानतळाला त्याचप्रमाणे मुंबई ट्रान्स हार्बर लिंक या ९००० कोटी रुपये खर्चाच्या महत्त्वपूर्ण मार्गाच्या व्यवहार्यता तफावत निधीसाठी (व्हीजीएफ) केंद्राची मान्यता मिळाली आहे. विमानतळामुळे मुंबई परिसराला आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी उभारी मिळेल. तर ट्रान्स हार्बर लिंकमुळे मुंबई शहर महामुंबईशी जोडले जाईल.

सहारा एलिव्हेटेड रोड, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प, विरार-अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉर या प्रकल्पांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. १२६ कि.मी.चा हा कॉरिडॉर विरारहून अलिबागला जोडण्यात येईल, त्यामुळे या संपूर्ण परिसराला त्याचा लाभ मिळेल. हे सर्व प्रकल्प राष्ट्रीय महत्त्वाचे आहेत, त्यामुळे त्यांना जास्तीत जास्त साहाय्य करून या प्रकल्पांना गती देण्याची विनंती मी पंतप्रधानांना केली आहे. याशिवाय आशिया खंडातील सर्वांत मोठी झोपडपट्टी असलेल्या धारावीच्या कायापालटालाही सुरुवात होत आहे. क्लस्टर डेव्हलपमेंट अंतर्गत आम्ही पुनर्विकासाच्या प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. नगररचनेच्या अनुषंगाने आम्ही चटईक्षेत्र निर्देशांक, पर्यावरणपूरक इमारती यासंदर्भातही महत्त्वाच्या सुधारणा केल्या आहेत.

सदनिकाधारकांच्या सोयीसाठी महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) अधिनियम २०१२ नुसार गृहनिर्माण नियामक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. सदनिकाधारकांना दिलासा देणारा अशा प्रकारचा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. २० हजार चौरस मीटरपेक्षा मोठे भूखंड विकसित करून उभारण्यात येणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये अल्प उत्पन्न गटांसाठी २० टक्के सदनिका राखीव ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

सदनिकांची विक्री किंवा पुनर्विक्री करताना बिल्डर्सकडून अडवणुकीचे प्रकार घडतात. माझ्याकडेही अशा स्वरूपाच्या तक्रारी येत होत्या. त्या अनुषंगाने सदनिका विकण्यापूर्वी विकासकाकडून कोणत्याही ना हरकत प्रमाणपत्राची गरज नसून असे बेकायदेशीर प्रकार थांबविण्याच्या कडक सूचना मी दिल्या आहेत. मोफा कायद्यात विकासकाच्या कोणत्याही ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही, असे ना हरकत प्रमाणपत्र घेण्याचे कोणतेही बंधन नाही, असे स्पष्ट म्हटले आहे.

विकासकांकडून इमारत पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ व नियम १९६४ अन्वये नियमाप्रमाणे सहकारी गृहनिर्माण संस्थेची स्थापना करणे व त्यानंतर विहित कालावधीत इमारतीखालील जमिनींचे अभिहस्तांतरण करणे या प्रक्रिया पूर्ण करण्यात येत नाहीत, असे निदर्शनास आले. प्रत्येक सदनिकांच्या हस्तांतरण किंवा पुनर्विक्रीस ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी ग्राहकांकडून रोखीने व प्रति चौरस फूट पैसे वसूल करणे इत्यादी बेकायदेशीर प्रकार वारंवार घडत आहेत, याची गंभीर दखल घेऊन हे प्रकार थांबविले आहेत.

### आधार नोंदणीत देशात अग्रेसर

आधार नोंदणी कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र हे राष्ट्रीय स्तरावर पहिल्या क्रमांकांवर असून राज्यातील ६ जिल्ह्यांचा समावेश या पथदर्शी कार्यक्रमाकरिता झाला आहे. हे निवड केलेले जिल्हे मुंबई शहर, मुंबई उपनगर, पुणे, अमरावती, वर्धा आणि नंदूरबार हे आहेत. आतापर्यंत राज्यामध्ये सुमारे ४ कोटींपेक्षा जास्त आधार क्रमांकासाठी नोंदणी झाली आहे. राज्य शासनाच्या संकेत स्थळावर आधारसंबंधी चौकशीसाठी अधिकारी व कर्मचारी यांचे दूरध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी दिलेले असून uid@maharashtra.gov.in या ई-मेलवर सर्व प्रकारच्या संदर्भांना उत्तरे देण्यात येतात. आलेल्या सुमारे ६०० ई-मेलना आतापर्यंत उत्तरे देण्यात आलेली आहेत.

आधार केंद्र मालकाची नोंदणी करण्याचे काम सुरू करण्यात आले असून त्यासाठी नोंदणी केंद्र उघडण्याचे काम सुरू केले आहे. गृहनिर्माण सोसायट्यांप्रमाणेच मोठ्या कंपन्यांच्या क्षेत्रामध्येही नोंदणी केंद्रे उभारण्यात येत आहेत. आतापर्यंत ५० गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये आधार क्रमांकाची नोंदणी करण्यात आली आहे.

### म. गांधी नरेगा योजना

रोजगार हमी योजना महाराष्ट्रामध्ये काही नवीन नाही. जवळजवळ ३० वर्षांपासून राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. परंतु, नरेगांतर्गत ग्रामपंचायत ही योजनेची केंद्रबिंदू आहे. या योजनेअंतर्गत गाव पातळीवरील लोकप्रतिनिधींना त्यांच्या गावाचा कायापालट कशाप्रकारे करता येईल हे अजूनही माहीत नाही. त्यामुळे विशेषत: त्यांच्यासाठी आम्ही गेल्या महिन्यात नरेगा जागृती अभियान राबविले. राज्यात त्रोटक प्रमाणात नरेगाच्या यशोगाथा ऐकायला मिळतात आणि नरेगाच्या कामामुळे ग्रामपंचायतीकडून गावाचा कायापालट कसा झाला आहे, हे पाहायला मिळते. नांदेड येथील पांडुर्णी या ग्रामपंचायतीने जवळजवळ रुपये १ कोटीचे काम पूर्ण केले आहे. त्याला केंद्र शासनाकडून पुरस्कारही मिळाला आहे. तसेच भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यातील बीड सितेपार या गावाला केंद्र शासनाचा पुरस्कार






मिळालेला आहे. अशा प्रकारच्या अनेक यशोगाथा आहेत. परंतु, आपल्याला हजारो ग्रामपंचायतींमध्ये नरेगामार्फत कामे घेऊन त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा पुरेपूर वापर करून गावाचा विकास करता येईल.

नरेगामध्ये तळापासून वर (Bottom-up approach) ग्रामपातळीचे नियोजन करणे अपेक्षित आहे. महाराष्ट्रामध्ये पंचायतराज संस्थेचा इतिहास आणि परंपरा आहे. कै. यशवंतराव चव्हाण यांनी पंचायतराज संस्था बळकट करण्यामध्ये मोलाचे योगदान दिले होते. मला खात्री आहे की, नरेगामार्फत या अभियानामध्ये ही परंपरा अधिक वृद्धिंगत होईल आणि तिला अधिक बळकटी प्राप्त होईल.

रोजगार हमी योजना महाराष्ट्रात सुरू झाल्यानंतर संपूर्ण देशानेच नव्हे, तर अनेक अर्थतज्ज्ञांनी, विशेषज्ञांनीही रोजगार हमी योजनेचे कौतुक केलेले आहे. या योजनेमध्ये दुष्काळामध्ये रोजगाराची हमी तर देण्यात आलेली आहेच; परंतु त्याचबरोबर ही योजना ग्रामीण क्षेत्रातील हजारो कि.मी. रस्ते, मोठे जलसिंचन प्रकल्प, पाझर तलाव इत्यादी निर्माण करू शकली.

आज सर्वसमावेशक आणि गतिमान विकासासाठी शिक्षण आणि कौशल्य विकास याला खूप महत्त्व आहे. चांगल्या शिक्षणामुळे चांगले रोजगार मिळतात, हे जरी खरे असले तरी माझ्या दृष्टीने शिक्षणाचे सामाजिकदृष्ट्या मिळणारे फायदे अधिक आहेत. महाराष्ट्राचे सामाजिक, आर्थिक चित्र बदलवायचे असेल तर उत्तम शिक्षणाची गरज आहे. शिक्षणाच्या आजच्या बेसिक पद्धतीत विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा योग्य आणि व्यावहारिक समावेश केल्यास दृष्टिकोनात बराच फरक पडेल.

कौशल्यवृद्धीमुळे उद्योगांना केवळ मनुष्यबळच मिळेल असे नव्हे, तर दर्जात्मक आणि नावीन्यपूर्ण उत्पादनाला चालना मिळू शकेल. आज एक लाख मुले प्राथमिक शिक्षणासाठी प्रवेश घेतात, त्यातील केवळ सात ते आठ हजार मुलेच पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करू शकतात, हे कटू वास्तव आहे. पारंपरिक शिक्षण व्यवस्थेत बदल करून नव्या पद्धतीने शिक्षण देण्याची गरज आहे. यामुळेच तर आयआयटी, आयआयएम यासारख्या संस्थांना आपल्या समाजात एक वेगळे अस्तित्व आहे. सर्व शिक्षा अभियान आणि त्यानंतर आता शिक्षणाचा सार्वत्रिक अधिकार कायद्यामुळे शिक्षण क्षेत्रात खूप चांगले बदल होत आहेत.

### महसूल विभागाचे बळकटीकरण

शासनाच्या अनेक विभागांच्या योजनांचा शुभारंभ हा महसूल विभागामार्फत केला जातो. निवडणूक, राजशिष्टाचार, जनगणना, विविध परीक्षा, सामाजिक योजनांची अंमलबजावणी, सार्वजनिक वितरण व्यवस्था, विविध दाखले देणे, बालमजूर सर्वेक्षण व पुनर्वसन, रोजगार, अन्न व नागरी पुरवठा, आरोग्य, पाणीपुरवठा अशी अनेक कामे या विभागामार्फत केली जातात.

वाढती लोकसंख्या व नागरीकरण, औद्योगिकीकरण, शिक्षणाचा प्रचार व प्रसार, विविध निवडणुका आणि आनुषंगिक कामे याशिवाय इतर विभागांशी संनियंत्रण व समन्वय करताना अनेक प्रशासकीय अडचणी येतात शिवाय ताणही वाढतो. त्यावर मात करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शासनाच्या योजना परिणामकारक पद्धतीने पोहोचविण्यासोबतच महसूल विभागाचे बळकटीकरण करण्यावर आम्ही भर दिला आहे.

माहिती मिळविण्यासाठी किंवा तक्रार निवारण्यासाठी ई-लोकशाही प्रणाली (हेल्पलाईन) सुरू केली, ई-चावडी योजनेंतर्गत तलाठ्यांनी लॅपटॉपच्या साहाय्याने दप्तरी कामकाज पार पाडणे सुरू केले. मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ कॉन्फरन्स, जीपीएस, सॅटेलाईट इमेज या सर्व माहिती तंत्रज्ञानाचा वापर विविध शासकीय कामांसाठी वाढविण्यात आला.

**महसूल विभागातर्फे देण्यात येणारे दाखले व सेवा याकरिता लागणारे अर्ज, नमुने, प्रतिज्ञापत्र यांचे ई-डिस्ट्रिक्ट प्रकल्पांतर्गत प्रमाणीकरण करण्यात आले आहे. राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत प्रत्येक चार गावांकरिता एक महा ई-सेवा केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

सातबाराचे संगणकीकरण करण्याचे काम मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आले आहे. येत्या २ वर्षांत हे काम पूर्ण करण्यात येणार आहे. अनधिकृत बांधकाम रोखण्यासाठी आणि नागरिकांना कमी कष्टात व वेळेत अकृषिक परवानगी देण्यासाठी संगणकीय कार्यप्रणालीचा वापर करण्यात येत आहे.

वाळू लिलावाकरिता ई-टेंडरिंग पद्धतीचा वापर बंधनकारक करण्यात आला; शिवाय जमीन मोजणीसारखे क्लिष्ट काम ई-मोजणी अंतर्गत सुलभ करण्यात आले. मोजणीचे अर्ज संगणकीय प्रणालीद्वारे नोंदवून मोजणीची तारीख देण्यापासून ते मोजणी होईपर्यंत संनियंत्रण आज्ञावलीद्वारे करण्यात येत आहे.

याशिवाय ई-फेरफार (ऑनलाईन म्युटेशन), ई-नकाशा (नकाशाचे डिजिटायझेशन), भूमी अभिलेखाचे स्कॅनिंग, बारकोड सिस्टीम, ई-चावडी यासारख्या योजना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गुणवत्तापूर्ण सेवा पुरविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत.

### राज्याची पुनर्मोजणी

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून संपूर्ण राज्याची पुनर्मोजणी करण्यात येणार आहे. आधुनिक पद्धतीने मोजणी केल्यामुळे सर्व अभिलेख वस्तुस्थितीनुरूप अचूक तयार होऊन डिजिटल स्वरूपात डाटा निर्माण होणार आहे. अभिलेखांचे संगणकीकरण होऊन जमीन विषयक अभिलेखात पारदर्शकता येईल, जमीन विषयक वाद कमी होऊन महसूल, दिवाणी आणि फौजदारी दावे कमी होतील. वैयक्तिक, सामुदायिक आणि सार्वजनिक विकासाचे प्रकल्प राबविताना येणाऱ्या अडचणी दूर होतील. आधुनिक तंत्रज्ञानाने पुनर्मोजणी ही ई-गव्हर्नन्सच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल ठरले आहे.

### आरोग्य क्षेत्रात सुधारणा

आरोग्य क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागात आधुनिक वैद्यकीय सुविधा देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत. पूर्वीच्या तुलनेत आता पुरेशा प्रमाणात वैद्यकीय साधनांची उपलब्धता आहे. रुग्णालयांच्या इमारती उभ्या राहत आहेत. मात्र, तळागाळातल्या शेवटच्या व्यक्तीपर्यंत दर्जेदार वैद्यकीय सुविधा देणे, ते देखील अखंडित, हे आपले अजूनही स्वप्न आहे. पदवी घेणाऱ्या नवोदित डॉक्टरांना ग्रामीण क्षेत्रात काम करणे बंधनकारक करून चालणार नाही, तर या तरुण पिढीमध्ये स्वत:हून ग्रामीण भागासाठी सेवाभावाने काम करण्याची इच्छा निर्माण झाली पाहिजे, अशी परिस्थिती आम्ही निर्माण करीत आहोत.

### आरोग्य विभागाचा बृहत आराखडा

सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारित आणि अस्तित्वात असलेल्या दोन आरोग्य संस्थांमधील अंतर विचारात घेऊन विविध आरोग्य संस्था स्थापनेचा आणि अस्तित्वात असलेल्या आरोग्य संस्थांच्या श्रेणीवर्धनाचा बृहत आराखडा आम्ही नुकताच मंजूर केला आहे. यामुळे जवळपास १२५७ विविध आरोग्य संस्था स्थापन करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर अस्तित्वात असलेल्या ५७ विविध आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. यामध्ये १९१६ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदांसहित एकूण २१५२ विविध पदांची निर्मिती करण्यात येणार आहे.

गुटखा व पानमसाला या पदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वितरण व विक्रीवर बंदी घालण्याचा क्रांतिकारक निर्णय आम्ही घेतला. मुंबईतील जे.जे. रुग्णालय परिसरात सुमारे ४८० कोटी रुपये खर्चाचे २० मजली सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यात येणार आहे. आपत्कालीन परिस्थितीमध्ये आपद्‌ग्रस्तांना तातडीची वैद्यकीय सेवा देण्यासाठी ९३७ रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

आरोग्य विभागातील महत्त्वाचा घटक



असलेल्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत दर्जेदार व विनामूल्य आरोग्य सेवा सामान्य माणसापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले जातात. मातामृत्यू, बालमृत्यू कमी करणे आणि लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे हे मुख्य उद्दिष्ट या अभियानाचे आहे.

या अभियानांतर्गतच ई-फायलिंग कार्यप्रणाली राज्याने अवलंबिली आहे. मला सांगायला आनंद वाटतो की, महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे ज्याने पंतप्रधान कार्यालयानंतर ई-फाईलिंग सेवेचा अंगीकार केला आहे. या नव्या प्रणालीनुसार राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान मुंबई यांच्या कार्यालयातून पत्रांचे वाटप, नस्त्यांची आवक-जावक, त्यावरील अभिप्राय आणि निर्णय टप्प्याटप्प्याने पूर्णपणे संगणकावर पार पाडले जात आहेत. ही ई-फाईल प्रणाली सध्या मुंबई येथील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य कार्यालय व पुणे येथील कुटुंब कल्याण कार्यालयात राबविण्यात येत आहे. ही वेबवर आधारित प्रणाली असून वरिष्ठ अधिकारी दौऱ्यावर असतानादेखील संगणकावर फाईल्स कुठेही पाहू शकतात व निर्णय देऊ शकतात. यामुळे कामाची गती व पारदर्शकता दोन्हीही वाढली आहे. पुढील वर्षी ही प्रणाली आरोग्य विभागाच्या राज्यस्तरावरील व विभागीय कार्यालयात लागू करण्यात येणार आहे.

### जीवनदायी आरोग्य योजना

राज्यात महत्त्वाकांक्षी अशी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरू केली आहे. राज्यामध्ये १९९७ पासून जीवनदायी योजना कार्यरत होती. त्यात चार आजारांवरील उपचारांचा समावेश होता. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबासाठी ही योजना होती. नव्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या पहिल्या टप्प्यात गडचिरोली, अमरावती, नांदेड, सोलापूर, धुळे, रायगड, मुंबई उपनगर, मुंबई या ८ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेखाली विविध आजारांवरील ९४७ प्रोसिजर्स मोफत करण्यात येतात. आतापर्यंत ११ हजार रुग्णांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. लवकरच राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ही योजना सुरू करण्यात येणार आहे.

### सामाजिक न्यायासाठी

समाजाच्या तळागाळातील व सामाजिकदृष्ट्या अन्याय झालेल्या समाजघटकांसाठी सामाजिक न्यायाचे धोरण आमच्या सरकारने प्रभावीपणे राबविले आहे. सामाजिक न्याय विभागामार्फत




अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागासवर्गीय यांच्यासाठी शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या अनेक योजना राबविण्यात येत आहेत. याशिवाय अपंग कल्याण आणि वृद्ध नागरिकांसाठी सामाजिक सुरक्षेच्या योजनांची मानवी दृष्टिकोनातून अंमलबजावणी करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती जलद मिळावी यासाठी ई-स्कॉलरशिप योजना सुरू करण्यात आली आहे. शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा होत आहे. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी १०० शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या निर्वाहभत्यामध्ये वाढ करण्यात आली आहे.

प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील विद्यार्थिनींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती आणि पुरस्कार, मॅट्रिकोत्तर शिक्षणाची आणि परीक्षेची फी देणारी योजना, अनुसूचित जातीच्या मुलांना परदेशी उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, दुर्गम भागात आश्रमशाळा, छात्रावास आणि वसतिगृहे अशा उपायांमुळे वर्षानुवर्षे समाजाच्या मुख्य प्रवाहाबाहेर राहिलेले समाजबांधव आता मुख्य प्रवाहात समाविष्ट झाले आहेत. आर्थिक सबलीकरणासाठी कर्मवीर दादासाहेब गायकवाड, सबलीकरण व स्वाभिमान योजना खूप उपयुक्त ठरली आहे. कन्यादान योजना, आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक साहाय्य, दलित वस्ती सुधार योजना यासारख्या योजनांमुळे या घटकांचा मोठ्या प्रमाणात सामाजिक विकासही झाला आहे. सामाजिक न्याय विभागासाठी मोठ्या प्रमाणात निधीची उपलब्धता करून देण्यात आली आहे.

### अल्पसंख्याकांसाठी

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगास दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्रदान करण्यात आले. नागपूर येथे 'हज हाऊस'ची उभारणी करण्याचाही निर्णय आम्ही घेतला आहे.

राज्यातील अल्पसंख्याकांची संख्या लक्षात घेऊन राज्यात अनेक ठिकाणी उर्दू भवन उभारण्याची योजना आम्ही हाती घेतली आहे. महाराष्ट्र उर्दू साहित्य अकादमीला स्वायत्त संस्थेचा दर्जा देण्याचा प्रस्तावही विचाराधीन आहे. यामुळे या अकादमीला स्वतंत्रपणे काम करता येईल आणि उर्दू भाषा आणि उर्दू लेखक यांची चांगल्याप्रकारे सेवा करता येईल. मुंबई विद्यापीठात कृष्णचंद्र उर्दू अध्यासन सुरू करण्यात आले आहे. या अध्यासनामार्फत उर्दू भाषेत एम.ए., एम.फील, पीएच.डी. अभ्यासक्रमांचा लाभ अनेक विद्यार्थी घेऊ लागले आहेत. अल्पसंख्य युवकांना रोजगार उपलब्ध

**अल्पसंख्याक युवकांना स्वतःच्या पायावर उभे करण्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या भाग भांडवलामध्ये १७० कोटींवरून २५० कोटी रुपये इतकी वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

करण्यासाठी मौलाना आझाद अल्पसंख्य महामंडळामार्फत मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण आणि आर्थिक साहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.

**सिंचन प्रकल्पांचा आढावा आवश्यक**

गेले काही महिने राज्यात सिंचनाची श्वेतपत्रिका हा विषय गाजतो आहे. याबाबत निश्चित भूमिका मांडणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सलग दोन-तीन वर्षे टंचाईच्या झळा सोसतो आहे. राज्यातली बहुतांशी शेती जिरायती असल्याने ती पावसावर अवलंबून आहे आणि त्याच्या लहरीपणाचा फटका दरवर्षी आपल्याला कुठे ना कुठे बसल्याशिवाय राहत नाही.

आपले राज्य कृषिप्रधान आहे आणि राज्यातील ६० ते ७० टक्के जनतेची उपजीविका प्रामुख्याने कृषिक्षेत्रावर अवलंबून आहे. ज्या राज्याची अर्ध्याहून जास्त लोकसंख्या चरितार्थासाठी शेतीवर अवलंबून आहे, तिच्या अर्थव्यवस्थेमध्ये शेतीला किती महत्त्व असेल, हे सांगण्याची गरज नाही. शेतीची उत्पादकता वाढविणे हाच ग्रामीण विकासाचा पाया आहे आणि म्हणूनच सिंचन हा विषय राज्याच्या दृष्टीने नेहमीच प्राधान्याचा असणे स्वाभाविक आहे.

सिंचनाचा मूलभूत उद्देश कृषी उत्पादनात भरीव वाढ करणे हा आहे. कृषी उत्पादनामध्ये सिंचन व्यवस्थेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आज राज्यात लहान-मोठ्या मिळून जवळजवळ ४०० नद्या वाहतात. भले त्या सतत बारमाही नसतील, पण त्यातील उपलब्ध पाण्याचे नियोजन करून एक आदर्श अशी जलसंपत्ती निर्माण करणे, यादृष्टीने प्रयत्न होण्याची गरज आहे.

सिंचनाच्या प्रकल्पांवर आतापर्यंत हजारो कोटी रुपये खर्च झाले आहेत. त्यामानाने सिंचनाची क्षमता मात्र वाढली नाही. याचे कारण आपण आतापर्यंत मोठे प्रकल्प आणि मोठे कालवे यावरच भर दिला. आपल्या राज्याचे सिंचनासाठीचे बजेट दरवर्षी सात ते आठ हजार कोटी आहे. सध्या ७०-८० हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांची कामे सुरू आहेत. नव्या प्रकल्पांची भूमिपूजने सुरूच असतात. यामुळे राजकीय असो किंवा अन्य कारणासाठी असो, उपलब्ध निधी प्रत्येक प्रकल्पासाठी थोडाथोडा उपलब्ध केला जातो. मात्र, यातून कोणत्याच प्रकल्पाचे काम पुढे जात नाही.



**शेवटच्या टप्प्यातील प्रकल्पांना प्राधान्य**

प्रश्न असा आहे की, हे प्रकल्प वेळेत पूर्ण कसे होणार? यासाठी सध्या चालू असलेल्या सर्व प्रकल्पांचे वर्गीकरण करणे आवश्यक झाले आहे. २५ टक्क्यांपर्यंत काम झालेले, २६ ते ५० टक्क्यांपर्यंत काम झालेले, ५१ ते ७५ टक्के आणि ७५ टक्क्यांच्यावर काम झालेले असे हे वर्गीकरण असले पाहिजे. अर्थातच उपलब्ध असलेला जास्तीत जास्त निधी ज्या प्रकल्पांचे काम ७५ टक्क्यांपेक्षा जास्त झाले आहे, ज्यांना आपण लास्ट माईल प्रोजेक्टस् म्हणतो, अशांना दिला पाहिजे. असे झाले तरच हे प्रकल्प पूर्ण होऊन त्याचा दृश्य फायदा शेतकऱ्यांना मिळेल. यादृष्टीने सगळ्याच प्रकल्पांचा सविस्तर आढावा येणे आवश्यक आहे. सरकारने निधीची केलेली तरतूद प्रत्यक्षात उतरली का, एकप्रकारे सरकारने खर्च केलेले पैसे व त्यांचे दृश्य स्वरूपातील परिणाम यांचा ताळमेळ साधला आहे का? याचा कोठेतरी विचार होणे आवश्यक आहे, अशी माझी भूमिका आहे.

**छोटी धरणे आणि कालव्यांचे जाळे**

याचबरोबर कमी खर्चाच्या छोट्या योजना आणि कालव्यांचे जाळे यावरही भर द्यावा लागणार आहे. यामुळे मोठ्या धरणांच्या तुलनेत खर्चही कमी येईल आणि त्या वेळेत पूर्णही होतील. लघु पाणलोट क्षेत्र विकास हाच मला ही परिस्थिती बदलण्यासाठी योग्य उपाय दिसतो. लोकचळवळीच्या माध्यमातून हे शक्य आहे. शासन अशा सर्व प्रयत्नांच्या आणि व्यक्तींच्या मागे ठामपणे उभे राहील हे मी सांगू इच्छितो.

आज सरकार सिंचित क्षेत्र वाढविण्यासाठी प्रयत्न करतेच आहे. सिंचन पद्धतीमध्ये शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने,

## रिटेल एफडीआयचे स्वागत

**आजच्या घडीला नैसर्गिक परिस्थिती आणि इतर कारणांमुळे विशेषतः फळे आणि भाजी उत्पादनाच्या बाबतीत राज्यांना ४० टक्क्यांपर्यंत नुकसान सोसावे लागते. शेतमाल बाजारपेठेतून ग्राहकांपर्यंत पोहोचण्याच्या प्रक्रियेत अनेक दलालांची क्लिष्ट साखळी असते. यामुळे एकीकडे शेतकऱ्यांना कमी भाव मिळतो तर दुसरीकडे ग्राहकांना पाच पट जास्त किमतीचा फटका बसतो. ही बाब लक्षात घेता, रिटेल क्षेत्रातील परकीय गुंतवणुकीबाबत केंद्र शासनाचा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे. शेतकरी, ग्राहक तसेच बेरोजगारांना मोठा लाभ मिळवून देणाऱ्या या गुंतवणुकीमुळे राज्याला फायदाच होईल. सर्वसमावेशक विकासाचा मार्ग त्यामुळे खुला होईल. संपूर्ण अभ्यासांती या निर्णयाची अंमलबजावणी राज्यात करण्यात येईल. रिटेल क्षेत्रात परकीय गुंतवणुकीला परवानगी देणे हा महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय होय. यामुळे शेतकऱ्यांच्या पिकाला जास्त मोबदला मिळेल.**



महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंमलात आला आहे. प्रकल्पांच्या देखभाल दुरुस्तीसाठी शासनाने जागतिक बँकेच्या साहाय्याने, महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प हाती घेतला आहे.

### भारनियमन मुक्ती

निवासी वापर, शेती आणि उद्योग यांच्यासाठी विजेची मागणी सतत वाढत आहे. मागणी आणि पुरवठा यातील तफावतीमुळे राज्याला भेडसावणारा भारनियमनाचा प्रश्न ऊर्जा व्यवस्थापनाच्या माध्यमातून सोडविण्यात आम्हाला बऱ्यापैकी यश आले आहे. डिसेंबरपर्यंत राज्य भारनियमनमुक्त करण्याच्या वचनाशी आम्ही बांधील आहोत आणि त्या दिशेने आमचे प्रयत्न योग्य मार्गाने सुरू आहेत. फिडर सेपरेशनसारखे उपक्रम राबवून वीजचोरी, वीजगळती रोखण्यात चांगले यश आले आहे. जलविद्युत प्रकल्पांतून निर्माण होणारी वीज फार महाग असते. त्यामुळे अपारंपरिक ऊर्जास्रोतांच्या विकासाकडेही प्राधान्याने लक्ष दिले जात आहे.

### प्रशासनातील सुधारणा

पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून आपण संपूर्ण देशासमोर अधिकारांच्या विकेंद्रीकरणाचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे. स्थानिक महिलांना ५० टक्के आरक्षण देऊन त्यांना सक्षम करतानाच एकूणच समाजातील या एका मोठ्या वर्गाला आत्मबळ देण्याचा प्रयत्न केला आहे. आज पंचायत राज व्यवस्थेतील संस्थांच्या कारभाराचे वस्तुनिष्ठ परीक्षण करण्याची गरज आहे. या संस्थांमधील आर्थिक कारभार, प्रशासकीय कारभार, नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा या सर्वांच्या बाबतीत काटेकोर परीक्षण आवश्यक वाटते.

सर्वांत महत्त्वाचे आहे ते प्रशासनात काम करणाऱ्या प्रत्येकाची मानसिकता बदलणे. त्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा आधार घेता येईल किंवा योग्य प्रशिक्षण व्यवस्थेचा. अधिकाराचे अधिक चांगले विकेंद्रीकरण, माहिती यंत्रणा लवचीक करणे आणि तळातील प्रशासकीय यंत्रणेला निर्णयांचे अधिकार देणे या गोष्टी माझ्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

आपल्यासमोर अनेक आव्हाने आहेत, तशाच विकासाच्या संधीही भरपूर आहेत. या संधींचा लाभ घेऊन विकासाची घोडदौड सुरू ठेवून पारदर्शक आणि गतिमान शासनाची प्रचिती सर्वसामान्य लोकांना मिळवून देण्याचा निश्चय मी केला आहे. राज्याच्या विकासाबाबतीत शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून सर्वसामान्य जनतेबरोबरच माझ्याही वेगळ्या अपेक्षा आहेत. छोट्या-छोट्या गोष्टीसाठी सर्वसामान्य माणसाला हेलपाटे घालावे लागणार नाहीत, याची काळजी घेण्याचे आदेश मी सर्व अधिकाऱ्यांना स्पष्टपणे दिले आहेत. त्यासाठी कार्यपद्धतीत काही बदलही करावे लागतील आणि ते निश्चितपणे केले जातील.

देशाच्या राजकारणातील, अर्थकारणातील आणि प्रगतीतील महाराष्ट्राचे स्थान महत्त्वाचे आहे. महाराष्ट्राला उत्तम प्रशासन, आर्थिक शिस्त, प्रगल्भ राजकीय नेतृत्वाची एक परंपरा आहे. ही परंपरा पुढे नेण्याची आणि ती अधिक संपन्न करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविली आहे. मंत्रिमंडळातील माझे सहकारी, प्रशासकीय अधिकारी, जनता यांच्या सहकार्याने समोर असलेल्या आव्हानांचा सामना करीत महाराष्ट्राला स्वच्छ, पारदर्शक, लोकाभिमुख, गतिमान आणि उत्तरदायी सरकार देण्याच्या माझ्या वचनाचा मी पुनरुच्चार करीत आहे.

**(शब्दांकन : सतीश लळीत, सतीश पाटणकर)**

# मराठीसाठी सारे काही




**मराठी भाषा विभागामार्फत मराठी भाषेच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये विविध ज्ञानकोशांची निर्मिती, शब्दकोशांची निर्मिती, मराठी टंकाची निर्मिती, विश्वकोश व भाषा संचालनालयाच्या विविध कोशांचे डिजिटायझेशन (प्रतिमांकन), पुरस्कारप्राप्त मराठी ग्रंथ आणि संत वाङ्मयाचे टॉकबुक्स(बोलकी पुस्तके), ग्रंथोत्सव, छोट्या साहित्य संमेलनांना आर्थिक साहाय्य, बृहन्महाराष्ट्रातील मराठी मंडळांना साहाय्य, बोली भाषा संशोधन, बोली भाषा अकादमी, मराठी भाषा भवन, मराठी भाषा प्रयोगशाळा यांचा समावेश आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून विशेष प्रयत्न केले जात आहेत.**

मराठी भाषेच्या विकासासाठी राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात मराठी भाषेशी संबंधित सर्व संस्था, मंडळे एकाच विभागाच्या कार्यक्षेत्राखाली आणण्याकरिता स्वतंत्र प्रशासकीय विभाग म्हणून मराठी भाषा विभाग स्थापन करण्यात आला.

मराठी भाषा विभागामध्ये मराठी भाषेचे कामकाज पाहणारे भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ यांचा समावेश करण्यात आला. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत हाताळण्यात येणारे साहित्य क्षेत्राशी निगडित वाङ्मय पुरस्कारः- १. श्री. पु. भागवत पुरस्कार, २. उत्कृष्ट वाङ्मय राज्य पुरस्कार, ३. विंदा करंदीकर पुरस्कार. या वर्षापासून मराठी भाषा विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले आहेत. मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय पुरस्काराची रक्कम रुपये ५० हजारांवरून रु. १ लाख इतकी करण्यात आली.

### साहित्य आणि संस्कृती मंडळ

साहित्य आणि संस्कृती मंडळ यामार्फत विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान, समाजविद्या यांच्या कक्षेत येणारे विषय तसेच मराठी भाषा, संस्कृती व इतिहास या विषयावर मराठीमध्ये ग्रंथरचना करण्यासाठी विविध वाङ्मयीन योजनांना चालना देणे, मदत करणे इत्यादी कामे केली जात आहेत. महाराष्ट्रात झालेल्या सामाजिक व सांस्कृतिक स्थित्यंतराचा इतिहास तयार करणे, मराठी व्युत्पत्ती कोश, हस्तकला कोश, खाद्यसंस्कृती कोश, वेषभूषा आणि अलंकार कोश तयार केले जात आहेत. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी ग्रंथोत्सव आयोजित करणे, महाराष्ट्राच्या विविध भागात होणारी छोटी साहित्य संमेलने, बृहन्महाराष्ट्रातील मंडळांना अर्थसाहाय्य करणे, दर्जेदार दुर्मीळ ग्रंथ संकेतस्थळावर टाकणे, संतवचनांचे तसेच दर्जेदार मराठी ग्रंथांचे देशी-विदेशी भाषांमध्ये भाषांतर करणे असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

### विश्वकोश निर्मिती मंडळ

एन्सायक्लोपिडीया ब्रिटानिकाच्या धर्तीवर देश-विदेशातील सारे शब्द, त्यामागचा इतिहास, भूगोल, तत्त्वज्ञान, विज्ञान हे सर्व मराठीतून ज्ञानार्थींना मिळावे या उद्देशाने मराठी विश्वकोश निर्मितीचा प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्यानुसार एन्सायक्लोपिडीया ब्रिटानिकाच्या धर्तीवर मराठी भाषेमध्ये विश्वकोशाचे आकारविल्हे संपादन व प्रकाशनाचे कार्य चालू असून प्रस्तावित २३ खंडांपैकी आतापर्यंत १८ खंड प्रकाशित झाले आहेत. उर्वरित खंडांचे काम सुरू आहे. विश्वकोशाचे १ ते १८ खंड महाजालावर (इंटरनेट) टाकण्याचे काम सुरू असून आतापर्यंत ११ खंड मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या www.vishwakosh.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. उर्वरित खंड डिसेंबर, २०१२ पर्यंत महाजालावर उपलब्ध करून देण्यात येतील. या वाङ्मयीन कार्याबरोबरच जगातील सर्व मराठी भाषिकांना विश्वकोशातील माहिती व ज्ञान सहज आणि विनामूल्य प्राप्त व्हावे म्हणून प्रकाशित खंड युनिकोडद्वारे संकेतस्थळावर टाकण्याचे काम सुरू आहे.

मुलांची जिज्ञासू वृत्ती जोपासली जावी, त्यांना विश्वाचे ज्ञान मिळून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने जागतिक पातळीवर तज्ज्ञांचे सहकार्य घेऊन मुलांचा विश्वकोश दोन भागांत पूर्ण करण्यात येईल. यामध्ये बालविश्वकोश १ ते १२ भाग (वयोगट ८ ते १४) आणि कुमार विश्वकोश १ ते १२ भाग (वयोगट १५ ते १८) यांचा समावेश आहे. महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रांतील नामवंत व कर्तबगार सुमारे २५० महाराष्ट्र कन्यांचा परिचय असलेला कन्याकोश प्रकाशित करण्यात येणार आहे.

### राज्य मराठी विकास संस्था

विविध क्षेत्रांत होणारा मराठीचा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होत जाण्यासाठी व मराठी भाषेची गुणात्मकता वाढण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम घेण्यात आले आहेत. त्याअंतर्गत मोडी भाषेचे देवनागरीकरण, अमराठी भाषकांसाठी मराठी पाठ्यपुस्तके, नगरपालिका / नगर परिषदा / महानगरपालिका क्षेत्रात मराठीचा वापर करण्याबाबत स्पर्धा, मराठी भाषेचे मुक्तस्रोत

## मराठी भाषा संवर्धन

भाषा संचालनालयाअंतर्गत कायमस्वरूपी भाषा सल्लागार समितीची स्थापना केली आहे.

राज्यातील न्यायदानात मराठीचा वापर करण्यासाठी केंद्र व राज्य शासनातर्फे करण्यात आलेल्या विद्यमान तसेच भविष्य काळात मंजूर करण्यात येणारे अधिनियम/ नियम यांचा अचूक मराठी अनुवाद उपलब्ध करण्यासाठी सन १९९२ मध्ये समिती गठित करण्यात आली. या समितीस कायमस्वरूपी मुदतवाढ देण्यात आली आहे.

भाषा आणि साहित्यविषयक उपक्रम एकत्रित राबविण्यासाठी मुंबई येथे भाषा भवन उभारण्यात येईल. राज्य शासनाची भाषा व साहित्य यांच्याशी संबंधित सर्व कार्यालये या भाषा भवनात असतील. मराठी बोली अकादमीकरिता भाषा भवनात वेगवेगळी दालने व आवश्यक त्या सोयीसुविधा असणार आहेत. आवश्यकतेनुसार मराठी भाषा प्रयोगशाळांची स्थापना करण्यात येणार आहे.

युनिकोड टंक निर्मिती, मराठीतील पुरस्कारप्राप्त निवडक पुस्तकांचे आणि त्याचप्रमाणे संत वाङ्मय दासबोध, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा यांचे टॉकबुक्स, शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर जनतेस उपलब्ध करून देणे/ध्वनीफित तयार करणे, असे उपक्रम राबविण्यात येत आहेत.


**भाषा संचालनालय**

सर्व परिभाषा कोश लिखित स्वरूपात असल्याने त्यांचे प्रतिमांकन (डिजिटायझेशन) केले जात आहे. त्यामुळे सर्व स्तरावरील शासकीय कार्यालये, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी निरनिराळ्या ज्ञानशाखा, तंत्र विज्ञान आणि विधी व प्रशासन यामध्ये अध्यापन करणारी मंडळी व सामान्य जनता यांच्यासाठी हे परिभाषा कोश संकेतस्थळावर उपलब्ध होतील. परिभाषा कोशांचे प्रतिमांकन करून ते http://gms.maharashtra.gov.in/bhasha या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. ४८ पुस्तकांपैकी ४५ पुस्तके सध्या बघता येतात.

भारताच्या संविधानाच्या ६ व्या आवृत्तीच्या २ हजार मराठी प्रतींच्या पुनर्छपाईचे काम शासकीय मुद्रणालयाकडे देण्यात आले आहे. तसेच, भारतीय संविधानाच्या १० हजार प्रतींची डिग्लॉट (मराठी-इंग्रजी) स्वरूपात छपाई करण्यात येईल.

मराठी भाषा अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी पात्र ठरते किंवा नाही याबाबतचा अभ्यास करून केंद्र शासनाकडे परिपूर्ण प्रस्ताव पाठविण्यासाठी शासनाने प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली भाषा तज्ज्ञांची एक समिती स्थापित केली आहे. या समितीतर्फे याबाबतचा प्रस्ताव संपूर्ण पुराव्यानिशी तयार करून तो केंद्र शासनाकडे सादर करण्यात येणार आहे.

**(शब्दांकन : विष्णू काकडे)**




# गतिमानतेला आधुनिकतेची जोड

**सकाळ व सायंकालीन न्यायालये :** प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी उपलब्ध राज्यात अंदाजे २०० सकाळची व २०० सायंकालीन न्यायालये सुरू करण्यात आली.

न्यायालयांतील जुनी व निरर्थक प्रकरणे काढून टाकण्यासाठी राज्यस्तरीय समिती मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली.

**ग्राम न्यायालये :** राज्यात १० ठिकाणी ग्राम न्यायालये कार्यान्वित झाली आहेत. राज्यात प्रायोगिक तत्त्वावर एकूण २५ ग्राम न्यायालये स्थापन करण्यासाठी शासनाने मान्यता दिली आहे. उच्च न्यायालय ठरवेल त्या ठिकाणी ग्राम न्यायालये स्थापन करण्यात येणार आहेत.

**आर्थिक अपील अधिकारितेत वाढ :** जिल्हा न्यायालयाची आर्थिक अपील अधिकारिता २ लाख रुपयांवरून १० लाख रुपये आणि दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यांच्या न्यायालयाची आर्थिक अधिकारिता १ लाख रुपयांवरून ५ लाख रुपये करण्यात आली.

**ई-चलन पद्धत :** मुंबई उच्च न्यायालय फी सुधारणा अधिनियम प्रसिद्ध करण्यात आला आहे. सुधारणेमुळे न्यायालयीन फीचा भरणा व परतावा करण्यासाठी ई-चलन पद्धतीचा वापर करण्यात येत आहे.

**अभिलेखकांचे डिजिटायझेशन :** धर्मादाय आयुक्त, मुंबई व निबंधक भागीदारी संस्था यांच्या कार्यालयातील अभिलेखकांचे डिजिटायझेशन करण्यात येणार आहे. संगणकाद्वारे ऑनलाइन अर्ज करण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा उभारण्यास सुरुवात झाली आहे. निबंधक भागीदारी संस्था या कार्यालयाकरिता भागीदारी संस्थांची नोंदणी, घटनेतील बदल इत्यादी प्रक्रिया ऑनलाईन नोंदणीकरिता rpf.maharashtra.gov.in ही Software Application संगणकीय प्रणाली तयार करण्यात आली आहे.

**जलदगती न्यायालये :** केंद्र सरकारचे अनुदान मार्च २०११ पासून बंद झाल्यामुळे राज्य शासनाने निधी उपलब्ध करून देऊन जलदगती न्यायालये सुरू ठेवली आहेत. त्यासाठीचा खर्च राज्य शासन करीत आहे. राज्यात सध्या ८५ जलदगती न्यायालये कार्यरत आहेत. ही न्यायालये एप्रिल २०११ मध्ये स्थापन झाली. तेव्हापासून गेल्या वर्षभरात ६९,८०८ दिवाणी व फौजदारी दावे निकाली काढण्यात आले.

**प्रलंबित प्रकरणांचा निपटारा**

मुंबईतील न्यायालयांमध्ये प्रलंबित प्रकरणांचा त्वरेने निपटारा करण्यासाठी मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांच्या अधिपत्याखालील १० महानगर दंडाधिकारी न्यायालये यांची नव्याने स्थापना करण्यात आली आहेत.

**आर्थिक अधिकारितेत वृद्धी :** मुंबई शहर दिवाणी न्यायालयाची आर्थिक अधिकारिता ५० हजार रुपयांवरून १ कोटी इतकी वाढविण्यात आली आहे.

**केंद्रीय गुन्हा अन्वेषण विभागासाठी विशेष न्यायालये :** सी.बी.आय.कडून दाखल झालेली प्रकरणे चालविण्यासाठी मुंबई येथे ३ तसेच पुणे, नागपूर व अमरावती येथे प्रत्येकी १ अशा प्रकारे एकूण ६ विशेष न्यायालय स्थापन करण्यात आली.

**न्यायालयीन इमारती व न्यायाधीशांची निवासस्थाने :** विधी व न्याय विभागासाठी २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी नियोजन विभागाने राज्याचा वाटा म्हणून रुपये १६७ कोटी नियतव्यय मंजूर केला. तसेच केंद्र सरकारकडून रुपये १३१ कोटी या विभागास मंजूर होणे अपेक्षित आहे. त्यानुसार एप्रिल, २०१२ मध्ये रुपये २९८ कोटी नियतव्यय अर्थसंकल्पित करण्यात आला.

२०१२-१३ या आर्थिक वर्षात एप्रिल, २०१२ व जुलै, २०१२ मध्ये एकूण १०७ न्यायालयीन इमारती ९६ ठिकाणी न्यायाधीश निवासस्थाने व २५ तद्अनुषंगिक कामे अशा एकूण २२८ कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला.






# ई-महाराष्ट्र

**नागरिकांना शासनाकडून मिळणाऱ्या सेवा-सुविधा या ते राहत असलेल्या गावामध्ये एकाच ठिकाणी मिळाव्यात यासाठी राज्यात एकूण ११,८१८ एवढी महा-ई-सेवाकेंद्रे स्थापन करण्यात येतील. शासनाकडून नागरिकांना, व्यावसायिकांना आणि शासकीय कार्यालयाकडून शासनास मिळणाऱ्या सेवा उपलब्ध करून देण्यासाठी डाटा सेंटर स्थापन करण्यात येतील. या डाटा सेंटरमध्ये येणाऱ्या सर्व माहितीचे संकलन करण्याचे काम केले जाणार आहे. सद्य:स्थितीत या व्यवस्थेअंतर्गत डाक्युमेंट जर्नी मॅनेजमेंट सिस्टिम (डीजेएमएस) ई-डिस्ट्रिक्ट वेबसाइट, महाऑनलाईन प्रकल्प कार्यरत आहेत.**

शासनाने गतिमान आणि पारदर्शक कार्यपद्धतीसाठी संगणकीय प्रणालीचा वापर करण्याचे ठरविले आहे. त्या पार्श्वभूमीवर शासनाच्या कामकाजात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना विनासायास सेवा पुरविण्यासाठी ई-गव्हर्नन्स धोरण तयार करण्यात आले आहे. ज्यामधून प्रशासकीय कामकाजामध्ये खर्च होणारा वेळ आणि मनुष्यबळ यांचा योग्य वापर करणे शक्य होईल. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने दि. २३ सप्टेंबर, २०११ च्या शासन निर्णयाप्रमाणे ई-गव्हर्नन्स धोरणाची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे.

या धोरणानुसार प्रशासकीय यंत्रणेला ऑनलाईन पद्धतीने एकमेकांशी जोडण्यात येणार असून मुख्यालय, विभागीय आणि जिल्हा या तिन्ही स्तरांवर शासकीय कार्यालय, संघटनामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे अनिवार्य ठरविण्यात आले आहे.

कमी वेळात व्यापक कार्यक्षेत्रात माहितीची देवघेव करण्याच्या दृष्टीने सुरक्षित नेटवर्क असणे आवश्यक ठरते. हे लक्षात घेऊन राज्यातील सहा विभागीय मुख्यालये ३५ जिल्हे, ३२४ तालुके एमएसवॅनच्या माध्यमातून राज्याच्या मुख्यालयांना जोडली जातील. या नेटवर्क बांधणीचे ९४ टक्के काम आतापर्यंत पूर्ण झाले आहे. या अंतर्गत सहा विभागीय कार्यालये ३५ जिल्हे व ३०५ तालुके राज्य मुख्यालयाशी जोडण्यात आली आहेत. स्थनिक स्तरावर पोलीस, रोजगार व स्वयंरोजगार, कोषागरे, जिल्हा परिषदा ही कार्यालये जोडण्यात आली आहेत. न्यायालये, महानगरपालिका इ. उर्वरित कार्यालयेदेखील लवकरच जोडण्यात येतील.

ई-गव्हर्नन्स धोरणाची अंमलबजावणी प्रभावीरीत्या करीत असताना राज्याच्या प्रशासनाचा मध्यबिंदू असलेल्या जिल्हा या घटकावर प्राधान्याने लक्ष देण्यात येत आहे. जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदसारख्या कार्यालयाकडून नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये गुणात्मक वाढ आणि सुधारणा करण्यासाठी ई-डिस्ट्रीक ही संकल्पना टप्प्याटप्प्यात राबविण्यात येईल. पहिल्या टप्प्यात १० सेवा या प्रकल्पाच्या माध्यमातून पुरविण्यात येतील. शासकीय कामकाजामध्ये पारदर्शकता हे महत्त्वाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान कार्यपद्धती उपयुक्त ठरेल. या तंत्रज्ञानाचा स्वीकार करून शासकीय विभागातील रु. १ कोटी आणि त्यावरील खरेदीसाठी तसेच ५० लाख व त्यावरील खरेदीसाठी १ ऑक्टोबर, २०१० पासून ई-टेंडरिंग पद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे. शासनाकडून करावयाच्या खरेदी व्यवहारात पारदर्शकता आणणे हा या पद्धतीचा मुख्य उद्देश आहे. प्रशासकीय कामकाज गतिमान होण्यासाठी नुकतीच ई-फाइलिंग पद्धत सुरू केली आहे.

**(शब्दांकन : विष्णू काकडे)**

## आधार-देशात अग्रेसर




**देशातील रहिवाशांची जैवशास्त्रीय माहिती संकलित करून त्यांना विशिष्ट ओळख क्रमांक देण्यासाठी सुरू करण्यात आलेली महत्त्वाकांक्षी आधार योजना राज्यात माहिती तंत्रज्ञान संचालनालयामार्फत राबविली जात आहे. २९ सप्टेंबर २०१२ पासून नंदुरबार जिल्ह्यातून पंतप्रधानांच्या हस्ते आधार योजनेचा आरंभ करण्यात आला. हा प्रकल्प राज्यातील सर्व जिल्हा व महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येत असून या अंतर्गत २ ऑगस्ट, २०१२ पर्यंत सुमारे ५ कोटी इतक्या रहिवाशांची नोंदणी झाली आहे. ही योजना राबविण्यात महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर ठरले आहे. मार्च २०१३ पर्यंत बहुसंख्य रहिवाशांची नोंदणी करण्यात येईल. आधार कार्ड काढण्यासाठी लोकांना लांब जावे लागू नये यासाठी आधार कार्ड हाऊसिंग सोसायटी आणि कॉर्पोरेट हाऊसच्या परिसरात नोंदणी केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

**केंद्र शासनाने आधार नोंदणी व आधार उपयोगिता प्रकल्प यासाठी राज्याची प्रथम पारितोषिकासाठी निवड केली आहे.**

# सर्वाधिक विशाल उद्योग महाराष्ट्रात



**नारायण राणे**
उद्योग, बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार मंत्री

महाराष्ट्र देशातील सर्वांत मोठी अर्थव्यवस्था असलेले राज्य आहे. प्रगती, विकास, उद्योगराष्ट्र हे राज्याचे समीकरण असून महाराष्ट्राने प्रारंभापासूनच औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्याचा अग्रक्रम कायम ठेवला. जगातील वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थेमध्ये आपले राज्य गणले जाते. एकूण राष्ट्रीय उत्पन्नामध्ये महाराष्ट्राचा सर्वाधिक १२.४३ टक्के वाटा असून गुजरातचा वाटा ७.२९ टक्के तर बिहारचा वाटा ३.१६ टक्के आहे. राज्याचे दरडोई उत्पन्न ८३ हजार ४७१ आहे. गुजरातचे ७५ हजार ११५, तर बिहारचे २० हजार ७०८ आहे.

राज्याच्या अर्थव्यवस्थेत मागील तीन वर्षांत सरासरी वाढ ९ टक्के राखण्यात आपणास यश आले. देशातील औद्योगिक उत्पादन व नक्त मूल्य वृद्धीमध्ये राज्याचा २० टक्के वाटा आहे. औद्योगिकीकरणामुळे सेवाक्षेत्रातील स्थूल उत्पादनातील वाटा ५९ टक्के आहे. हे साध्य करण्यासाठी उद्योग विभागाने नवीन उद्योजकांसाठी पायाभूत सोयीसुविधा, साधनसामग्री यांची सुयोग्य उपलब्धता करून दिली आहे. त्यामुळे औद्योगिक गुंतवणुकीकरिता पोषक वातावरण राज्यात निर्माण झाले आहे. परिणामी, राज्यात १७,५८३ औद्योगिक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. ९,२२,६८३ कोटींची गुंतवणूक केली आहे यातूनच ४४.२२ लक्ष रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे. यापैकी ७,३६० प्रकल्पांनी उत्पादनही सुरू केले.

भविष्यातील गरज व सर्वांगीण प्रगती डोळ्यांसमोर ठेवून राज्याची औद्योगिक विकासात आघाडी कायम राहावी यासाठी शासनाने नवे औद्योगिक धोरण तयार केले आहे. या धोरणात लघु व मध्यम उद्योजकांचा प्राधान्याने विचार करण्यात आला असून ग्रामीण व मागास भागात रोजगार निर्माण व्हावे, हे नव्या औद्योगिक धोरणाचे मूलभूत सूत्र आहे.

**विशाल उद्योग धोरणाचा फायदा**

देशातील पुरोगामी व मोठ्या उद्योजकांची पहिली पसंती असणारे हे राज्य आहे. राज्याचा गतीने व समतोल विकास व्हावा यासाठी अविकसित भागात जास्तीत जास्त विशाल प्रकल्प आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. स्थानिक लोकांना रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने विशाल प्रकल्पांच्या गुंतवणुकीची मर्यादा निश्चित केली, त्यामुळे राज्यात अधिक गुंतवणूक आकर्षित झाली. या विशाल प्रकल्प धोरणात अविकसित भागात जास्तीत जास्त विशाल प्रकल्प आकर्षित होऊन स्थानिक लोकांना रोजगारांच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. विशाल प्रकल्प धोरणांतर्गत देशी-विदेशी गुंतवणूकदेखील मोठ्या प्रमाणावर झाली.

## ठळक नोंदी

- मिहान व अन्य विशेष आर्थिक क्षेत्राच्या विकासकांना आर्थिक सवलती.
- दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडोर प्रकल्पाची अंमलबजावणी.
- माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा धोरण.
- सूक्ष्म, लघु, मध्यम, मोठ्या व विशाल औद्योगिक उपक्रमांमध्ये किमान ८० टक्के स्थानिक लोकांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य.




**देशातील सर्वच राज्यांत उद्योग उभारणीमध्ये प्रचंड स्पर्धा सुरू असताना महाराष्ट्राने अग्रक्रम कायम राखला. विशाल प्रकल्पांतर्गत सर्वाधिक उद्योग महाराष्ट्रात उभारले गेले आहेत. राज्यात सर्वात जास्त विदेशी गुंतवणुकीचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. केंद्र शासनाने एकूण ४,४०१ थेट विदेशी गुंतवणुकीच्या प्रस्तावांना मंजुरी दिली असून त्यामध्ये ९०,८५० कोटी रुपये एवढी गुंतवणूक अपेक्षित आहे. केंद्र शासनाने मंजुरी दिलेल्या एकूण प्रस्तावात राज्याचा २३ टक्के वाटा आहे. जास्तीत जास्त रोजगार निर्मिती करणारे उद्योग महाराष्ट्रात असून मोठ्या प्रमाणात थेट परदेशी गुंतवणूक झाली आहे. देशातील एकूण थेट परदेशी गुंतवणुकीपैकी ४२ टक्के गुंतवणूक आपल्या राज्यात प्रत्यक्षात अंमलात आली आहे.**

**छोट्या उद्योगांना प्राधान्य**

विशाल व अतिविशाल प्रकल्पांना प्रोत्साहन देण्याबरोबरच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाच्या विकासाकरिता सर्वंकष दृष्टिकोन, रोजगाराभिमुख उद्योगांच्या वाढीकरिता पुढाकार घेणे, गुंतवणुकदारांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देणे, औद्योगिक विकासासाठी जमिनीचा पर्याप्त वापर करणे, पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करणे, असक्षम आजारी उद्योगांच्या साहाय्यासाठी व सक्षम आजारी उद्योगांच्या पुनर्वसनाकरिता साहाय्य करणे, उद्योगांना शाश्वत विकासाकरिता प्रोत्साहन देणे, वैश्विक बदल व काळाचा विचार करून शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.


**(शब्दांकन : काशिबाई थोरात)**






# विकासाचा महामार्ग

**वाढती लोकसंख्या, विकेंद्रित औद्योगिकीकरण, पर्यटन क्षेत्राचा विकास, दळणवळणाची सुधारणा या सर्व बाबी विचारात घेऊन राज्य शासनाने सन २००१-२१ चा २० वर्षीय रस्ते विकासाचा आराखडा तयार केला आहे. या आराखड्यानुसार राज्यात एकूण ३.३७ लक्ष कि.मी. लांबींच्या रस्त्यांचे जाळे विकसित करण्यात येईल. हा आराखडा तयार करताना मुख्यत्वे १०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्येची गावे किमान एका बारमाही रस्त्याने जोडणे, जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी रिंगरोडची सुविधा, सर्व जिल्हा मुख्यालयांना किमान चौपदरी रस्त्याने जोडणे, सर्व तालुके मुख्यालयांना बायपासची सुविधा या कामांवर लक्ष केंद्रित करण्यात येईल.**



**छगन भुजबळ**
सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) आणि पर्यटन मंत्री

'ज्या राज्याचे रस्ते उत्तम ते राज्य श्रीमंत' असे अब्राहम लिंकन यांनी म्हटले होते. त्यांच्या या कथनाद्वारे राज्याच्या प्रगतीसाठी रस्ते विकासाचे महत्त्व अधोरेखित आहे. महाराष्ट्रात गेल्या तीन वर्षांत सार्वजनिक रस्त्यांचे फार मोठे बांधकाम झाले आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पर्यटन मंत्री छगन भुजबळ यांनी या विभागाला गतिमान केले आहे.

### महाराष्ट्रातील रस्ते विकास

राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी रस्ते विकासाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. केंद्र शासनाच्या निकषानुसार रस्ते विकास हा २० वर्षीय आराखड्यानुसार करण्यात येतो. सद्य:स्थितीत सन २००१-२१ च्या आराखड्यानुसार रस्त्यांचा विकास करण्यात येत आहे. यापूर्वी सन १९८१-२००१ च्या आराखड्यानुसार रस्ते विकास कार्यक्रम घेण्यात आला. त्यानुसार, आतापर्यंत २,४१,७१२ कि.मी. लांबीचे रस्ते विकसित केले गेले. यामध्ये १,०६,४०० कि.मी. लांबीचे ग्रामीण मार्ग आहेत.

केंद्रीय मार्ग निधी योजनेंतर्गत राज्यातील राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांच्या नूतनीकरणासाठी केंद्र शासनाकडून १०० टक्के अनुदान प्रतिपूर्ती तत्त्वावर मंजूर करण्यात येते. या योजनेंतर्गत आंतरराज्य व आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या रस्त्यांचा समावेश करण्यात येतो. या योजनेंतर्गत सन २००१-२००२ पासून आतापर्यंत यापैकी ५७४ कामे पूर्ण झाली आहेत. १०७ कामे पूर्णत्वाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर आहेत.

### नाबार्ड कर्जसाहाय्य

नाबार्ड या वित्तीय संस्थेकडून रस्ते विकासासाठी राज्यास कर्जसाहाय्य मंजूर करण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्याचे व इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गावरील पुलांचे प्रकल्प घेण्यात येतात.



**राज्यातील रस्ते**

**राष्ट्रीय महामार्ग: ४,३७६ कि.मी.**
**राज्यमार्ग: ३४,१०३ कि.मी.**
**प्रमुख जिल्हा मार्ग: ४९,९३६ कि.मी.**
**इतर जिल्हा मार्ग : ४६,८९७. कि.मी.**

ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत ८८७ कामांचा प्रस्ताव नाबार्डकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. या योजनेंतर्गत २००९-१० मध्ये ९०५ कामांना मंजुरी मिळाली असून, त्यापैकी ६९२ कामे पूर्ण झाली आहेत आणि २१३ कामे पूर्णत्वाच्या विविध टप्प्यावर आहेत. २०१०-११ मध्ये ११२ कामे पूर्ण झाली. ४५१ कामे प्रगतिपथावर आहेत. २०११-१२ मध्ये मंजूर झालेली ७४१ कामे वेगाने पूर्ण करण्यात येत आहेत.

नक्षलग्रस्त भागाच्या सर्वांगीण विकासासाठी व नक्षलवादी कारवायांना आळा घालण्याच्या दृष्टीने केंद्र शासन देशातील ३३ नक्षलग्रस्त जिल्ह्यांसाठी विशेष कार्यक्रम राबवित आहे. त्याअंतर्गत नक्षलग्रस्त भागातील दळणवळण सुधारण्याची कामे करण्यात येत आहेत. या योजनेअंतर्गत राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्गावरील कामे सार्वजनिक बांधकाम विभाग तर ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गांची कामे पंतप्रधान ग्राम सडक योजनेअंतर्गत ग्रामविकास विभागामार्फत करण्यात येत आहेत. या कार्यक्रमांतर्गत गडचिरोली जिल्ह्यातील मंजूर झालेल्या २२ कामांची लांबी ३७२.११ कि.मी. असून त्यात ६ पूल आहेत. त्यातील तीन कामे पूर्ण झाली असून १२ कामे प्रगतिपथावर आहेत.

गोंदिया जिल्ह्यांतील मंजूर झालेल्या सात कामांची लांबी ९६.३० कि.मी. असून अंदाजित किंमत ८९.८५ कोटी रु. आहे. त्यापैकी पाच कामे पूर्ण तर दोन प्रगतिपथावर आहेत.

# पर्यटकांसाठी रेड कार्पेट, टूर ऑपरेटर्ससाठी सिंगल विंडो

राज्यातील समृद्ध निसर्ग, वनवैभव, गडकिल्ले, तीर्थक्षेत्रे या सर्व बाबी अनमोल ठेवा असून, पर्यटन क्षेत्राची समृद्धी वाढवण्याची क्षमता त्यामध्ये आहे. महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्राचा अधिकाधिक विकास करण्याचा संकल्प पर्यटन मंत्री छगन भुजबळ यांनी केला आहे. त्या अनुषंगाने पर्यटन विभाग आणि महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाद्वारे नावीन्यपूर्ण आणि देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करणारे विविध उपक्रम राबविले जात असून पर्यटन क्षेत्राचा विकास वैशिष्ट्यपूर्णरीत्या केला जात आहे.

पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी २१५ कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. प्रादेशिक पर्यटन विकास महामंडळामार्फत विविध प्रकल्प राबविले जात आहेत. गडकिल्ले विकास, सागरी तट किनारे विकास, पर्यटन स्थळ विकास, अष्टविनायक येथे पर्यटकांसाठी सोयीसुविधा त्याचप्रमाणे लोणार सरोवर सुशोभीकरणावर भर देण्यात येत आहे. २००६ साली जाहीर केलेल्या पर्यटन धोरणाच्या अंमलबजावणीत असलेल्या अडचणी दूर करण्यात आल्या आहेत.

**युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून घोषित केलेल्या अजिंठा व वेरुळ येथे भव्यदिव्य अशी आंतरराष्ट्रीय दर्जाची व्हिजिटर सेंटर उभारण्याची कार्यवाही सुरू आहे. अजिंठा पर्यटन केंद्र ५७.४६ कोटी तर वेरुळ पर्यटन केंद्र ३८.६२ कोटी रुपयांचे आहे. या प्रकल्पाचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. पुढील वर्षी म्हणजे २०१४ मध्ये यांचे उद्‌घाटन होणार असून पर्यटकांसाठी ही केंद्रे खुली होतील.**

पर्यटकांना राज्यात अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून त्यांना आकर्षित करण्यासाठी विविध उपक्रमही राबविले गेले.

**रेड कार्पेट**

मुंबई येथे नुकतीच ऑल इंडिया टूर ऑपरेटर्स असोसिएशनची कॉन्फरन्स घेण्यात आली. त्यासाठी देश-विदेशातून १५०० प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन पर्यटकांसाठी सिंगल विंडो योजना व रेड कार्पेट सुविधा देण्याचे ठरविले गेले. यामुळे राज्याच्या पर्यटन विकासास मदत होणार आहे.

राज्यातील पर्यटनास चालना देण्यासाठी औरंगाबाद येथे विविध देशांच्या महावाणिज्य दूतांची परिषद भरविण्यात आली होती. या परिषदेस ३८ महावाणिज्यदूत उपस्थित होते. त्यांनी महाराष्ट्राच्या पर्यटनाची ओळख त्यांच्या देशातील नागरिकांपर्यंत पोहोचवावी असा उद्देश या परिषदेचा होता. पर्यटन जिल्हा असलेल्या सिंधुदुर्ग येथील तोंडवली येथे ५१० कोटी रुपयांच्या सी-वर्ल्ड प्रकल्पास मान्यता मिळाली आहे. सह्याद्रीच्या उंच डोंगरावर वसलेले अतिविशाल गडकिल्ले देखणा समुद्रकिनारा; महाराष्ट्राचीच नव्हे, तर देशातील विविध जातीधर्मांची श्रद्धास्थाने असलेली धार्मिक स्थळे, यांचा विकास पर्यटन विभागामार्फत होत आहे.

**(शब्दांकन : राजू पाटोदकर)**









**महाराष्ट्राच्या पर्यटनाचे भूषण असलेली डेक्कन ओडिसी ही लक्झरी ट्रेन शिर्डी, त्र्यंबकेश्वर या मार्गावर प्रस्तावित आहे. नाशिक परिसर वाईन टूरिझम म्हणूनसुद्धा विकसित करण्यात येणार आहे.**

# हायटेक पोलीस दल



**आर. आर. पाटील**
गृह मंत्री

**राज्याच्या पोलीस दलाने कात टाकली असून ते हायटेक झाले आहे. जुन्या ३०३ एसएलआर सारख्या हत्यारांची जागा आता एम-फाईव्ह, एके-४७ सारख्या अत्याधुनिक हत्यारांनी घेतली आहे. वेगवान, बुलेटप्रूफ वाहनांबरोबरच सागरी सुरक्षेसाठी स्पीड बोटी आणि डे-व्हिजन बायनाक्युलर्स, सर्चलाईट, पिस्तोल, मॅगेझिन्स, बुलेटप्रूफ हेल्मेट, कार्बाईन, ग्रेनेड लॉन्चर्स यासारखी अत्याधुनिक उपकरणे पोलीस आधुनिकीकरणातून राज्याला उपलब्ध होऊ लागली आहेत. बदलत्या तंत्रज्ञानाचा, आव्हानांचा विचार करून पोलीस दलाच्या सक्षमीकरणाची प्रक्रिया वेगाने सुरू आहे.**

राज्यातील कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवणाऱ्या गृह विभागाच्या कामात अलीकडच्या काही वर्षांत बराच बदल झाला आहे. नियमित गुन्ह्यांबरोबरच दहशतवाद, नक्षलवाद, सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे अशा विविध आघाड्यांवर राज्याचे पोलीस लढत असून या पोलीस दलाच्या आणि पर्यायाने गृहविभागाच्या बळकटीकरणासाठी गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.

मुंबईवर झालेल्या २६/११ च्या अतिरेकी हल्ल्यानंतर नेमण्यात आलेल्या न्या. राम प्रधान समितीने सुचविलेल्या उपाययोजनांची गृह विभागाने अंमलबजावणी केली आहे. गुप्तवार्ता विभागाचे सक्षमीकरण करीत असताना गुप्तवार्ता अधिकाऱ्यांची संख्या वाढविण्यात आली. देशात पहिली गुप्तवार्ता अकादमी (इंटेलिजन्स ॲकॅडमी) राज्यात सुरू झाली असून तिच्या माध्यमातून तीन हजारपेक्षा अधिकाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आले. खाजगी संस्थांच्या आस्थापनांना सुरक्षा पुरविण्यासाठी सीआयएसएफच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची स्थापना करण्यात आली असून त्याचा कारभार सुरू झाला.

मुंबई महानगरातील सुरक्षेसाठी शासन, निमशासकीय आणि खाजगी संस्थांच्या वतीने एकूण १३ हजारांपेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्याशिवाय नव्याने ५ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आणि त्याची प्रक्रियादेखील सुरू करण्यात आली. टप्प्या-टप्प्याने इतर महानगरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येतील.

राज्यातील आर्थिक गुन्ह्यांचे स्वरूप लक्षात घेता ते हाताळण्यासाठी प्रत्येक जिल्हा आणि पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखेंतर्गत आर्थिक गुन्हे शाखेची निर्मिती करण्यात आली. पोलिसांची क्षमता वृद्धी करण्याबरोबरच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून घडणाऱ्या गुन्ह्यांच्या प्रतिबंधासाठी आवश्यक तो कौशल्याधारित अभ्यासक्रम पोलीस प्रशिक्षणामध्ये समाविष्ट करण्यात आला. पोलीस गृहनिर्माण महामंडळाच्या वतीने पोलिसांसाठी निवासस्थाने बांधण्याबरोबरच प्रशासकीय वापराच्या इमारती इको-फ्रेंडली करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. मालकी हक्काची घरे देण्याचा प्रकल्प पनवेलनजीक राबविण्यात येत असून या प्रकल्पामुळे पोलिसांना हक्काची घरे उपलब्ध होतील. राज्यातील विविध मोठ्या खाजगी आस्थापनांचे सिक्युरिटी ऑडिट करण्यात आले.

### नक्षल कारवाया रोखण्यासाठी यंत्रणा

गडचिरोलीच्या विकासासाठी सरकार प्रामाणिक प्रयत्न करीत असून विकासकामांची आवश्यकता पाहता गडचिरोलीत आरोग्य, शिक्षण, सिंचन, रस्ते, शेतीविषयक विविध उपक्रम हाती घेतले. गृहमंत्री आर. आर. पाटील हे गडचिरोलीचे पालकमंत्री असून त्यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात राबविलेल्या सामाजिक सुरक्षा अभियानाला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सामाजिक न्यायाच्या विविध १७ योजनांचा समावेश असलेल्या या अभियानाचा १ लाख ८८ हजारांपेक्षा अधिक ग्रामस्थांनी लाभ घेतला. विकासाची अनेक कामे गडचिरोली जिल्ह्यात सुरू आहेत. पोलीस उपमहानिरीक्षकांचे कार्यालय सुरू करण्याबरोबरच गडचिरोली आणि अहेरी या दोन पोलीस जिल्ह्यांची निर्मिती करण्यात आली. २३५० पेक्षा अधिक पोलिसांची भरती गेल्या दोन वर्षांत या ठिकाणी करण्यात आली असून त्यात ८० टक्क्यांपेक्षा अधिक स्थानिकांना संधी मिळाली. केंद्रीय निमलष्करी दलाबरोबरच आपले पोलीसही या भागात तैनात करण्यात आले आहेत. नक्षल कारवाईत जखमी झालेल्या जवानांना तत्काळ वैद्यकीय मदत मिळावी यासाठी गडचिरोलीसाठी घेतलेल्या हेलिकॉप्टरचा चांगला उपयोग होत असून त्यामुळे आपदग्रस्त परिस्थितीत अनेकांचे प्राण वाचविण्यात यश आले. नक्षल कारवायांच्या बीमोडासाठी आणि जंगलातील कारवायांच्या आवश्यक प्रशिक्षणाकरिता नागपूर येथे स्वतंत्र अल्फा हॉक्स प्रशिक्षण केंद्रदेखील निर्माण करण्यात आले.

नक्षलग्रस्त भागात सेवा पूर्ण करणाऱ्या पोलिसांना प्रोत्साहन देण्याबरोबरच कार्यकाळानंतर

## सामाजिक बांधिलकी

**विविध सामाजिक उपक्रम राबवून बांधिलकी जपण्याचा प्रयत्न पोलीस दल करीत आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी हेल्पलाईन सुरू करण्यात आली. मुंबईत गृहमंत्र्यांपासून ते पोलीस शिपायापर्यंत सर्वांनी ज्येष्ठ नागरिकांची काळजी घ्यायला सुरुवात केली आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या संपर्कात राहून त्यांना साहाय्य करण्यात येत आहे. प्रत्येक शनिवारी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत सर्व पोलीस अधिकारी आपल्या कार्यक्षेत्रातील जनतेसाठी उपलब्ध राहतील. मुंबईतील 'संवाद - तुझा माझा' उपक्रमाने ४२५ पेक्षा अधिक घटस्फोटित कुटुंबांना समुपदेशनाद्वारे एकत्र जोडण्याचे काम केले. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेला उत्तम प्रतिसाद मिळाला असून ९ लाखांपेक्षा अधिक तंटे तडजोडीतून मिटले. ग्रामीण भागातील मोहिमेला मिळालेले यश पाहून औरंगाबाद आयुक्तालयात महात्मा गांधी तंटामुक्त शहर मोहीम प्रातिनिधिक स्वरूपात सुरू करण्यात आली आहे.**


पसंतीनुसार बदली देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. नक्षल कारवाईत शहीद झालेल्या जवानांना २६/११ च्या हल्ल्यातील शहीद जवानांच्या धर्तीवर आर्थिक साहाय्य करण्याचा निर्णय घेतला असून जे केंद्रीय राखीव पोलीस बलाचे जवान महाराष्ट्रात शहीद झाले त्यांनाही सध्या देण्यात येत असलेल्या अर्थसाहाय्यातील तफावत राज्याच्या पोलिसांप्रमाणेच अदा केली जाणार आहे. एकूणच, गडचिरोलीत नक्षल कारवाया रोखण्यासाठी पोलिसांचे मनोधैर्य वाढविण्याबरोबरच आवश्यक ते साहाय्य गृह विभागाकडून केले जात आहे.

पोलीस दलाचे आधुनिकीकरण करतानाच पोलीस दलात ५५ हजार पोलिसांची पारदर्शक पोलीसभरती झाली असून शेवटच्या टप्प्यातील ऑनलाईन पोलीस भरतीच्या प्रक्रियेचे इतर राज्यांनी देखील कौतुक केले आहे. या दलातील पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय शासनाने घेतले आहेत. पोलिसांसाठी आरोग्य योजना, चांगली निवासस्थाने देण्यात येत असून पोलिसांच्या जुन्या इमारतींच्या दुरुस्तीचा मोठा कार्यक्रम लवकरच हाती घेतला जाणार आहे.

**(शब्दांकन : किशोर गांगुर्डे)**

## गृह विभागाची तीन वर्षे

- रस्ते अपघातांबद्दल जागृती व्हावी यासाठी देशात रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा होत असताना महाराष्ट्रात मात्र गेल्या तीन वर्षांपासून रस्ता सुरक्षा अभियान पंधरवडाभर साजरे केले जाते. या काळात रस्ते अपघाताची तीव्रता, बळी, उपाययोजना आदींबाबत जागृती केली जाते. गृहमंत्र्यांच्या संकल्पनेतून हे अभियान सप्ताहाऐवजी १५ दिवस राबविण्यात येते.
- महिलांवरील अत्याचाराला प्रतिबंध घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांसाठी निवृत्त न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या विविध विभागांशी संबंधित ८९ शिफारशींपैकी ६३ शिफारशी मान्य केल्या असून उर्वरित १८ शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत.
- पाच वर्षांत ५५ हजारपेक्षा जास्त पोलीस कॉन्स्टेबलची पारदर्शक भरती
- नव्याने ६५ हजार पोलिसांच्या भरतीचा प्रस्ताव
- गडचिरोली आणि अहेरी या दोन पोलीस जिल्ह्यांची निर्मिती
- दहशतवादाला चोख उत्तर देण्यासाठी शीघ्र प्रतिसाद पथकांची निर्मिती
- एनएसजीच्या धर्तीवर राज्यात फोर्सवन कमांडो पथकाची निर्मिती
- देशात पहिली गुप्तवार्ता अकादमी (इंटेलिजन्स ॲकॅडमी) राज्यात सुरू
- समुद्रकिनाऱ्यालगतच्या गावांमध्ये स्वयंसेवक आणि मच्छिमारांचे सागर रक्षक दल



- १२ नवीन सागरी पोलीस ठाण्यांची निर्मिती
- पोलीस, नौदल, तटरक्षक दलाच्या विद्यमाने गस्तीसाठी सागरकवच अभियान
- राज्य सुरक्षा आयोगाची स्थापना
- महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची स्थापना
- मुंबईत ५ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची प्रक्रिया सुरू
- जिल्हे आणि पोलीस आयुक्तालयात आर्थिक गुन्हे शाखेची निर्मिती
- वित्तीय संस्थांमधील ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण करणाऱ्या अधिनियमास मान्यता
- नक्षल आणि जंगल कारवायांच्या प्रशिक्षणाकरिता नागपूर येथे अल्फा हॉक्स प्रशिक्षण केंद्र
- घटस्फोटित जोडप्यांना एकत्र जोडणारा संवाद-तुझा माझा उपक्रम
- महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेतून ९ लाखांपेक्षा अधिक तंटे मिटले
- औरंगाबाद आयुक्तालयात महात्मा गांधी तंटामुक्त शहर मोहीम प्रातिनिधिक स्वरूपात सुरू
- ज्येष्ठ नागरिकांना पोलिसांच्या सहकार्याचा हात, त्यांच्यासाठी स्वतंत्र हेल्पलाईन (१०३)
- राज्यात रस्ता सुरक्षा सप्ताहाऐवजी रस्ता सुरक्षा पंधरवडा अभियान.
- महामार्ग पोलिसांचे www.highwaypolicems.in संकेतस्थळ वाहनचालक, प्रवाशांसाठी मार्गदर्शक

# जलाशयातील पाणी पिण्यासाठी राखीव






**पतंगराव कदम**
वने, मदत
व पुनर्वसन आणि
भूकंप पुनर्वसन मंत्री

**कापूस, सोयाबीन, धान उत्पादक शेतकऱ्यांना मदतीचे प्रत्यक्ष वाटप महसूल विभागाकडून करण्यात आले. ही मदत २५ एप्रिल, २०१२ पर्यंत पूर्ण करण्यात यावी, असे आदेश देण्यात आले होते. खरीप हंगाम २०११ मध्ये ज्या तालुक्यामध्ये सोयाबीन व धान पिकांच्या उत्पादकतेत किमान २५ टक्के किंवा जास्त घट झाली, त्या तालुक्यातील शेतकऱ्यांना २ हेक्टरच्या मर्यादेपर्यंत प्रति हेक्टरी २ हजार रुपये मदत देण्यात आली. कापूस उत्पादक शेतकऱ्याला ७/१२ उताऱ्यावरील प्रत्यक्ष पीक पेरणी नोंदीच्या आधारे सरसकट कमाल २ हेक्टर मर्यादेपर्यंत प्रति हेक्टर ४ हजार रुपये याप्रमाणे मदत करण्यात**

राज्यात पावसाने उशिरा हजेरी लावल्यामुळे टंचाई परिस्थिती निर्माण झाली. शासनाने तातडीने दखल घेऊन अनेक उपाययोजना घेतल्या. पन्नासपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई घोषित केली. तातडीने टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यास सुरुवात झाली. चाराटंचाईवर मात करण्यासाठी जनावरांच्या छावण्या उभारल्या. चारा डेपो उघडण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. चारा डेपोमधून ७५ टक्के सवलतीच्या दराने चारा उपलब्ध करून देण्यात आला. कोरडी विहीर असलेला शेतकरी आणि व्यावसायिकरीत्या दूध विकत असलेल्या व्यक्तीस (१० जनावरांच्या मर्यादेपर्यंत) चारा अनुज्ञेय करण्यात आला. ३० जून, २०१२ पर्यंत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रत्येक महिन्यात १५ दिवसांपेक्षा जास्त दिवस काम करणाऱ्यांना तसेच दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती व भूमिहीन व्यक्तींना ९० टक्के सवलतीच्या दराने चारा उपलब्ध करून देण्यात आला. मोठ्या जनावरांसाठी प्रतिदिन ४० रुपये व छोट्या जनावरांसाठी प्रति दिन २० रुपये या दराने खर्चाची मर्यादा ठेवण्यात आली. आवश्यकतेनुसार जनावरांच्या छावण्या उघडण्यास जिल्हाधिकाऱ्यांना परवानगी देण्यात आली.

खरीप व रब्बी हंगामातील ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असणाऱ्या ७,७५३ गावांमध्ये तसेच पेयजल टंचाई असणाऱ्या ग्रामीण क्षेत्रात टँकरद्वारा अथवा बैलगाडीद्वारे, गाव तसेच वाडी येथे पाणीपुरवठा करण्याचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आले. अतिशय जुने व नादुरुस्त झालेल्या टँकर्सऐवजी नवीन टँकर्स खरेदी करण्यात आले.



वीज देयके थकित असल्यामुळे बंद असलेल्या पाणीपुरवठा योजनांची देयके टंचाई निधीतून अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**नळयोजनांची दुरुस्ती**

पाणी टंचाईसाठी घेण्यात येणारा नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीच्या उपाययोजनांना मंजुरी देण्यासाठी १५ लक्ष रुपयांपर्यंतच्या योजनांना प्रशासकीय अधिकार देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना व १५ लक्ष रुपयांपेक्षा जास्त परंतु ३० लक्ष रुपयांपर्यंत किमतीच्या योजनांना प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना देण्यात आले. नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीमध्ये नवीन पंपिंग मशिनरी बसविणे, जुने झालेले पाईप बदलणे, पाणी साठवण टाकीची मोठी गळती दुरुस्ती करणे, उद्‌भवाची खोली पाणी कमी झाल्यास उभे-आडवे बोअर करून उद्‌भवातील पाण्याचे प्रमाण वाढविणे, नळ कोंडाळ्यांची दुरुस्ती करणे इत्यादी कामे हाती घेण्यात आली. गावात झालेल्या शेवटच्या जनगणनेनुसार २०० लोकसंख्येमागे एक विंधन विहीर अनुज्ञेय करण्यात आली. पूर्वी घेतलेल्या व सद्य:स्थितीत विंधन विहिरींच्या संख्येचा विचार करून नवीन विंधन विहिरी मंजूर करण्यात आल्या. वाडीच्या ०.५ कि.मी. अंतराच्या परिसरात कोणत्याही पिण्याच्या पाण्याचा सार्वजनिक उद्‌भव असू नये या अटीवर वाड्यांची लोकसंख्या लक्षात घेण्यात आली. शेवटच्या जनगणनेनुसार किमान ५० लोकसंख्या असल्यास एक विंधन विहीर अनुज्ञेय करण्यात आली.

ज्या गावात खरीप व रब्बी हंगामासाठी ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी घोषित झाली, अशा गावांमध्ये कृषी वापराची वीज जोडणी थकीत किंवा चालू देयकासाठी खंडित करण्यात आली नाही. ज्या जोडण्या खंडित केल्या त्या पुन्हा जोडून देण्यात आल्या.

राज्यातील जलाशयातील पाणी पिण्यासाठी राखून ठेवण्याची कार्यवाही करण्याचे आदेश जलसंपदा विभागास देण्यात आलेत. याची योग्य अंमलबजावणी होण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांसोबत संनियंत्रण केले.

चारा टंचाई, पिण्याच्या पाण्याची टंचाई (टँकरची माहिती), रोजगार हमी योजना याबाबत विभागीय आयुक्तांना साप्ताहिक आढावा घेण्यास सांगण्यात आले. सर्व विभागांची माहिती नियमितपणे मंत्रिमंडळास सादर करण्यात आली. प्रत्येक आठवड्यात मंत्रिमंडळाने तातडीच्या बाबींची तत्परतेने दखल घेऊन त्याबाबत आदेश निर्गमित केले.

**(शब्दांकन : सुबोधिनी घरत)**

## मागणीप्रमाणे काम

**महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या कामांवर मजुरांची उपस्थिती वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन तांत्रिक व प्रशासकीय मान्यता असलेली पुरेशी कामे उपलब्ध होतील, याकडे विशेष लक्ष देण्यात आले. आवश्यकता असेल तेथे सुधारित प्रशासकीय मान्यता मिळविण्यात आली. मागणीप्रमाणे कामे सुरू करण्यात आली. या कामावरील मजुरांना दोन आठवड्यांत प्रत्यक्ष मजुरी प्राप्त होईल याकडे जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष दिले.**



सामाजिक न्याय

# लोकसंख्येच्या प्रमाणात निधी, ई-शिष्यवृत्ती आणि ऑनलाईन जात पडताळणी




**शिवाजीराव मोघे**
सामाजिक न्याय, विमुक्त/भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय कल्याण आणि व्यसनमुक्ती कार्य मंत्री


**समाजातील दुर्बल घटकांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक प्रगतीसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. यासाठी अर्थसंकल्पात लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येतो. परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती तत्काळ मिळावी यासाठी ई-स्कॉलरशिप योजना सुरू करण्यात आली आहे. जात प्रमाणपत्राची पडताळणी गतीने व्हावी यासाठी ऑनलाईन जात पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. समाजातील दुर्बल घटकांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे.**

दुर्बल घटकांचा विकास साधायचा असेल तर या समाजामध्ये शैक्षणिक प्रगती होणे आवश्यक ठरते. यासाठी या घटकातील मुला-मुलींना चांगले शिक्षण घेता यावे याकरिता शिष्यवृत्ती देण्याची योजना शासन राबवित आहे. आर्थिक अडचणीमुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये ही शिष्यवृत्ती देण्यामागे शासनाची भूमिका आहे.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेमध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी, वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता, परीक्षा फी, इत्यादींचा समावेश आहे. ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना त्वरित मिळावी तसेच संबंधित महाविद्यालयांना त्यांचे शैक्षणिक शुल्क लवकर मिळावे यासाठी शासनाने ई-स्कॉलरशिप योजना सुरू केली. या योजनेत विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होते. यामुळे दिरंगाई कमी होऊन अधिक पारदर्शकता येते. गेल्या वर्षी १५ लाख विद्यार्थ्यांनी बँक खाते उघडले. जवळपास १८०० कोटी रुपये विद्यार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करण्यात आले आहे. या वर्षी १९ नोव्हेंबर २०१२ पर्यंत विद्यार्थ्यांना संपूर्ण शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. ई-शिष्यवृत्ती योजनेस केंद्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे पारितोषिक मिळाले आहे.

राज्यातील शासनमान्य खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांतील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग या विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करण्यात येते.

मागासवर्गातील विद्यार्थ्यांनाही परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेता यावे यासाठी राज्य शासनाने 'परदेश शिष्यवृत्ती' योजना सुरू केली आहे. पूर्वी या योजनेत २५ विद्यार्थ्यांना लाभ घेता येत होता. यामध्ये वाढ करून आता ५० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. अनेक युवकांनी या योजनेचा लाभ घेऊन परदेशात उच्च पदवी प्राप्त केली आहे.

अनुसूचित जातीचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. यासाठी अर्थसंकल्पात लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येतो. अशा प्रकारे तरतूद करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य.

विविध व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी प्रवेश तसेच नोकरी मिळविण्यासाठी जातप्रमाणपत्र पडताळणी करून घ्यावी लागते. त्यासाठी विलंब लक्षात घेऊन जात प्रमाणपत्राची पडताळणी ऑनलाईन करण्यात येत आहे. पुणे येथील यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी या संस्थेमध्ये ५० मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राष्ट्रीय तसेच राज्यस्तरावरील स्पर्धा परीक्षेसाठी प्रशिक्षण देण्यात येते. आयआयटी परीक्षेच्या तयारीसाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मुंबईच्या आयआयटीएन्स-पेस (पीएसईई) संस्थेत प्रशिक्षण देण्यात येते.

सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीतील महामंडळामार्फत अधिकाधिक युवकांना स्वयंरोजगारासाठी कर्ज वाटप करण्यात येते. राज्य शासनाने या महामंडळाचे भागभांडवल वाढविण्यासाठी या महामंडळाला ३३० कोटी एवढा निधी देण्यात आला आहे. महामंडळामार्फत होणाऱ्या कर्ज वाटपात पारदर्शकता यावी यासाठी सोडत पद्धत (लॉटरी) अवलंबविण्यात येत आहे. महामंडळामार्फत देण्यात आलेले ४२१.१७ कोटी कर्ज व्याजासह माफ करण्यात आले आहे.

अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत खटल्यांचा निकाल तातडीने लागावा याकरिता महसूल विभागस्तरावर सहा स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यात येणार आहेत.

ज्येष्ठ नागरिकांना त्यांचे जीवन सुसह्य पद्धतीने जगता यावे यासाठी लवकरच ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर करण्यात येणार आहे.

पालामध्ये राहणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमातींना मूळ प्रवाहात आणण्यासाठी व त्यांचे राहणीमान उंचवण्यासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. ग्रामपंचायत व पंचायत समिती क्षेत्रातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना २६९ चौ.फू. क्षेत्रफळाची पक्की घरे बांधून देण्यात येतील.

## पहिले व्यसनमुक्ती साहित्य संमेलन

**युवकांनी व्यसनापासून दूर रहावे आणि देशात सशक्त तरुणपिढी तयार व्हावी, कौटुंबिक स्वास्थ्य टिकावे यासाठी शासनाने व्यसनमुक्ती धोरण जाहीर केले. अशाप्रकारे धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य. समाज प्रबोधन व मतपरिवर्तनातून व्यसनमुक्त समाज निर्माण करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यात येईल. नुकतेच देशातील पहिले व्यसनमुक्ती साहित्य संमेलन पुणे येथे आयोजित करण्यात आले. व्यसनमुक्ती कार्यक्रम लोकचळवळ व्हावी यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.**

### अपंगांचे कल्याण

अपंगांच्या कल्याणासाठी विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. अपंगांसाठी सुरू करण्यात आलेल्या शिक्षण संस्थांना शंभर टक्के अनुदान देण्यात येते. अपंगांना स्वयंरोजगार करता यावा यासाठी अपंग वित्त व आर्थिक विकास महामंडळामार्फत कर्ज देण्यात येते. या कर्जासाठी लागणारी उत्पन्न मर्यादा रुपये १ लाख इतकी करण्यात आली आहे. कर्जाची मर्यादा वाढविण्यात आली आहे.

### ठळक निर्णय

■ मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी काम करीत असलेल्या व्यक्ती व संस्थांना दलित मित्र पुरस्काराने सन्मानित करण्यात येत होते. या पुरस्काराच्या नावात बदल करून या पुरस्काराचे नाव 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार' करण्यात आले आहे.

**अनुसूचित जातीसाठी स्वतंत्र घरकूल योजना राबविण्यात येत आहे. या घरकूल योजनेस 'रमाई निवास योजना' असे नाव देण्यात आले आहे. या योजनेत १ लाख घरे बांधून पूर्ण झाली असून त्यांचे वाटप झाले आहे.**

■ कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबळीकरण योजनेअंतर्गत खाजगी जमीन शासनाच्या दराने उपलब्ध होत नसल्याने शासनाच्या रेडी रेकनर दराच्या दुप्पट व कमाल ३ लाख एकर या दराप्रमाणे जमीन खरेदी करून लाभार्थ्यांना वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

■ दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत निधीत रु. १० लाखांवरून रुपये २० लाख एवढी वाढ करण्यात आली आहे. अनु-जातीच्या मुला-मुलींना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी १०० निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रत्येक तालुक्यात एक निवासी शाळा सुरू करण्यात येणार आहे. या शैक्षणिक वर्षात ५७ निवासी शाळा सुरू करण्यात आल्या. पुढील शैक्षणिक वर्षापासून ४३ निवासी शाळा सुरू करण्यात येतील.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे संवर्धन करण्यासाठी नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर बांधण्यासाठी २२ कोटी रुपये खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.**

■ जिल्ह्याच्या ठिकाणी सामाजिक न्याय भवन बांधण्यात येत आहे. १९ ठिकाणी सामाजिक न्याय भवनाचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

■ वसतिगृहांमधील मुला-मुलींच्या निर्वाह भत्यात भरघोस वाढ करण्यात आली आहे.

■ मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती घेण्यासाठी पालकांच्या उत्पन्न मर्यादेत वाढ.

■ अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला/मुलींसाठी विभागीय स्तरावर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्याचा निर्णय. नाशिक, अमरावती, नागपूर, औरंगाबाद व लातूर येथील प्रशिक्षण संस्थेचे बांधकाम पूर्ण.

■ मागासवर्गीय व अपंग विद्यार्थ्यांचे परिपोषण अनुदान रु. ६३० वरून रु. ९०० करण्यात आले.

■ दारिद्र्यरेषेखालील विमुक्त जाती, भटक्या जमाती कुटुंबांना वसंतराव नाईक सबळीकरण व स्वाभिमान योजना लागू करणे विचाराधीन.

**(शब्दांकन : विष्णू काकडे)**

# प्रगती आणि आघाडी

## मानव विकासाचा घटक तालुका

मानव विकास निर्देशांक कमी असलेल्या क्षेत्रांतील विकासाला चालना देण्यासाठी, २०११-१२ या वर्षापासून मानव विकास अभियानाची व्याप्ती वाढविण्यात येणार. जिल्ह्याऐवजी तालुक्याला मानव विकासाचा घटक मानले जाईल. अतिमागास तालुक्यांमध्ये या अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

## 'गुन्हा व गुन्हेगार मागशोधन नेटवर्क प्रणाली'

राज्यात 'गुन्हा व गुन्हेगार मागशोधन नेटवर्क प्रणाली' संबंधातील संगणकीकरणाचा व्यापक प्रकल्प राबविण्यात येत आहे. ही प्रणाली राष्ट्रीय नेटवर्कचा एक भाग असून त्यामुळे गुन्हेगारी कारवायांची माहिती मिळण्यास मदत होईल. गुन्ह्याच्या शोधामध्ये न्यायवैद्यक शास्त्राचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन, नागपूर येथे एक नवीन न्यायसहायक विज्ञान संस्था सुरू करण्यात आली आहे.

## 'ग्रामीण दलित वस्ती वैयक्तिक नळजोडणी व शौचालय बांधकाम'

'ग्रामीण दलित वस्ती वैयक्तिक नळजोडणी व शौचालय बांधकाम योजना' सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाच्या प्रत्येक कुटुंबाला वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी ११,००० रुपये आणि घरगुती नळजोडणीसाठी ४,००० रुपये इतके अनुदान देण्यात येईल.

## हवामानावर आधारित पीक विमा योजना

प्रतिकूल हवामानामुळे शेतकऱ्यांना होणाऱ्या आर्थिक हानीपासून वाचविण्यासाठी राज्याच्या निवडक भागातील द्राक्षे, केळी, संत्री, मोसंबी, डाळींब, आंबा आणि काजू या पिकांसाठी पथदर्शी तत्त्वावर 'हवामानावर आधारित पीक विमा योजना' सुरू केली आहे.




अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी तालुका स्तरावर १०० शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आली. विभागीय स्तरावर १,००० विद्यार्थी क्षमतेची वसतिगृहे बांधण्यात येत आहेत. ४ वसतिगृहे सुरू करण्यात आली असून ३ वसतिगृहे इमारत भाड्याने घेऊन सुरू करण्यात येणार आहेत.

# दर्जेदार बियाणे आणि खत पुरवठ्याला प्राधान्य







राधाकृष्ण विखे-पाटील
कृषी व पणन मंत्री


**महाराष्ट्रात हवामान आणि पावसाचे वैविध्य आढळून येते. अशा वेळी संपूर्ण राज्यासाठी सरसकट एकच कृषी धोरण योग्य ठरणार नाही. प्रत्येक विभागातील भौगोलिक स्थिती आणि हवामानाचा विचार करून हे धोरण ठरवावे लागेल. त्या अनुषंगाने स्थानिक शेतकऱ्यांना अधिक उपयोग व्हावा यासाठी नऊ ॲग्रो क्लायमॅटिक झोनसाठी स्वतंत्र धोरण ठरविण्यात येईल. राज्याचा कृषी विकास दर वाढविण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून प्रयत्न चालू आहेत. सूक्ष्मसिंचनाच्या वापरात वाढ आणि चांगले वाण विकसित करणे यावर भर देण्यात येत आहे. त्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण केल्या जात आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन कृषी विकासाचा दर वाढविण्याचा माझा संकल्प आहे.**

केवळ मंत्रालयात बसून कागदपत्रांच्या आधारे निर्णय होतात असं मला वाटत नाही. त्यासाठी मी प्रत्यक्ष फिल्डवर जातो. शेती आणि शेतकऱ्याचे प्रॅक्टीकल प्रॉब्लेम्स समजून घेतो. शेतकऱ्याच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी तीनशे प्रगतीशील शेतकऱ्यांचा एक अभ्यास गट आता तयार केला आहे. सामान्य शेतकऱ्याला प्रत्यक्ष फायदा मिळावा, यासाठी माझे प्रयत्न आहेत.

एकदा सर्व बियाणे कंपनीचे मालक माझ्याकडे आले होते. मी त्यांना एकच सांगितले, आपण कपाशीचे बीटी बियाणे स्वीकारले पण त्यासाठी लागणाऱ्या इतर संशोधनाच्या अभावामुळे त्यातून अपेक्षित उत्पादन मिळू शकले नाही. यासाठी या कंपन्यांना आपल्या राज्यात व्यवसाय करायचा असेल तर सतत संशोधन करायला हवे. स्थानिक लोकांच्या मागणीनुसार संशोधन व्हायला हवे. कृषी विद्यापीठातून होणारे संशोधन हे राज्यातील शेतकऱ्याला समृद्ध करणारे असावे, असे मला वाटते.

शेतीत चांगले उत्पन्न घेण्यासाठी महत्त्वाच्या दोन बाबी म्हणजे चांगले बियाणे आणि योग्य खत. मी प्राधान्याने दोन्ही बाबींवर लक्ष केंद्रित केले. खतांचा होणारा काळाबाजार, तुटवडा, लिंकिंग आणि होणारी फसवणूक यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर खत पोहोचविण्याची योजना सुरू केली. विभागाने खताच्या तक्रारी दूर करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. जिल्हास्तरावर बफर स्टॉकची निर्मिती केली. विशिष्ट प्रकारच्या खतांचा आग्रह धरू नये, यासाठी प्रबोधन करण्यात आले. भरारी पथकांची निर्मिती करण्यात आली; कोणतीही तक्रार असल्यास **टोल फ्री क्रमांक १८००-२३३-४०००** उपलब्ध करून दिला. एवढे असूनही खताच्या वितरणात त्रुटी राहत होत्या; शिवाय छोट्या शेतकऱ्यांना खत वाहून नेण्यासाठी वाहतुकीचा खर्च सोसावा लागत होता. आता शेतकऱ्यांच्या गटांनी एकत्र येऊन आवश्यक खताची रक्कम गोळा करून तालुका कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार खत कंपनीकडे जमा केल्यावर शेतकऱ्यांच्या बांधावर खत उपलब्ध होऊ लागले आहे. या योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. जवळपास ५१६० मे. टन खत वाटप झाले असून ११,५९३ शेतकऱ्यांना त्याचा फायदा मिळाला आहे.

बियाणांच्या बाबतीत ठोस पावले उचलण्यात आली आहेत. बोगस बियाणे देऊन शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. महिकोसारख्या कंपनीला ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्यात आले. या कारवाईमुळे सर्वच बीज निर्मात्या कंपन्यांना जरब बसली. यापुढे कोणत्याही कंपनीला नवे वाण बाजारात विक्रीसाठी आणायचे असेल तर त्यासाठी त्या वाणावर दोन वर्षे कृषी विद्यापीठात संशोधन करण्यात येईल. ते विक्रीयोग्य आहे असे सिद्ध झाल्यानंतरच बाजारात आणले जाईल. या निर्णयामुळे भविष्यात होणाऱ्या इतर अनेक अडचणींना मूठमाती मिळेल.

### सूक्ष्म सिंचन

शेतीस शाश्वत सिंचन उपलब्ध करून देणे आणि शेतीमालास योग्य भाव मिळवून देणे यावर कृषी विभागाचा भर आहे. परंपरागत पद्धतीने वापरात येत असलेली सिंचन व्यवस्था मजबूत करण्याबरोबरच सूक्ष्म सिंचनावर भर देण्यात येत आहे. यासाठी जागतिक स्तरावरून निविदा मागवून अत्याधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. ठिबक व तुषार सिंचनाचे संच शेतकऱ्यांना स्वस्त दरात उपलब्ध करून दिले जात आहेत.

### सेंद्रिय शेती

सुरक्षित आणि विषमुक्त अन्न मिळावे यासाठी शासनाने १२ वर्षांपूर्वीच सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी उपाययोजना केल्या. मागील दोन दशकांत शेतकऱ्यांची तरुण पिढी शेती व्यवसायात आली. त्यांच्यासाठी शासनाने सेंद्रिय शेती कार्यक्रमातून अनेक उपक्रम सुरू केले. गांडूळखत, नॅडेप, कंपोस्ट, बायोडायनॅमिक खत, हिरवळीची खते, जीवामृत अशा उपाययोजनांद्वारे शेतातील उपलब्ध सेंद्रिय पदार्थांचा योग्य पद्धतीने वापर करून सेंद्रिय खत तयार करण्याचे महत्त्व शेतकऱ्यांना पटवून दिले.

### कृषी क्षेत्रात व्हॅल्यू ॲडिशन

शेतीची उत्पादकता आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी

## सात लाख शेतकऱ्यांना मोबाईल सेवेचा फायदा

**कृषी विभागाने आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेतली आहे. प्रायोगिक तत्त्वावर २१ महसुली मंडळांमध्ये आधुनिक स्वयंचलित हवामान केंद्रे उभारण्यात येत आहेत. प्रत्येक तालुक्यात पर्जन्यमापक आहेत. शेतकऱ्यांना मोबाईल ग्रुप सिमकार्ड दिली आहेत. सध्या सात लाख शेतकरी या योजनेत सहभागी झाले आहेत. कृषी साहाय्यकांना इंटरनेटसह लॅपटॉप देण्यात आले आहेत.**

## महत्त्वाचे निर्णय



- कापूस, सोयाबीन व भात उत्पादक शेतकऱ्यांना दोन हजार कोटी रुपयांचे विशेष आर्थिक साहाय्य.
- गतिमान चारा उत्पादन कार्यक्रमांतर्गत १.३७ लाख हेक्टर क्षेत्रावर ५४.८८ लाख मे. टन चारा उत्पादन.
- खतांच्या लिंकिंग व अधिक दराने विक्रीस प्रतिबंध व्हावा यासाठी शेतकऱ्यांना बांधावर खत उपलब्ध.
- निविष्ठांचे प्रभावी गुणनियंत्रण.
- शेतकऱ्यांना टोल फ्री क्रमांक सुविधा.
- ३९३ दक्षता पथके स्थापन.
- शेतकरी जनता अपघात विमा योजनेंतर्गत गतीने प्रकरणांचा निपटारा.
- शेतकऱ्यांना मोबाईलवरून कृषी सल्ला देण्यासाठी महाकृषी संचार - २ शुभारंभ.
- ऑनलाईन कीड व रोग सर्वेक्षण प्रकल्प यशस्वीरीत्या राबविल्यामुळे या प्रकल्पास राष्ट्रीय स्तरावरील सन २०११-१२चे सुवर्णपदक.
- कृषिविषयक योजना गतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषी सहाय्यकांना लॅपटॉप संगणक.
- शेतकऱ्यांचे परदेश अभ्यास दौरे.
- शेतकऱ्यांना किफायतशीर दरामध्ये सूक्ष्म सिंचन, ठिबक सिंचन तंत्रज्ञान उपलब्ध.
- पंचाहत्तर टक्के अनुदानावर शेततळ्यास प्लॅस्टिक अस्तरीकरण.
- शेतकरी प्रतिनिधी व लोकप्रतिनिधी यांचा समावेश करून राज्य शेतमाल भाव समितीची पुनर्रचना.
- राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील ३०० प्रयोगशील शेतकऱ्यांची निवड करून त्यांच्याशी कृषी धोरणाबाबत चर्चा.
- कोरडवाहू क्षेत्राची उत्पादकता वाढविण्यासाठी कोरडवाहू शेती अभियान.
- हवामान बदलास अनुसरून पीक उत्पादन वाढीसाठी मार्गदर्शन करण्यासाठी स्वयंचलित हवामान केंद्र उभारणी.
- कृषी निविष्ठांचा परिणामकारक वापर करून अधिक उत्पादकता साध्य करता येण्यासाठी जमीन आरोग्य संवर्धन कार्यक्रम.
- स्व. यशवंतराव चव्हाण कृषी चेतना अभियान अंतर्गत आदर्श कृषी ग्राम संकल्पना.
- सन २०११-१२ पासून प्रयोगिक तत्त्वावर साधारण १ लाख हेक्टर क्षेत्रावर फळपिकांसाठी हवामान आधारित पीक विमा योजना.
- सुधारित पीक विमा योजनेंतर्गत रब्बी हंगाम २०११-१२ पासून गहू, ज्वारी, हरभरा व करडई या पिकांसाठी जोखीम स्तरात ६० टक्क्यांहून ८० टक्के वाढ व पिकांच्या विमा संरक्षित रकमेत ३३ ते ३५ टक्के वाढ.

समन्वयाने कार्य सुरू आहे. शेतीतील उत्पन्नात बाजारपेठ मिळवून देण्यासाठी अनेक सकारात्मक पावले उचलली आहेत. पणन आणि वखार महामंडळातर्फे आधुनिक गोडाऊनची साखळी उभारण्यात येत आहे. या कोल्डस्टोरेज गोडाऊनचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची सांगड राष्ट्रीय वायदे बाजाराबरोबर असते. इथे शेतकरी आपला माल ठेवतात. त्यांना किंमतीच्या ८० टक्के रक्कम बँकेमार्फत उचलता येते. बाजारात चांगला भाव येतो. तेव्हा ते हा शेतीमाल विकू शकतात. येत्या पाच वर्षांत या क्षेत्रात १० हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे. कृषी क्षेत्रातील व्हॅल्यू ॲडिशन, हेच शेतीला आर्थिक स्थैर्य देऊ शकते. राज्य शेतमाल भाव समितीचे पुनर्गठन करण्यात आले आहे. या समितीत शेतकरी, लोकप्रतिनिधी आणि कृषी विद्यापीठांचे संशोधक यांचा प्रथमच समावेश करण्यात आला. या समितीच्या गठनामुळे शेतकऱ्यांना शेतमालाच्या भावाची हमी मिळेल.

### फळपिकांसाठी पीक विमा योजना


निसर्गाच्या लहरीपणावर शेती अवलंबून आहे. पिकांचे नुकसान होते तेव्हा शेतकऱ्यांना भरपाई द्यावी लागते. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचे पॅकेज कधी हजार कोटी तर कधी दोन हजार कोटी असे असते. परंतु, कितीही नुकसानभरपाई दिली तरी ती अपुरीच पडते. अशावेळी शेतकऱ्यांचे संभाव्य नुकसान विचारात घेऊन योग्य भरपाई देण्याची तरतूद असणारी विमा योजना राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेनुसार प्रायोगिक तत्त्वावर फळ-पिकांसाठी सर्वंकष पीक विमा योजना सुरू केली आहे. खरीप आणि रब्बीच्या शेतकऱ्यांसाठी फायद्याची ठरेल, अशी पीक विमा योजना तयार करण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीचा अंदाज घेऊन त्या पद्धतीने भरपाईची तरतूद या विमा योजनेत करण्यात येणार आहे.

### ग्लोबल शेतकरी

जगातील शेतीविषयक प्रगत तंत्रज्ञानाची शेतकऱ्याला माहिती होण्याच्या दृष्टीने कृषी विभागातर्फे कृषी दौऱ्याचे आयोजन केले जाते. गेल्या तीन वर्षांपासून चीन, इस्रायल, युरोप, व्हिएतनाम, अमेरिका या देशातील शेतीचा अभ्यास करण्यासाठी अभ्यास दौरे आयोजित करण्यात येत आहेत. तीन वर्षांत सुमारे १ हजार शेतकऱ्यांनी विविध देशातील डेअरी, फळबागा, ग्रीन हाऊस भाजीपाला, कुक्कुटपालन, द्राक्ष व आंबा निर्यात प्रक्रियेचा अभ्यास केला. १० वर्षांपूर्वी महाराष्ट्रात फक्त १० ते १२ ग्रीन हाऊसेस होती. आज सुमारे १० हजार ग्रीन हाऊस उभे आहेत. आज हजारो एकर क्षेत्रात ठिबक सिंचनाचा वापर होत आहे. ही परदेश दौऱ्याची फलनिष्पत्ती म्हणावी लागेल.

**(शब्दांकन : अर्चना शंभरकर)**

# ग्रामीण भारताचा आयकॉन







**जयंत पाटील**

ग्रामविकास आणि वित्त मंत्री


**राज्यातील २७,८९१ ग्रामपंचायतींपैकी २७,८४० ग्रामपंचायतींचे काम ऑनलाइन झाले आहे. जवळपास २५ हजार ग्रामपंचायती 'ग्रामसेवा केंद्र' म्हणून कार्यरत असून, १३ प्रकारचे दाखले गावातच मिळत आहेत. पंचायतराजसंस्थांचे आय.एस.ओ. मानांकन, ई-टेंडरिंग यामुळे गावविकासाचे चित्र बदलते आहे. प्रिया सॉफ्ट या आज्ञावलीमध्ये एक कोटी बारा लाखांहून अधिक जमा-खर्चाच्या नोंदी झाल्या आहेत. ऑनलाइन ट्रान्सफर, जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये बायोमेट्रीक हजेरी, स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या कामाच्या आधारे त्यांचे अ+, अ, ब, क असे श्रेणीकरण, झिरो पेन्डन्सी या योजनांची अंमलबजावणी करून ग्रामविकास विभागाने आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. या सगळ्या बदलांकडे आणि उपक्रमांकडे पाहिल्यानंतर ज्यांच्या नेतृत्वाखाली ही वाटचाल सुरू आहे त्या ग्रामविकास मंत्री जयंत पाटील यांचे 'आयकॉन ऑफ रुरल इंडिया' म्हणून झालेले नामांकन सार्थ असल्याचे दिसते.**

गाव आणि गावाकडची माणसं विकासाच्या मुख्य प्रवाहात यावीत, गावांचा शाश्वत आणि गतीने विकास व्हावा, गावं ही राज्य आणि देशाच्या विकासाची अग्रदूत व्हावीत म्हणून जी माणसं नेटाने ग्रामविकासाच्या कामाला समर्पित होतात, नावीन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करतात, त्या व्यक्तींच्या अनन्यसाधारण कामाची दखल केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयामार्फत 'रुलर आयकॉनस् ऑफ इंडिया' या पुस्तकातून घेण्यात आली आहे. ग्रामविकासाच्या कार्यात नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून इतरांसाठी प्रेरणा ठरलेल्या लोकांची पदचिन्हे या पुस्तकात कोरलेली असतात.

ग्रामविकास मंत्री जयंत पाटील यांचे 'आयकॉन ऑफ रूलर इंडिया' म्हणून नामांकन झाले.

माहिती तंत्रज्ञानाने ज्ञानाचे प्रचंड मोठे दालन खुले करून दिले असताना पारंपरिक पद्धतीने काम करून पुढे जाणे योग्य ठरणार नाही हे लक्षात घेऊन ग्रामविकास विभागाने संगणकीकृत ग्रामीण महाराष्ट्र या संकल्पनेला अंमलात आणत गाव प्रशासन अधिक वेगवान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्याला प्राधान्य दिले आहे.

याबाबत त्यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले की, खऱ्या अर्थाने जे नावीन्यपूर्ण उपक्रम आपण राबविले ते 'ऑयकॉन ऑफ रुरल महाराष्ट्रा' ठरले आहेत. त्यामुळेच विभागाने मागील तीन वर्षांत केलेल्या उल्लेखनीय कामांची माहिती जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

### पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना

जगभरात ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न जटिल होत असताना महाराष्ट्राची गावं पर्यावरणपूरक आणि नियोजनबद्ध विकसित व्हावीत या उद्देशाने ऑक्टोबर २०१० मध्ये राज्यात 'पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना' आकारास आली. या योजनेने महाराष्ट्रातील गावांच्या विकासाची नवी मांडणी केली. शाश्वत विकासाचा आधार ठरणाऱ्या अनेक चांगल्या संकल्पना यातून अंमलात आल्या. गावातील लोकसंख्येएवढी वृक्ष लागवड, प्लॅस्टिक बंदी, अपारंपरिक ऊर्जा साधनांचा वापर, घन कचरा, सांडपाणी व्यवस्थापन, स्वच्छता यासारख्या अनेक कार्यक्रमांबरोबर गाव हागणदारीमुक्त असण्याला यात प्राधान्य देण्यात आले.

सुधारणा करा, सहभागी व्हा, कामगिरी दाखवा आणि गावांच्या विकासासाठी निधी घेऊन जा असे वैशिष्ट्य असलेल्या या योजनेने गावांच्या संतुलित आणि पर्यावरणपूरक विकासाचा पाया भक्कम रोवला. करवसुलीच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक सक्षमता वाढवली. एवढेच नाही, तर योजनेंतर्गत कामाचे सातत्य राखण्यातही यश मिळवले.

### पर्यावरण विकासरत्न

राज्यातील १० हजारांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या १५१ ग्रामपंचायतींचा सूक्ष्म तसेच पर्यावरण विकास आराखडा तयार करण्याचे काम प्रगतिपथावर आहे. मोठी गावं 'विकास केंद्र' म्हणून विकसित होत आहेत. यासाठी विभागाने २४ तज्ज्ञ संस्थांबरोबर प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सहकार्य घेतले आहे.

योजनेच्या पहिल्या वर्षी १२,१९३ ग्रामपंचायतींनी पहिल्या वर्षीचे निकष पूर्ण केले. त्यांना ३९० कोटी रुपयांचा निधी अनुदान म्हणून देण्यात आला. योजनेतील तिन्ही वर्षांचे निकष पहिल्याच वर्षी पूर्ण करणाऱ्या ८१० ग्रामपंचायतींना 'पर्यावरण विकासरत्न' म्हणून गौरविण्यात आले. योजनेच्या दुसऱ्या वर्षात २,३७८ ग्रामपंचायतींनी नव्याने सहभाग घेऊन पहिल्या वर्षीचे निकष पूर्ण केले. त्यांना आणि दुसऱ्या वर्षीच्या निकषांना पात्र ठरलेल्या ७४२४ ग्रामपंचायतींना मिळून ३०० कोटी रुपयांचे अनुदान लवकरच वितरित करण्यात येणार आहे.

### उल्लेखनीय

- जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर बायोमॅट्रीक्स हजेरी. सहा विभागांतील जवळपास ९८४ शाळांमध्ये एक लाख ३ हजार विद्यार्थी आणि ४ हजारांहून अधिक शिक्षकांचा समावेश
- जिल्हा परिषदांच्या शाळांसाठी पंचायत समितीस्तरावर रजा राखीव शिक्षकांचा गट निर्माण करण्याचे प्रस्तावित.

## श्रेष्ठत्व सिद्ध

- पंचायत सबलीकरण आणि उत्तरदायित्व प्रोत्साहन योजनेत महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर. दोन कोटी रुपयांचा पुरस्कार.
- ई-पंचायत कार्यक्रमात महाराष्ट्र देशात पहिला. ५० लाख रुपयांचा प्रथम पुरस्कार.
- राज्यातील १७ स्थानिक स्वराज्य संस्थांना देशपातळीवर १ कोटी ३९ लाख रुपयांचे पुरस्कार.
- गौरव ग्रामसभा स्पर्धेत सांगली जिल्ह्यातील पेठ ग्रामपंचायतीला पुरस्कार.

- जिल्हा परिषदांच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्याचा विभागाचा मानस. शाळांचे अ, ब, क, ड, ई असे श्रेणीकरण.
- गावपातळीवर काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांवर ग्रामसभेबरोबर ग्रामपंचायतींचे नियंत्रण.
- यशवंत पंचायतराज अभियानांतर्गत राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे श्रेणीकरण. ३३ जिल्हा परिषदांपैकी ७ जिल्हा परिषदांना अ+, १५ जिल्हा परिषदांना अ, ९ जिल्हा परिषदांना ब आणि २ जिल्हा परिषदांना क श्रेणी.
- १०२ पंचायत समित्यांना अ+, १९० पंचायत समित्यांना अ, ५० पंचायत समित्यांना ब तर ९ पंचायत समित्यांना क श्रेणी.
- ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदांमधील ५ लाख रुपयांवरील कामे तसेच १ लाख रुपयांवरील मालपुरवठा करण्याची कामे ई- टेंडरिंगद्वारे.
- स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण.
- पंचायतराज संस्थातील लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण.
- पंचायत संस्थांमधील शौचालय नसलेल्या लोकप्रतिनिधींना निवडून येण्यास व सदस्य राहण्यास प्रतिबंध करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य.
- किमान ग्रामसभांची संख्या ६ वरून ४ वर. वॉर्डसभेची तरतूद.
- ग्रामसभेपूर्वी महिला सभेचे आयोजन. महिला सभेत चर्चिले गेलेले विषय ग्रामसभेत विचारार्थ घेणे बंधनकारक.
- बचतगटांच्या वस्तूंच्या विक्रीसाठी ग्रामीण मॉल. आकर्षक पॅकेजिंग आणि मार्केटिंगसाठी तज्ज्ञ बाजारपेठ संस्थेची नियुक्ती.
- कंत्राटी ग्रामसेवकांच्या मानधनात २,५०० हून ६ हजार रुपये इतकी वाढ.
- जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्या समुपदेशनातून स्वीकारार्हतेकडे. पारदर्शक ऑनलाईन बदली धोरणाची अंमलबजावणी.
- राज्यात पथदर्शी स्वरूपात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची अंमलबजावणी.
- राज्यात ३० हजार भारत निर्माण स्वयंसेवकाच्या नियुक्तीचे उद्दिष्ट. त्यापैकी ७,८०० स्वयंसेवकांची नियुक्ती.
- प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी प्रलंबित प्रकरणाचा आढावा. विभागाची शून्य प्रलंबित प्रकरणाकडे वाटचाल.
- इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुलाची मालकी प्राधान्याने महिला प्रमुख किंवा कुटुंब प्रमुख अणि पत्नीच्या नावे करण्याचा निर्णय.
- प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर राज्यात यशवंत ग्रामसडक योजनेची तसेच सुधारित यशवंत ग्रामसमृद्धी योजनेची अंमलबजावणी करण्याचा प्रस्ताव विचाराधीन.

**(शब्दांकन : डॉ. सुरेखा मुळे)**

# आघाडी आणि प्रगती

## आदिवासी विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती

या योजनेअंतर्गत इयत्ता १ ली ते ४ थीतील विद्यार्थ्यांसाठी १००० रुपये, ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी १५०० रुपये, आणि ८ वी ते १० वीच्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी २००० रुपये वार्षिक शिष्यवृत्ती देण्यात येते.

## हायराईज्ड सुपर स्पेशालिटी रुग्णालय

सर जे.जे. समूह रुग्णालय, मुंबई येथे रुपये ६३० कोटी रुपयांचे हायराईज्ड सुपर स्पेशालिटी रुग्णालय इमारतीच्या बांधकामास मान्यता देण्यात आली. त्यानुसार प्राथमिक कामांसाठी आवश्यक नियतव्यय उपलब्ध करून देण्यात आला.

## १ कोटी १२ लाख विद्यार्थ्यांना दुपारचे भोजन

शासकीय व अनुदानित शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ८ वीमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील एकूण १ कोटी १२ लाख विद्यार्थ्यांना दुपारच्या भोजनाची सोय केली जाते. या योजनेसाठी २०१२-१३ साठी रुपये १५३४ कोटी ५२ लाख इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

## रेल्वे प्रकल्प प्रगतिपथावर

राज्यात सुरू असलेले अहमदनगर-बीड-परळी-वैजनाथ, वर्धा-नांदेड व्हाया यवतमाळ-पुसद तसेच प्रस्तावित मनमाड-इंदौर व्हाया मालेगाव, धुळे-नरडाणा-शिरपूर, वडसा-देसाईगंज-गडचिरोली, माणिकगड-गडचांदूर अदिलाबाद, चाकूर ते आसनगाव तसेच औंढा, नाशिक येथे गुड्स टर्मिनस बांधणे आणि पुणे-नाशिक व कराड-चिपळूण या रेल्वे प्रकल्पांसाठी आवश्यक नियतव्यय उपलब्ध केला आहे.

## वृद्धापकाळ निवृत्तिवेतनासाठी १३१० कोटी

दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील वृद्ध निराधार व्यक्तींना इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून तसेच या लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेंतर्गत निवृत्तिवेतन देण्यात येते. या योजनेचे राज्यभरात सुमारे १२ लक्ष ६० हजार लाभार्थी आहेत. संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत राज्यात सुमारे ५ लक्ष ८० हजार लाभार्थी आहेत. २०१२-१३ या वर्षासाठी या योजनांसाठी रुपये १३१० कोटी ३७ लाख एवढी तरतूद प्रस्तावित आहे.

# सामर्थ्य सहकाराचे



हर्षवर्धन पाटील

सहकार आणि संसदीय कार्य मंत्री




**साखर उद्योगात साखर उत्पादनाबरोबरच सहवीज निर्मिती, अल्कोहोल निर्मिती, इथेनॉल निर्मिती, देशी-विदेशी मद्यनिर्मिती, कागद / पार्टिकल बोर्ड उत्पादन, जैविक खत उत्पादन व बायोगॅस निर्मिती यांसारखे बरेच उपपदार्थ उत्पादित करण्यात येत आहेत. सहवीजनिर्मिती प्रकल्प उभारणी करण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांना ऊस खरेदी करातून सवलत देण्यात येते. प्रकल्प खर्चाच्या पाच टक्के शासकीय भागभांडवल देण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. २०२० पर्यंत १५० सहकारी साखर कारखाने कार्यक्षमपणे उत्पादनाखाली कार्यरत राहतील, याची विशेष काळजी घेतली जाईल. गाळप हंगामामध्ये अतिरिक्त ऊसाचा प्रश्न उद्‌भवल्यास शासनाकडून संपूर्ण ऊसाचे गाळप करण्याकरिता प्रयत्न करण्यात येत आहेत. नव्याने येणाऱ्या संकल्पना आणि नवीन तंत्रज्ञान साखर उद्योग व्यवस्थापनापर्यंत पोहोचविण्याकरिता कार्यशाळा आणि प्रशिक्षण शिबिरे यांच्या आयोजनावर भर देण्यात येणार आहे.**

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीत महत्त्वाचे योगदान देणारे स्व. यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी आणि आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष एकाच वर्षात साजरे होत आहे. सहकार क्षेत्रातील क्रांतिकारक निर्णय म्हणजेच ९७ वी घटना दुरुस्ती केंद्र शासनाने मंजूर केली. सध्याचा सहकार म्हणजे व्यक्तींचे संघटन मानले जाते. परंतु, व्यावसायिकतेच्या संकल्पनेमुळे पुढील काळात व्यक्तीपेक्षा भांडवलाला महत्त्व येणार आहे. उच्चाधिकार समितीने केलेल्या शिफारशीनुसार 'क्रियाशील सभासद' ही संकल्पना अस्तित्वात येईल.

क्रियाशील नसलेल्या सभासदांचे संस्थेवरील अनावश्यक नियंत्रण आपोआप नष्ट होईल. सहकारी संस्थांची नोंदणी करणे हा मूलभूत अधिकार ठरविण्यात आला आहे. सहकारी संस्थांचे व्यवस्थापन स्वायत्त, लोकशाही पद्धतीने, व्यावसायिक दृष्टीने व्हावे हा या दुरुस्तीमागील उद्देश आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने सहकार क्षेत्रात उत्कृष्ट काम करीत असलेल्या व सहकार चळवळीच्या निकोप वाढीसाठी योगदान देत असलेल्या सहकारी संस्थांना गौरवण्यात येईल. त्यामुळे उत्कृष्ट सहकारी संस्था भविष्यात अधिक चांगले काम करण्यास प्रेरित होतील व इतर सहकारी संस्थांना प्रोत्साहन मिळेल.

**सहकार संजीवनी**

केंद्र शासनाने अल्प मुदत सहकारी पत संरचनेच्या बळकटीकरणासाठी नेमलेल्या वैद्यनाथन समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी शासन करणार आहे. विदर्भातील अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, अकोला, वाशिम, वर्धा या सहा जिल्ह्यांत पॅकेजसाठी अपात्र ठरलेल्या प्राथमिक सहकारी व कृषी पतसंस्थांना, राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत 'सहकार संजीवनी' योजना लागू करण्यात येईल. या योजनेनुसार, ज्या संस्था नवीन वर्षात मागील वर्षाच्या तुलनेत कर्जपुरवठा व कर्जाची वाढीव वसुली करतील, त्यांना वाढीव कर्ज वाटपाच्या दोन टक्के अथवा अधिकतम ५० हजार रुपये आणि वाढीव कर्ज वसुलीच्या दोन टक्के व अधिकतम ५० हजार रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम 'प्रोत्साहनपर' अनुदान म्हणून देण्यात येते. वाढीव कर्ज वाटप व वाढीव कर्ज वसुलीसाठी संस्थेच्या ज्या गट सचिवांनी प्रत्यक्ष योगदान दिले असेल त्या संस्थांना मिळालेल्या एकूण अनुदानाच्या १० टक्के रक्कम अथवा अधिकतम १० हजार रुपये याप्रमाणे अनुदान देण्यात येईल.

## ५५ लाख शेतकऱ्यांना किसान पतपत्रांचे वाटप

**राज्यातील शेतकऱ्यांना करावयाच्या पीक कर्ज पुरवठ्यामध्ये सुलभता आणण्यासाठी किसान पतपत्र योजना (KCC) राबविण्यात येत आहे. या योजनेनुसार राज्यातील ५५ लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी पतपत्राचे वाटप करण्यात आले आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत २० हजार कोटी रुपयांपर्यंत पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट २०१५ पर्यंत ठरविण्यात आले आहे.**

साखर कारखान्यात ऊस उत्पादकांनी दिलेल्या ऊसाचे देयक वेळेवर अदा करण्याकरिता आणि साखर कारखान्यांच्या कामगारांना वेळेवर वेतन अदा करण्याकरिता स्वतंत्र वेबपोर्टल विकसित करण्यात येणार आहे.

मागील काही वर्षांत पीक कर्जवाटप पाहता राज्यातील एकूण पीक कर्ज वाटपात सहकारी यंत्रणेमार्फत झालेल्या पीक कर्ज वाटपाचा वाटा ६५ ते ७० टक्के असून व्यापारी बँकेचा वाटा ३० ते ३५ टक्के आहे. व्यापारी बँकांनी पीक कर्ज वाटपाचा वाटा जास्तीत जास्त प्रमाणात उचलल्यास जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे शक्य होईल. नागपूर जिल्हा फळे व भाजीपाला खरेदी-विक्री सहकारी संस्थेला शीतगृह उभारणीसाठी वाढीव अर्थसहाय्य देण्यात येईल. विदर्भासाठी खत पुरवठा करण्याकरिता विदर्भ को-ऑप.मार्केटिंग फेडरेशनची निवड करण्यात आली. दोन साखर कारखान्यांमधील हवाई अंतर १५ कि.मी.ऐवजी २५ कि.मी. करण्याचा निर्णय घेण्यात आला. एक लाख रुपयापर्यंतचे कर्ज बिनव्याजी देण्याचाही निर्णय घेण्यात आला. बायोशुगर निर्मिती करणाऱ्या कृषी प्रक्रिया संस्थांच्या प्रकल्पांची किंमत वाढविण्यात येईल.

**(शब्दांकन : सुबोधिनी घरत)**

# नवी ऊर्जा नवे प्रकल्प




**गणेश नाईक**
राज्य उत्पादन शुल्क आणि अपारंपरिक ऊर्जा मंत्री


**पवन ऊर्जेच्या क्षेत्रात महाराष्ट्रात एकूण २१९४.२६ मे.वॅ. क्षमतेचे प्रकल्प २१ ठिकाणी उभारण्यात आले आहेत. शासनाच्या सकारात्मक धोरणामुळे खाजगी गुंतवणूकदारांनी पवन ऊर्जेच्या क्षेत्रात ११,००० कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. सुमारे १६,००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी वाव आहे. आशिया खंडातील सर्वांत मोठा ५४५ मेगावॅटचा पवनऊर्जा प्रकल्प धुळे जिल्ह्यात ब्राह्मणवेल येथे विकसित करण्यात आला आहे.**




पवन ऊर्जा, सौर ऊर्जा, लघुजल विद्युत सहवीजनिर्मिती अशा अपारंपरिक पद्धतीने वीजनिर्मिती करणारे महाराष्ट्र हे देशात आघाडीवर असलेले राज्य आहे.

कुठल्याही देशाचा, राज्याचा विकास हा त्या देशात, राज्यात किती ऊर्जानिर्मिती होते यावर अवलंबून असतो. महाराष्ट्र हे देशात सर्वांत मोठ्या प्रमाणात विद्युत निर्मिती व वापर करणारे राज्य आहे. सध्या महाराष्ट्राची एकूण स्थापित वीजनिर्मिती क्षमता २१८३९.८४ मेगावॅट एवढी आहे. पारंपरिक पद्धतीने वीजनिर्मिती करण्यासाठी लागणाऱ्या इंधनाचा मर्यादित साठा विचारात घेता तसेच या वीजनिर्मितीमुळे होणारा पर्यावरणाचा ऱ्हास विचारात घेता आणि वाढती विजेची मागणी लक्षात घेता अपारंपरिक पद्धतीने वीजनिर्मिती करण्याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

महाराष्ट्रात वेगवेगळ्या अपारंपरिक ऊर्जा स्रोतांद्वारे एकूण ८,८७३.८८ मेगावॅट एवढ्या क्षमतेची वीजनिर्मिती प्रकल्प आस्थापित करण्यास वाव आहे. त्यापैकी २९३६.४६ मे.वॅ. क्षमतेचे प्रकल्प उभारण्यात आले आहेत.

हवामान बदलासाठी राष्ट्रीय कृती आराखड्यानुसार, सन २०१५ पर्यंत एकूण वीजनिर्मितीच्या १० टक्के वीजनिर्मिती अपारंपरिक ऊर्जा स्रोतांपासून करण्याचे धोरण आहे. यानुसार अपारंपरिक ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट दरवर्षी १ टक्क्याने वाढवून सन २०१४-१५ मध्ये १० टक्के अपारंपरिक ऊर्जा निर्मितीचे लक्ष्य गाठण्याचे प्रयत्न महाऊर्जामार्फत करण्यात येणार आहेत. यासाठी १५०० मे.वॅ. क्षमतेचे पवन ऊर्जा प्रकल्प, १५० मे.वॅ. क्षमतेचे बायोमास ऊर्जा प्रकल्प, ३०० मे.वॅ. क्षमतेचे उसाच्या चिपाडापासून सहवीजनिर्मितीचे प्रकल्प, ४५० मे.वॅ. क्षमतेचे घनकचरा व औद्योगिक कचऱ्यापासून वीजनिर्मितीचे प्रकल्प, ५० मे.वॅ. क्षमतेचे लघुजल विद्युत निर्मिती प्रकल्प आणि २५० मे.वॅ. क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प असे एकूण २७०० मे.वॅ. क्षमतेचे प्रकल्प स्थापित करण्यात येतील.

अपारंपरिक ऊर्जा निर्मितीच्या माध्यमातून ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून मागील तीन वर्षांच्या कालावधीत १३१ खेड्या-पाड्यांमध्ये अपारंपरिक साधनांमधून विद्युतीकरण करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात आला. ग्रामपंचायतीमध्ये पथदिव्यांसाठी साध्या बल्बऐवजी एकूण ४९,१९८ ऊर्जा कार्यक्षम पथदिवे बसविण्यात आले असून यामुळे ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात लक्षणीय ऊर्जा बचत झालेली आहे. १०,७३१ गावांतील सार्वजनिक ठिकाणी सौर अभ्यासिका योजना हाती घेतली आहे.

महाऊर्जाने पारेषण संलग्न अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पाकडे लक्ष केंद्रित केले आहे. राज्यात ३१ मार्च २०१२ अखेरपर्यंत ४०२१.०८ मे.वॅ. क्षमतेचे अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प आस्थापित करण्यात आले आहेत. त्यामध्ये पवन ऊर्जा प्रकल्प २७१७.११ मे.वॅ., ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीजनिर्मिती प्रकल्प ८४९.४ मे.वॅ., कृषी अवशेषांवर आधारित प्रकल्प १५५ मे.वॅ., औद्योगिक कचऱ्यापासून वीजनिर्मितीचे प्रकल्प १४.८५१ मे.वॅ., सौर ऊर्जा प्रकल्प २० मे.वॅ. आणि लघु जल विद्युत निर्मिती प्रकल्प २६४.७२५ मे.वॅ. स्थापित करण्यात आले आहेत.

देशात सर्वांत जास्त १३५३ किलो वॅट क्षमतेची पवन-सौर संकरित संयंत्राची स्थापना राज्यात झाली असून ४७४ कि.वॅ. क्षमतेची संयंत्रे आस्थापित करण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

पवन-सौर संकरित संयंत्रे उभी करणारी संस्था म्हणून महाऊर्जेस खाजगी संस्थेकडून पारितोषिक देण्यात आले आहे. सौर उष्णजल संयंत्रामुळे विजेच्या जास्त मागणीच्या काळात ३९० मे.वॅ. विजेची बचत झाली आहे. सौर उष्णजल संयंत्र आस्थापनेसाठी देशात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारी राज्याची मुख्य संस्था म्हणून केंद्र शासनाने महाऊर्जास पुरस्कार प्रदान केला आहे. सन २०१५ पर्यंत भूगर्भीय ऊर्जेपासून वीजनिर्मिती करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

जागतिक स्तरावरील अद्ययावत तंत्रज्ञानाचा उपयोग करून राज्यात अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात नावीन्यपूर्ण ऊर्जा प्रकल्प राबविण्यात शासनास साहाय्य करण्यासाठी सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क या संस्थेशी करार करण्यात आला. शासकीय, निमशासकीय संस्था/स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या अखत्यारीतील इमारतीमध्ये ऊर्जा संवर्धनाचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी महाऊर्जेमार्फत अर्थसाहाय्य योजनेला मंजुरी. लघु व मध्यम उद्योगात ऊर्जा संवर्धनासाठी आर्थिक साहाय्य देण्याच्या योजनेस मान्यता देण्यात आली आहे. तसेच नगरपालिका, महानगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या क्षेत्रातील, पाणीपुरवठा योजना व पथदिव्यांमध्ये ऊर्जा बचतीसाठी संयंत्रे स्थापित करण्यासाठी अर्थसाहाय्य करण्याची योजना सुरू करण्यात आली.

**राज्य उत्पादन शुल्क**

या विभागाचा राज्याच्या आर्थिक प्रगतीमध्ये महत्त्वाचा सहभाग आहे. या विभागाच्या सक्षमीकरणाकडे अधिक लक्ष देण्यात येत आहे. विभागाचे राज्यस्तरीय संगणकीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. राज्यात अवैधरीत्या तसेच बनावट मद्य येऊ नये यासाठी राज्याच्या चेकपोस्टवर अधिक बंदोबस्त ठेवून दक्षता घेण्यात येत आहे. मुंबईत एक्साईज भवन बांधण्याचे नियोजन आहे. तसेच राज्यातील सर्व जिल्ह्यांत उत्पादन शुल्क भवन बांधण्याचे नियोजन आहे.

**(शब्दांकन : विष्णू काकडे)**


### ४४ पवनऊर्जा निर्मितीक्षेत्रे

मागील तीन वर्षांच्या कालावधीत पवन ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यात ७८५ मे.वॅ. इतकी क्षमता स्थापित करण्यात आली. मार्चअखेर २०१२ पर्यंत ती २७१७ मे.वॅ. इतकी स्थापित क्षमता आहे. पवन ऊर्जेची क्षमता वाढविण्यासाठी राज्यात आतापर्यंत २२६ ठिकाणी वारापरिमापन केंद्रांची उभारणी करण्यात आली. यामधील ४४ ठिकाणे पवन ऊर्जा निर्मितीक्षेत्र स्थळे घोषित करण्यात आली. १३३ स्थळांवर वाऱ्याचे मोजमाप चालू आहे.

# पारदर्शक आणि हायटेक




बाळासाहेब थोरात
महसूल व
खार जमीन मंत्री


**महसूल विभागातर्फे देण्यात येणारे दाखले व सेवा याकरिता लागणारे अर्ज, नमुने, प्रतिज्ञापत्र यांचे ई-डिस्ट्रिक प्रकल्पांतर्गत प्रमाणीकरण करण्यात आले आहे. राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत प्रत्येक चार गावांकरिता एक महा ई-सेवा केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. माहिती मिळविण्यासाठी किंवा तक्रार निवारण्यासाठी ई-लोकशाही प्रणाली (हेल्पलाइन) सुरू केली. ई-चावडी योजनेंतर्गत तलाठ्यांनी लॅपटॉपच्या साहाय्याने दप्तरी कामकाज पार पाडणे सुरू केले. मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ कॉन्फरन्स, जीपीएस, सॅटेलाईट इमेज या सर्व माहिती तंत्रज्ञानाचा वापर विविध शासकीय कामांसाठी वाढविण्यात आला.**

शासनाच्या अनेक विभागांच्या योजनांचा शुभारंभ हा महसूल विभागामार्फत केला जातो. महसूल विभागांची रचना अशी आहे की, गावागावात महसूल विभागाचे कर्मचारी पोहोचतात. निवडणूक, राजशिष्टाचार, जणगणना, विविध परीक्षा, सामाजिक योजनांची अंमलबजावणी, सार्वजनिक वितरण व्यवस्था, विविध दाखले देणे, बालमजूर सर्वेक्षण व पुनर्वसन, रोजगार, अन्न व नागरी पुरवठा, आरोग्य, पाणीपुरवठा इत्यादी १३२ कामे या विभागामार्फत केली जातात.

विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेशासाठी लागणारे दाखले किंवा शेतीचा सातबारा, अशा विविध बाबींसाठी सामान्य नागरिकाला त्याच्या दैनंदिन जीवनाशी निगडित कामांसाठी महसूल यंत्रणेशी संपर्क करावा लागतो.

वाढती लोकसंख्या व नागरीकरण, औद्योगिकीकरण, शिक्षणाचा प्रचार व प्रसार, विविध निवडणुका आणि आनुषंगिक कामे याशिवाय इतर विभागांशी संनियंत्रण व समन्वय करताना अनेक प्रशासकीय अडचणी येतात; शिवाय ताणही वाढतो. त्यावर मात करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शासनाच्या योजना परिणामकारक पद्धतीने पोहोचविण्यासोबतच महसूल विभागाचे बळकटीकरण करण्यावर भर दिला आहे.

वाळू लिलावाकरिता ई- टेंडरिंग पद्धतीचा वापर बंधनकारक करण्यात आला; शिवाय जमीन मोजणीसारखे क्लिष्ट काम ई-मोजणी अंतर्गत सुलभ करण्यात आले. मोजणीचे अर्ज संगणकीय प्रणालीद्वारे नोंदवून मोजणीची तारीख देण्यापासून ते मोजणी होईपर्यंत संनियंत्रण या आज्ञावलीद्वारे करण्यात येते.

याशिवाय ई-फेरफार (ऑनलाईन कम्युटेशन), ई-नकाशा (नकाशाचे डिजिटायझेशन), भूमी अभिलेखाचे स्कॅनिंग, मायनिंग बारकोड सिस्टीम, ई-चावडी यांसारख्या योजना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गुणवत्तापूर्ण सेवा तर पुरवू शकतीलच शिवाय बदलत्या जगासमोरील आव्हानांचा मुकाबलाही करू शकतील.

मंत्रालयात लागलेल्या आगीत महसूल विभागाचे सर्वाधिक नुकसान झाले. महसूल यंत्रणेने फिनिक्स पक्षाप्रमाणे पुन्हा भरारी मारण्यास सुरुवात केली आहे. महसूल अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वयंप्रेरणेने काम करून, नष्ट झालेल्या धारिकांच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेतले आहे. आतापर्यंत सुमारे ३,५५५ संचिकांची पुनर्बांधणी झाली आहे. मंत्रालयात आग लागण्यापूर्वी महसूल विभागाने फाईल्सच्या स्कॅनिंगचे काम सुरू केले होते. सुमारे १४,००० फाईल्सचे स्कॅनिंग झाले होते. अत्याधुनिक तंत्रज्ञान, संगणकीकरणातूनच आपण शासकीय कागदपत्रे, अभिलेख जतन करून ठेवू शकतो असा धडा मंत्रालयाला लागलेल्या आगीतून पुन्हा एकदा मिळाला आहे.

**राज्याची पुनर्मोजणी**

महाराष्ट्रात सन १८३० ते १८७० या कालावधीत पहिल्यांदा महसूल मोजणी व जमाबंदीचे काम करण्यात आले होते. त्यानंतर १८७० ते १८८० या दरम्यान पूर्वी मोजणी न केलेल्या परंतु नंतर वहीवाटीखाली आलेल्या जमिनीची मोजणी करून नव्याने जमाबंदी केली होती. त्यानंतर १८८० ते १९३० या कालावधीत राज्यातील एकूण २९ जिल्ह्यांतील ३०१ तालुक्यांमध्ये पहिली फेरजमाबंदी केली, त्यानंतर १९५६ च्या सुमारास फेरजमाबंदीचे काम सुरू केले; परंतु वेगवेगळ्या कारणांमुळे ते होऊ शकले नव्हते.

आता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून संपूर्ण राज्याची पुनर्मोजणी करण्यात येणार आहे. यामुळे सर्व अभिलेख वस्तुस्थितीनुरूप अचूक तयार होऊन डिजिटल स्वरूपात डाटा निर्माण होईल. अभिलेखांचे संगणकीकरण होऊन जमीनविषयक अभिलेखात पारदर्शकता येईल. जमीनविषयक वाद कमी होतील व महसूल, दिवाणी आणि फौजदारी दावे कमी होतील. वैयक्तिक, सामुदायिक आणि सार्वजनिक विकासाचे प्रकल्प राबविताना येणाऱ्या अडचणी दूर होतील. आधुनिक तंत्रज्ञानाने पुनर्मोजणी ही ई-गव्हर्नन्सच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल ठरले आहे.

**ठळक निर्णय**

- भाडेपट्ट्यांच्या नूतनीकरणाबाबतचे नवीन धोरण.
- ग्रामीण भागातील छोट्या व्यवसायांना अकृषिक परवानगीची आवश्यकता नाही.
- कुळ कायद्याखालील जमिनीची खरेदी-विक्री करताना जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीची आवश्यकता नाही
- जमीन हद्द मोजणीसाठी परवानाधारक भूमापकांची नियुक्ती करणार.

(उर्वरित पान ४६ वर)

## सातबाराचे संगणकीकरण

सातबाराचे संगणकीकरण करण्याचे काम मोठ्या प्रमाणात करण्यात आले आहे. २०१३-१४ च्या आसपास हे काम पूर्ण करण्यात येईल. राज्याच्या वेबसाईटवर सातबारा उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ते अद्ययावत करण्यात येत आहेत.

अनधिकृत बांधकाम रोखण्यासाठी आणि नागरिकांना कमी कष्टात व वेळेत अकृषिक परवानगी देण्यासाठी संगणकीय कार्यप्रणाली राज्यभर राबविण्यात येणार आहे.

# गावागावांत स्वच्छ पाणी...






**लक्ष्मणराव ढोबळे**
पाणीपुरवठा
व स्वच्छता मंत्री

**पुरवठा आधारित पाणीपुरवठा योजनांऐवजी मागणी व सामूहिक तत्त्वावर आधारित पाणीपुरवठा योजना असा बदल करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिल्या राज्यांपैकी एक होय. या धोरणानुसार ग्रामीण पाणीपुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामसभेमार्फत ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची स्थापना करण्यात आली. त्यामुळे शासनाची भूमिका पुरवठादाराऐवजी साहाय्यकर्ता अशी झाली. केंद्र शासनाचे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व संपूर्ण स्वच्छता अभियान या कार्यक्रमांद्वारे जनतेला सुरक्षित पाणी आणि स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. सुजल व निर्मल महाराष्ट्र निर्माण करण्याच्या संकल्पाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.**

आपल्या आरोग्याचा पाणी व स्वच्छता याच्याशी थेट संबंध आहे. वैयक्तिक स्वच्छता व पाण्याची स्वच्छता याबाबत आपण बेसावध राहिलो तर विविध आजारांना तोंड देण्याची पाळी येऊ शकते, यासाठी आवश्यक ती काळजी घेणे अत्यावश्यक आहे. या अनुषंगाने राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक नागरिकाला सुरक्षित पिण्याचे पाणी व पर्याप्त स्वच्छतेच्या सोयी-सुविधा पुरविणे ही पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाची जबाबदारी आहे. त्यानुसार पाणी व स्वच्छता हे दोन्ही महत्त्वाचे विषय घेऊन माझा विभाग जबाबदारीने वाटचाल करतो आहे.

समाजातील उपेक्षित व वंचित वर्गातील कुटुंबाकरिता खाजगी नळ जोडणी व वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने ग्रामीण दलित वस्ती पाणीपुरवठा योजना सुरू केली. या योजनेनुसार ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबांना खाजगी नळ जोळणी व वैयक्तिक शौचालय सुविधा पुरविण्यासाठी अनुक्रमे रु. ४,००० व ११,००० रुपये अनुदान देय आहे. या योजनेंतर्गत या वर्षी रु. ४८.४५ कोटी इतका निधी जिल्हा परिषदांना वितरित करण्यात आला आहे. जनतेस केवळ पाणीपुरवठा करणे हाच शासनाचा एकमेव उद्देश नाही, तर त्या पाण्याची गुणवत्ता उत्तम दर्जाची असायला हवी यासाठी विविध उपाययोजना आखल्या आहेत. यासाठी पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे रासायनिक तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. नागरी पाणीपुरवठा करताना होणारी पाणी गळती रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना अंमलात आणल्या जात असल्याचे जागतिक बँकेच्या अहवालात नमूद करण्यात आले. हे पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या कामाचे यश म्हणावे लागेल.

**निर्मल महाराष्ट्र**

संपूर्ण स्वच्छता अभियानास प्रारंभ झाल्यापासून ते आजपर्यंत भरीव काम झाले आहे. याच अभियानातून सन २००३-०४ पासून निर्मल ग्राम पुरस्कार योजना सुरू करण्यात आली. या योजनेंतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना निर्मल ग्राम पुरस्कार देऊन गौरविण्यात येतील. योजनेच्या अंमलबजावणीमध्ये प्रारंभापासून महाराष्ट्राने आपले वर्चस्व राखले आहे. आतापर्यंत राज्यातील ९५२४ ग्रामपंचायतींना व ११ पंचायत समित्यांना निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त झाले आहेत. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये संपूर्ण स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान व स्वच्छता अभियान यांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे आज राज्यातील स्वच्छतेची व्याप्ती ६५ टक्क्यांपर्यंत पोहोचली.

लोकांनी स्वच्छतेच्या सवयी अंगीकाराव्यात यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून विविध योजना राबविण्यात येत आहेत. साबणाने हात धुण्यापासून ते शौचालयाचा वापर करण्यापर्यंतच्या सवयींचा यामध्ये समावेश आहे. ग्रामीण भागातील सर्व शासकीय कार्यालये, अंगणवाड्या, शाळा येथे शौचालय सुविधा दिल्याने स्वच्छतेविषयक जागृती होण्यास मदत झाली. स्वच्छता अभियान ही एक सकारात्मक चळवळ झाली असून, स्वच्छता अभियानास लोकांचा सहभागही उत्तमरित्या मिळतो आहे. ग्रामीण व शहरी भागातील जनतेच्या सहभागाने स्वच्छ, सुंदर असा निर्मल महाराष्ट्र करण्याचे स्वप्न निश्चितपणे साकार होईल.


**(शब्दांकन : शांताराम शेरवाडे)**

## तीन हजार गावे टँकरमुक्त

**जलस्वराज्य योजनेतून ३ हजार गावांमध्ये योजना राबवून ही गावे टँकरमुक्त करण्यात यश प्राप्त झाले. शिवकालीन पाणी साठवण योजना ८२०२ गावे व वाड्या वस्त्यांमध्ये राबविण्यात आली. यामुळे १०५१ गावे टँकरमुक्त झाली. जलस्वराज्य प्रकल्पाच्या यशस्वीतेमुळे राज्यातील ग्रामीण जनतेस पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध झाल्या. लोकसहभागाच्या तत्त्वावर या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आली असून या प्रकल्पामुळे सुमारे २,९६६ ग्रामपंचायतींना पाणीपुरवठा सुरू झाला.**



# पारदर्शक धान्य वितरण







**अनिल देशमुख**
अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री


**सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत निर्धारित दराने योग्य दर्जाचे धान्य शिधापत्रिकाधारकांना खात्रीशीररित्या उपलब्ध करून देण्यात येते. त्यादृष्टीने सुधारित धान्य वितरण पद्धत राबविण्यात येत आहे. या अंतर्गत राज्यात प्रत्येक महिन्याची ७ तारीख हा दिवस 'अन्न दिन' म्हणून पाळण्यात येतो. या दिवशी गावातील चावडी किंवा स्वस्त धान्य दुकान किंवा सार्वजनिक ठिकाणी दक्षता समिती सदस्य व इतर लोकांच्या समक्ष जाहीर पद्धतीने शिधापत्रिकाधारकांना ठराविक परिमाणानुसार धान्याचे वाटप करण्यात येते. शिल्लक धान्य उर्वरित लाभार्थ्यांना स्वस्त धान्य दुकानातून दिनांक ८ ते १५ या अन्न सप्ताहात दिले जाते.**

घरपोच धान्य योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखालील व अंत्योदय योजनेमध्ये येणाऱ्या शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य दिले जाते. या योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शिधापत्रिकाधारकांना पुढील तीन महिन्यांत मिळणाऱ्या धान्याची एकत्रित रक्कम चालू महिन्याच्या २० तारखेपर्यंत स्वस्त धान्य दुकानाकडे जमा करावी लागेल. या धान्याचे वाटप पुढील अन्नदिनाच्या दिवशी गावपातळीवर करण्यात येत आहे.

या धान्यवाटपाचा अहवाल तहसीलदार किंवा शिधावाटप अधिकाऱ्यांना देण्याची जबाबदारी शासनाच्या प्रतिनिधीवर असेल. शिधापत्रिकाधारकांना वाटप केलेल्या जीवनावश्यक वस्तूंचे दर आणि उपलब्ध साठा याचा फलक लावणे स्वस्तधान्य दुकानदारांना बंधनकारक केले आहे.

अन्न दिन किंवा अन्न सप्ताहात शिधापत्रिकाधारकाला धान्याचे वाटप होऊ शकले नाही, तर त्याच महिन्यातील इतर दिवशी शिधापत्रिकाधारकाला धान्य वाटप करणे बंधनकारक करण्यात आले आहे. अन्न दिन व अन्न सप्ताह या काळात सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत धान्याचे वाटप सुरू राहील. स्वस्तधान्य दुकानदाराने तसे केले नाही, तर त्याला दंड ठोठावला जाईल.

### जीपीएस यंत्रणा

धान्याची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर प्रायोगिक तत्त्वावर जीपीएस यंत्रणा बसविण्यात येणार आहे. ही यंत्रणा सुरुवातीला सर्व विभागीय मुख्यालयाच्या जिल्ह्यामध्ये एक वर्षाकरिता असेल. याच्या वापरावर निष्कर्ष प्राप्त होताच ती पुढे चालू ठेवण्याचा निर्णय घेतला जाईल. याद्वारे तालुका पातळीवरून स्वस्तधान्य दुकानापर्यंत या वाहनांवर नियंत्रण ठेवले जाईल.

### ग्रुप एसएमएस

शासकीय गोदामातून स्वस्त दुकानाकडे धान्य रवाना केल्यानंतर लगेचच त्या दुकानांच्या परिसरातील लोकांना ग्रुप एसएमएसद्वारे पाठविण्यात आलेल्या धान्याच्या आकडेवारीची व वाहनांची माहिती शासकीय गोदाम वा तालुका कार्यालयात दिली जाईल. यामुळे रेशनिंगवरील धान्याचा अपहार टाळण्यासाठी निश्चित मदत होणार आहे. महाऑनलाईनच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात ही सुविधा निर्माण केली जाणार आहे. यात सरकारी गोदामातून रेशनिंगच्या दुकानाकडे धान्य रवाना केल्यानंतर लगेचच त्या दुकानाच्या परिसरातील किमान या २५ लोकांना याबाबतची माहिती दिली जाईल. त्यामुळे रवाना करण्यात आलेले धान्य पूर्ण आले किंवा नाही याची खात्री दुकानात जाऊन करता येईल.

### वाहनांना हिरवा रंग

या पद्धतीने अन्नधान्याची वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांना हिरवा रंग दिला जाईल. वाहनांवर 'सार्वजनिक वितरण व्यवस्था सुधारित वितरण पद्धत, महाराष्ट्र शासन' असे ठळक अक्षरात लिहिले जाईल. यामुळे वितरण व्यवस्थेमध्ये पारदर्शकता निर्माण होण्यास निश्चितच मदत मिळेल. योग्य लाभार्थ्यांपर्यंत अन्नधान्य पोहोचविणे सहज शक्य होईल.

या योजनेमुळे सार्वजनिक धान्य वितरण व्यवस्थेमध्ये पारदर्शकता निर्माण होणार आहे. यामुळे राज्यभरातील एकूण ६६ लाख ४३ हजार ४४२ दारिद्र्यरेषेखालील शिधापत्रिकाधारकांना घरपोच धान्य मिळण्यास मदत होईल. प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेला 'अन्न दिन' पाळण्यात येत असल्याने या दिवशी खात्रीने शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य मिळेल.


केरोसिन वितरणातील गैरव्यवहार दूर करण्यासाठी यापुढे केरोसिनवरील अनुदान थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. ही योजना प्रायोगिक तत्त्वावर नाशिक जिल्ह्यासाठी तयार करून मंजुरीकरिता केंद्र शासनाकडे पाठवण्यात आली होती. ही योजना केंद्र शासनाने स्वीकारली असून संपूर्ण देशात ही योजना राबविण्याचा निर्णय केंद्राने घेतला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील मुंबई, मुंबई उपनगर शिधावाटप क्षेत्र, अमरावती, नाशिक, वर्धा, पुणे व नंदुरबार या जिल्ह्यांत ही योजना राबविण्यात येईल.

**(शब्दांकन : विकास माळी)**



## संपर्कासाठी

- सार्वजनिक वितरण व्यवस्थेची माहिती आणि तक्रारी नोंदविण्यासाठी हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक-१८००२२४९५०
- संकेतस्थळ : www.mahafood.gov.in
- मार्गदर्शक हेल्पलाईन : टोल फ्री क्रमांक १८००२२२२६२.




# रस्ते चौपदरीकरणासह उड्डाणपुलांच्या कामांना गती



जयदत्त क्षीरसागर
सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने शहर विकास प्रकल्पांतर्गत महत्त्वाच्या शहरात एकात्मिक वाहतूक पायाभूत सोयी-सुविधा जसे रस्ते, द्रुतगती मार्ग, एमआरटीएस बंदरे विकास, रेल्वे प्रकल्प व विमानतळ विकास इत्यादी कामे केली आहेत. खाजगी क्षेत्राच्या सहभागातून वाहतुकीच्या पायाभूत सोईसुविधा निर्माण केल्या आहेत. मुंबई व राज्याच्या विविध जिल्ह्यांत बांधण्यात आलेले उड्डाणपूल राज्याच्या वैभवात भर टाकणारे आहेत. पनवेल बायपास प्रकल्प, सायन-पनवेल द्रुतगती मार्ग, पूर्व व पश्चिम द्रुतगती मार्ग, नागपूर येथील मंगळवारी रेल्वे उड्डाणपूल व नरेंद्रनगर उड्डाणपूल हे प्रकल्प पूर्ण करून राज्याच्या पायाभूत सुविधा सक्षम करण्यात मोठा वाटा महामंडळाने उचलला आहे.**

मुंबईसह महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांत उड्डाणपूल बांधण्याचे महत्त्वाचे कार्य सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभागामार्फत केले जाते. या विभागाचे मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाद्वारे विविध उड्डाणपूल, रस्त्यांचे चौपदरीकरण, जलवाहतूक प्रकल्प आदी कामे करण्यात येत आहेत.

महामंडळाने नागपूर-सिन्नर-घोटी-मुंबई या नवीन प्रकल्पाची सुरुवात केली आहे. एकात्मिक शहर विकास प्रकल्पांतर्गत राज्यातील पुणे, नागपूर, औरंगाबाद, लातूर, नांदेड, बारामती, सोलापूर, नंदुरबार, शिर्डी व कोल्हापूर इत्यादी शहरांचा रस्ते व पूल बांधणीच्या माध्यमातून विकास केला आहे. सातारा-कागल रस्त्याचे चौपदीकरण, ठाणे-घोडबंदर रस्ता, भिवंडी-कल्याण शिळफाटा रस्त्याचे रुंदीकरण व सुधारणा, चाळीसगाव वळणरस्त्याची सुधारणा, सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोड व जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड हे प्रकल्प पूर्ण केले आहेत.

महामंडळाने समतोल विकास साधण्यास मदत केली आहे.

**भविष्यातील नियोजन**

पूर्व किनारा जलवाहतूक तसेच पश्चिम किनारा जलवाहतूक प्रकल्प, महाराष्ट्र राज्य सीमा चेक पोस्ट प्रकल्प, वरळी ते हाजीअली व हाजीअली ते नरिमन पॉइंट सागरी सेतू, पेडर रोड उड्डाणपूल, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाची दर्जा उन्नतीची योजना, थीम पार्क, गृहबांधणी प्रकल्प, लॉजिस्टीक पार्क, फॉर्म्युला वन कार रेसिंग ट्रॅक, जागतिक दर्जाचे फूड मॉल्स, पुण्यातील इंटर मॉडेल ट्रान्सपोर्ट केंद्र, पुणे रिंग रोड, वर्सोवा-वांद्रे सागरी सेतू, रेलिंग ट्रॅक इत्यादी भविष्यातील प्रकल्प महामंडळाच्या माध्यमातून पूर्ण करण्यात येतील.

महामंडळातर्फे राबविण्यात आलेल्या वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी राज्य शासनाने वेळोवेळी आर्थिक साहाय्य तसेच जमीन उपलब्ध करून दिली आहे. या जमिनीचा वाणिज्यिक तत्त्वावर वापर आणि आर्थिक स्रोतांची निर्मिती करून महामंडळाला सक्षम बनवण्यात आले आहे.

वरळी ते वांद्रे जोडणारा राजीव गांधी सागरी सेतू म्हणजे महाराष्ट्राच्या स्थापत्य कलेचे आणि रस्ते विकास महामंडळाच्या उत्तम कामाचे एक प्रतीक आहे. ४.७ किलोमीटरचा हा समुद्र सेतू अवघ्या ८ मिनिटांत ओलांडला जातो. या सागरी सेतूने राज्याच्या नावलौकिकात भर पडली असून एका नव्या पर्यटन स्थळाची निर्मिती झाली आहे.

महामंडळाचे अध्यक्ष तसेच राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली बांधा, वापरा व हस्तांतरित करा या आधुनिक तत्त्वज्ञानावर राज्यात रस्त्याचे जाळे विणून वाहतुकीच्या समस्येवर मात केली आहे.

**(शब्दांकन : राजू पाटोदकर)**


**महामंडळाकडे उपलब्ध असलेला अनुभव, तांत्रिक मनुष्यबळ व सागरी सेतू सारखे प्रकल्प उभारण्याची क्षमता लक्षात घेऊन अन्य राज्ये व परदेशातील कामांसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत 'एम.एस.आर.डी.सी. इंडिया' ही आंतरराष्ट्रीय कंपनी स्थापन करण्याची बाब विचाराधीन आहे.**



# गुटखा हद्दपार



**मनोहर नाईक**
अन्न व औषध प्रशासन मंत्री




**तरुण पिढीला गुटख्याच्या विळख्यातून सोडवायचे असेल तर त्याचा कायमचा बंदोबस्त करावा लागेल. शासनाने याच निर्धाराने राज्यात गुटखा व पानमसाल्यावर बंदी लागू केली आहे. मुंबई उच्च न्यायालयानेही शासनाच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे. या बंदीची प्रभावी अंमलबजावणी शासन करीलच. याबरोबरच जनतेचे सहकार्यही अपेक्षित आहे. राज्यात गुटखा व पानमसाल्यावर बंदी घालून शासनाने लोकहिताचा व सार्वत्रिक आरोग्य टिकविण्यास मदत करणारा निर्णय घेतला आहे. गुटखा सेवन करणाऱ्यांची संख्या किंबहुना तरुण पिढीला गुटख्याने घातलेला विळखा व त्याचे परिणाम पाहता गुटखाबंदी अत्यंत आवश्यकच होती. राज्यातील तरुण पिढीचा विचार करता हा निर्णय महत्त्वाचा आहे.**

गुटखा व पानमसाल्यामध्ये मॅग्नेशियम कार्बोनेट हा आरोग्यास अत्यंत घातक असा घटक समाविष्ट असतो. या पदार्थाच्या सेवनामुळे तोंड, घसा यांच्या कर्करोगाच्या धोक्याबरोबरच हृदयरोग, नैराश्य आदी आजारांची लागण होण्याची शक्यता असते. समाजातील आजची वास्तवता पाहिली तर शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात गुटखा व पानमसाला सेवनाच्या आहारी गेल्याचे दिसून येते. याला कारण म्हणजे गल्लीबोळातील टपऱ्यांपासून अगदी पंचतारांकित हॉटेलमध्ये सहजपणे उपलब्ध होणारी गुटखा व पानमसाल्याची पाकिटे.

शाळकरी मुलांपासून ते वृद्धांपर्यंत या गुटखा व पानमसाल्याने विळखा घातला आहे. शाळकरी मुलांच्या खिशातही गुटख्याची पाकिटे सापडल्याच्या घटना दिसताहेत. देशाचा भविष्यातील आधारस्तंभ असलेली ही पिढी वाचविणे काळाची गरज आहे. याच दृष्टिकोनातून अन्न व औषध प्रशासन विभागाने गुटखा व पानमसाल्यावर बंदी आणण्याच्या दृष्टीने पावले उचलली. शासनाच्या या निर्णयानुसार गुटखा व पानमसाला या पदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वितरण व विक्री यावर बंदी घालण्यात आली आहे.

शासनाने गुटखा बंदीचा निर्णय विचारपूर्वक घेतला आहे. गुटखा विक्रीतून महसुलाच्या रूपाने शासनाला दरवर्षी सुमारे १०० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळत होते. तथापि, कल्याणकारी राज्य म्हणून ओळख असलेल्या शासनाने तरुण पिढीचे आयुष्य किमती मानले. दररोज सुमारे पाच ते सहा हजार तरुण नव्याने गुटखा खाण्यास सुरुवात करतात असा एक अंदाज आहे. त्यामुळे गुटखा बंदी करणे अत्यंत महत्त्वाचे होते.

## पहिले राज्य

**केरळ, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश या राज्यांनीही गुटख्यावर बंदी घातली आहे. मात्र, गुटखा व पानमसाल्यावर बंदी आणणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. इतर राज्यांनीही महाराष्ट्राचा कित्ता गिरवावा, असे केंद्र शासनाने सूचित केले आहे.**




गुटखा पानमसाल्यावर बंदी आणल्यानंतर या निर्णयाची अंमलबजावणी काटेकोरपणे होण्यासाठी माझ्या विभागाने लक्ष केंद्रित केले. शासनाने १९ जुलै २०१२ रोजी गुटखा व पानमसाल्यावर बंदी आणली. बंदी लागू केल्यानंतर छुप्या मार्गाने गुटखा व पानमसाला विकणाऱ्यांवर छापे टाकून आजपर्यंत सुमारे १० कोटी रुपये किमतीचा गुटखा व पानमसाला अन्न व औषध प्रशासनाने जप्त केला आहे.

महाराष्ट्रातील विविध गुटखा व पानमसाला उत्पादकांनी बंदीच्या विरोधात उच्च न्यायालयात आव्हान दिले. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाने त्यांचा युक्तिवाद फेटाळून शासनाच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील व्याख्येनुसार गुटखा व पानमसाला हे खाद्यपदार्थ असून राज्य सरकारला जनहितार्थ निर्णय घेण्याचा अधिकार आहे. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागाने लागू केलेली बंदी कायद्यानुसारच असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. आता गुटखाविरोधी मोहीम अधिक व्यापक व बळकट करण्यास गती मिळेल.

शासनाच्या गुटखा बंदीच्या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. कारण, यामागचा शासनाचा हेतू स्पष्ट आहे. कोणतीही योजना यशस्वी होण्यासाठी लोकांचे सहकार्य असणे महत्त्वाचे ठरते. शासनाच्या या कृतीला जनता निर्धाराने पाठिंबा देईल याची खात्री आहे. जास्तीत जास्त तरुण लोकसंख्या असलेला देश ही आपल्या देशाची भविष्यातील ओळख असणार आहे. त्यामुळे या तरुण पिढीला वाचविण्यासाठी शासनाचे हे ऐतिहासिक पाऊल आहे.

**(शब्दांकन : शांताराम शेरवाडे)**

# वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा वाढला







**डॉ. विजयकुमार गावित**
वैद्यकीय शिक्षण आणि फलोत्पादन मंत्री


**सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व शासकीय रुग्णालये यांचे संगणकीकरण करण्यासाठी एचएमआयएस (हेल्थ मॅनेजमेंट इन्फर्मेशन सिस्टिम) हा प्रकल्प मान्य केला आहे. हा प्रकल्प अंदाजे १६० कोटींचा असून जे.जे. रुग्णालयात या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. राज्यातील इतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व शासकीय रुग्णालयांमध्ये एकाच वेळेस संपूर्ण संगणकीकरणाचे काम सुरू होईल. मुख्य सर्व्हर जे.जे. रुग्णालयात बसवण्यात आला आहे. यामुळे रुग्णसेवा, शैक्षणिकसेवा, प्रशासकीयसेवा यांचा दर्जा आणि गुणवत्ता अनेक पटीने वाढणार आहे.**

राज्यातील जनतेचे आरोग्य सुदृढ व निरोगी असावे तसेच त्यांना उत्तम प्रतीची आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी यासाठी रुग्णालय, प्रथमोपचार केंद्रे असतात. परंतु रुग्णांना आरोग्य सेवा देण्यासाठी उत्तम डॉक्टर्स, परिचारिका आणि रुग्णांच्या इतर आरोग्य सेवेशी निगडित अन्य घटक आवश्यक असतात. यासाठी वैद्यकीय, दंत, परिचारिका व इतर आरोग्य सेवेशी संबंधित अभ्यासक्रमांचे बळकटीकरण करणे व त्यात वाढ करणे या उद्देशाने राज्यात संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय स्थापन करण्यात आले आहे.

राज्य शासनाची एकूण १४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये असून त्यांची प्रवेश क्षमता १६०० इतकी आहे; तर मुंबई, नागपूर, औरंगाबाद येथे शासकीय दंतमहाविद्यालये आहेत. या दंतमहाविद्यालयांची एकूण प्रवेश क्षमता १८० इतकी आहे. या महाविद्यालयांमधून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमार्फत त्यांच्या शैक्षणिक कार्यक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालयाशी संलग्नित रुग्णालयांमध्ये रुग्णसेवा देण्यात येते.

**मानवी अवयव प्रत्यारोपण**

मानवी अवयवाचे प्रत्यारोपण अधिनियम१९९४ नुसार वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाने प्रधिकार समिती स्थापन केली आहे. या समितीमार्फत रुग्णाची नातलग नसलेली व्यक्ती अवयव दान करीत असल्यास त्यास परवानगी देण्याबाबत निर्णय घेण्यात येतो. मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्याचे काम राज्यात सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मस्तिष्क स्तंभ मृत रुग्ण व्यक्तीचे अवयव मिळवणे हे महत्त्वाचे ठरते. याला चालना देण्यासाठी व लाभार्थींची प्रतीक्षा यादी तयार करण्यासाठी समन्वय समितीची स्थापना करण्यात आली आहे. मुंबई शहरात या केंद्राचे काम उत्कृष्टरीत्या सुरू असून शहरातील सर्व मान्यताप्राप्त शासकीय, महानगरपालिका, खाजगी रुग्णालयांचे सहकार्य मिळत आहे. या केंद्राचे कार्यालय सायन रुग्णालयात आहे. या केंद्रात ८०० पेक्षा जास्त रुग्णांनी अवयव मिळण्यासाठी नोंदणी केली आहे. अवयव मिळण्यासाठी रुग्णालयास व रुग्णास येणाऱ्या अडचणींवर मार्गदर्शन करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. मृत व्यक्तीचे अवयव दान कार्यक्रमास चालना देण्यासाठी ही समिती प्रयत्न करते.

**महाराष्ट्र वैद्यकीय संशोधन परिषद**

भारतीय वैद्यकीय अनुसंधान परिषदेच्या धर्तीवर महाराष्ट्रात संशोधनास चालना देण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय संशोधन परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. या परिषदेतर्फे स्टार रिसर्च स्की व माईलस्टोन जर्नल हे दोन प्रकल्प राबविण्यात येत आहेत. मागील तीन वर्षांत ४० लाख रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले असून बहुतेक प्रकल्प पूर्ण झाले आहेत. या परिषदेतर्फे माईलस्टोन नावाचे जर्नल प्रसिद्ध करण्यात येते. यामध्ये वेगवेगळ्या वैद्यकीय विषयांवर दर्जेदार संशोधन प्रसिद्ध करण्यात येते.

संचालनालयांतर्गत अमेरिकेच्या साऊथ फ्लोरीडा विद्यापीठ या संस्थेशी संसर्गजन्य रोगाबाबतच्या संशोधनासंदर्भात करार करण्यात आला असून बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय पुणे येथे आणि जॉन हाफकीन संस्थेमध्ये अमेरिकेच्या सहकार्याने एड्स या विषयावर संशोधन करण्यात येत आहे. नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात रॉक फेलर फाऊंडेशनच्या सहकार्याने साथीच्या रोगांबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन चालू आहे.

**पंतप्रधान स्वास्थ्य सुरक्षा योजना**

भारत सरकारतर्फे या योजनेंतर्गत राज्यातील रुग्णालयांच्या श्रेणीमध्ये वाढ होण्यासाठी ग्रँट वैद्यकीय महाविद्यालयाची निवड करण्यात आली आहे. या अंतर्गत १०० कोटी रुपये केंद्र सरकार देणार असून २० कोटी रुपये राज्य शासनामार्फत देण्यात आले आहेत. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात नागपूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय या संस्थेने अनुदान मिळण्यासाठी राज्य शासनामार्फत केंद्र शासनाला प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर या वैद्यकीय महाविद्यालयाच्या श्रेणीमध्ये वाढ होऊन रुग्णसेवेच्या दर्जात भर पडेल.

**सामाईक प्रवेश परीक्षा**

आरोग्य विज्ञान संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परीक्षेचे काम पारदर्शकपणे पार पाडण्यात येत आहे. वैद्यकीय पदवी पूर्व अभ्यासक्रमाप्रमाणेच वैद्यकीय पदव्युत्तर आणि अतिविशेषउपचार अभ्याक्रमाच्या प्रवेशाकरिता सामायिक परीक्षांचे यशस्वीरीत्या आयोजित करण्यात येत आहे. २०१३ पासून राष्ट्रीय स्तरावर ही परीक्षा घेण्याबाबत विचार चालू आहे.

**(शब्दांकन : सुबोधिनी घरत)**

## नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये

**अलिबाग, नंदुरबार, सातारा, मुंबई महानगर परिसर येथे प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ५०० रुग्ण खाटांचे संलग्नित रुग्णालय सुरू करण्यात येईल. गोंदिया, बारामती, चंद्रपूर येथेही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालये स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.**

# सिंचनाचा भक्कम आधार



**सुनील तटकरे**

**जलसंपदा मंत्री (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून)**

जलसंपदा विभागासाठी २५ एप्रिल २०१२ चा दिवस अविस्मरणीय ठरला. कारण, या दिवशी कोयना जलविद्युत प्रकल्प टप्पा ४ अंतर्गत सरोस्पर्श (लेक टॅप) प्रक्रियेद्वारे विस्तारित अधीजल भुयारात पाणी सोडण्यात जलसंपदा विभागाला यश मिळले. त्यामुळे हा दिवस जलसंपदा विभागाच्या अभूतपूर्व व ऐतिहासिक यशाची नोंद करणारा ठरला. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री सुनील तटकरे आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत लेक टॅपिंगची प्रक्रिया यशस्वी करण्यात आली.

नियोजनपूर्वक कामाची आखणी करून जलसंपदा विभागाच्या अभियंत्यांनी २०० दिवसांऐवजी १०० दिवसांतच हे काम यशस्वी केले. या लेक टॅपिंगद्वारे कोयना टप्पा-४ च्या वीज निर्मितीसाठी १५ अब्ज घनफूट इतके अतिरिक्त पाणी उपलब्ध होईल. त्याद्वारे ६७.५० दशलक्ष युनिट वीजनिर्मिती होईल. यामुळे कोयना टप्पा-४ या जलविद्युत प्रकल्पाची वीजनिर्मिती वर्षभर अखंड सुरू ठेवणे शक्य होईल. जलसंपदा विभागाचे नेतृत्व मंत्री सुनील तटकरे व राज्यमंत्री राजेंद्र मुळक हे करीत आहेत. या विभागाने गेल्या तीन वर्षांत महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. निर्मित सिंचन क्षमतेचा अधिकाधिक वापर होण्यासाठी विभागामार्फत प्रयत्न करण्यात येत आहे. सिंचन स्थितीदर्शक अहवाल, जललेखा अहवाल व पाटबंधारे प्रकल्पाचा स्थिर चिन्हांकन अहवाल प्रसिद्ध करण्यात येत आहे. सन २००१-०२ मध्ये १७.०८ लक्ष हेक्टर प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र होते. सन २०१०-११ मध्ये ते २९.५५ लक्ष हेक्टरपर्यंत पोहोचले आहे.

- केंद्र शासनाच्या वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत एकूण ६९ मोठे-मध्यम प्रकल्प घटक व १८६ ल.पा. प्रकल्पांचा अंतर्भाव झाला असून मार्च २०१२ अखेर ३९ मोठे-मध्यम प्रकल्प घटक व १०० ल.पा. प्रकल्प पूर्ण झाले आहेत.
- आजतागायत शासनातर्फे पूर्ण केलेले ३४ जलविद्युत प्रकल्प (२६३६.३२५ मेगावॅट), खाजगीकरणातून झालेले १७ जलविद्युत प्रकल्प (७७.८० मेगावॅट), टाटा समूहाचे ५ प्रकल्प (४४७ मेगावॅट) आणि महाराष्ट्राचा वाटा असलेले २ आंतरराज्य प्रकल्प (४४४.५० मेगावॅट) असे एकूण ५८ जलविद्युत प्रकल्प पूर्ण झाले असून त्यांची स्थापित क्षमता ३६०५.६२५ मे.वॅ. आहे. सद्य:स्थितीत काळ, कुंभे आणि कोयना धरण पायथा डावा तीर असे ३ प्रकल्प बांधण्यात येत आहेत. त्यांची स्थापित क्षमता प्रस्तावित १०५ मे.वॅ. आहे. खाजगीकरणातून काही लघु जलविद्युत प्रकल्प राबविण्यात येत आहेत. त्यातील १० प्रकल्पांचे (स्थापित क्षमता २९.५० मे.वॅ.) बांधकाम प्रगतिपथावर असून ६२ प्रकल्प लवकरच सुरू होणे अपेक्षित आहे. या प्रकल्पांची स्थापित क्षमता १६१.२५ मे.वॅ. आहे. आतापर्यंत १६१ योजनांची कालवा पुनर्स्थापना कामे, २१६ प्रकल्पांची धरण सुरक्षा कामे पूर्ण झालेली आहेत. लघु वितरीकास्तरीय कालवा पुनर्स्थापना पूर्ण झालेल्या कामांपैकी ७६४ पाणी वापर संस्थांना वितरण प्रणाली पुढील व्यवस्थापन व देखभाल महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने सहा पथदर्शी प्रकल्पांवरील लाभधारकांसाठी पाणी हक्कदारी निश्चित केली आहे. त्या ठिकाणी घनमापन पद्धतीने पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत याव्यतिरिक्त महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत येणाऱ्या ७९७ पाणी वापर संस्थांकरिता पाणी हक्कदारी अंतिम करण्यात आली आहे.प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे पाणी वापर कार्यक्षमतेमध्ये (Water Use Efficiency) ३३.७५ टक्के वाढ झाली आहे. (७८.५ हेक्टर प्रति दशलक्ष घ.मी. ते १०५ हेक्टर प्रति दशलक्ष घ.मी. व कृषि उत्पन्नामध्ये १५.८८ टक्के (रु. ३५३२ प्रति सहस्र घनमीटर ते ४०९३ प्रति सहस्र घनमीटर) एवढी वाढ झाली आहे.


**(शब्दांकन : सुधा महाजन)**




**जागतिक बँक साहाय्यित महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत १५३५ कोटी रुपये जागतिक बँकेकडून (८२ टक्के) कर्ज स्वरूपात प्राप्त होतील. या प्रकल्पांतर्गत २९० प्रकल्पांपैकी २३६ जुन्या पाटबंधारे प्रकल्पांच्या कालव्यांचे व वितरण व्यवस्थेची पुनर्स्थापना केली जाईल व २८६ प्रकल्पांच्या धरणांच्या सुरक्षिततेची कामे केली जातील. या योजनांचे लाभक्षेत्र ६.४५ लक्ष हेक्टर इतके आहे. सिंचन व्यवस्थापनात शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी १५०८ पाणी वापर संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत.**

| महसुली विभाग | एकूण प्रकल्प (संख्या) | कालव्यांचे व वितरण व्यवस्थेच्या पुनर्स्थापनेसाठी प्रस्तावित प्रकल्प (संख्या) | लाभक्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|
| पुणे | ४८ | ४४ | २,०६,६९९ |
| कोकण | ३३ | २७ | ११,३८२ |
| नाशिक | ४४ | २९ | १,६५,१५८ |
| औरंगाबाद | ६९ | ४५ | ६०,१६३ |
| अमरावती | ४३ | ४१ | ५०,३०९ |
| नागपूर | ५३ | ५० | १,५१,९७६ |
| एकूण प्रकल्प | २९० | २३६ | ६,४५,६८७ |

# ‘कृष्णा’ने गतिमान केले प्रगतीचे चक्र...



रामराजे नाईक-निंबाळकर
जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) मंत्री




**कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या स्थापनेनंतर १७५ अब्ज घनफूट उपयुक्त पाणीसाठा निर्माण करण्याचे उद्दिष्ट होते. त्यापैकी जून-२०१२ पर्यंत १५९.३४ अब्ज घनफूट उपयुक्त पाणीसाठा निर्माण करण्यात आला. महामंडळाच्या स्थापनेच्या वेळी ९.८५ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली होती. महामंडळाच्या स्थापनेनंतर जून २०१२ पर्यंत ४.३९ लक्ष हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता निर्मिती केल्याने एकूण १४.२४ लक्ष हेक्टर सिंचन क्षेत्र निर्मिती झाली.**

कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्याच्या वाट्याला आलेल्या ५८५ अब्ज घनफूट पाण्याचा वापर विहित कालावधीत करण्याच्या दृष्टीने एप्रिल १९९६ मध्ये महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाची निर्मिती करण्यात आली. जलसंपदा मंत्री (कृष्णा खोरे) रामराजे नाईक-निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली या महामंडळाची विविध कामे सुरू आहेत. महामंडळाचे कार्यक्षेत्र पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यांत पूर्णपणे व अहमदनगर, उस्मानाबाद, बीड या जिल्ह्यांत अंशत: विभागले आहे.

या जिल्ह्यांतील भौगोलिक क्षेत्रात पाण्याचा सिंचनासाठी वापर होऊ शकेल. या महामंडळांतर्गत २२ मोठे प्रकल्प, ६८ मध्यम प्रकल्प, ९३४ लघु पाटबंधारे प्रकल्प व २० उपसा सिंचन योजना अशा एकूण १०४४ प्रकल्पांमधून ५८५ अब्ज घनफूट पाणी वापराचे प्रकल्प उभारण्याचे नियोजन करण्यात आले होते. महामंडळ स्थापनेपूर्वी ८ मोठे, ३४ मध्यम व ४६४ लघू पाटबंधारे प्रकल्प, अशा एकूण ५०६ प्रकल्पांद्वारे ३८५ अब्ज घनफूट पाणीसाठा व ९.८५ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली.

ऑगस्ट २०१२ पर्यंत प्रकल्पांवर रु. १५,४४१ कोटी एवढा खर्च करण्यात आला. केंद्र शासनाकडून वेगवर्धित सिंचन लाभ योजनेंतर्गत अर्थसाहाय्यातून खडकवासला, चासकमान, उजनी, कृष्णा व कुकडी हे ५ मोठे प्रकल्प व कासारसाई, कडवी, कासारी, कुंभी, पाटगाव, जवळगाव, उत्तरमांड हे ७ मध्यम प्रकल्प व ३० लघू पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यात आले. तारळी, धोम, बलकवडी, वारणा, सांगोला शाखा कालवा व कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना या ५ मोठ्या प्रकल्पांची तसेच मोरणा गुरेघर, वांग व कुडाळी या ३ मध्यम प्रकल्पांची आणि १० लघु प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत. टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व उरमोडी प्रकल्प केंद्र शासनाच्या वेग वर्धित सिंचन लाभ योजनेंतर्गत समाविष्ट करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. नाबार्ड अंतर्गत अर्थसाहाय्यामधून ३१ लघु पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यात आले. कुंभी आणि नागेवाडी हे दोन मध्यम प्रकल्प व २२ लघु पाटबंधारे प्रकल्प प्रगतिपथावर आहेत.

**पुनर्वसन**

महामंडळांतर्गत प्रगतीपथावर असलेल्या विविध प्रकल्पांच्या पुनर्वसन गावठाणांमधील नागरी सुविधा कामांसाठी रु. १५० कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. सुमारे २०६ पुनर्वसित गावठाणांमध्ये विविध नागरी सुविधांची कामे करण्यात आली. कृष्णा नदीच्या उपखोऱ्यात कुंभी, कासारी, वारणा, कृष्णा, कोयना व पंचगंगा या नद्यांमधील अतिरिक्त पाणी भीमा नदीच्या उपखोऱ्यात वळविण्यासाठी कृष्णा भीमा स्थिरीकरण योजना राबविण्याची कार्यवाही सुरू आहे. यामुळे पुणे, सातारा, सोलापूर, उस्मानाबाद या जिल्ह्यांमधील सिंचित क्षेत्रात वाढ होईल.

पूर्ण झालेल्या जलाशयातून थर्मल पॉवर प्लांट, साखर कारखाने, अन्य कारखाने तसेच विविध एम.आय.डी.सी. क्षेत्रातील उद्योगधंद्यांसाठी प्रकल्पाच्या पाण्याच्या औद्योगिक वापराची सुविधा निर्माण झाली आहे. पूर्ण झालेल्या जलाशयात मत्स्य व्यवसायात वाढ होऊन उत्पन्नात वाढ झाली. साखर कारखाने, कागद कारखाने यासारख्या कृषी मालावर आधारित उद्योगधंद्यांची उभारणी होत असून त्यामुळे रोजगार निर्मितीच्या संधी उपलब्ध होत आहेत.

**समन्यायी पाणी वाटप**

कोल्हापूर जिल्ह्यातील चिकोत्रा नदी खोऱ्यातील ५२ गावांमध्ये समन्यायी पाणी वाटप करण्याच्या दृष्टीने प्रथम सहा गावांत प्रायोगिक तत्त्वावर पाणी वाटपाचा प्रकल्प राबविण्याच्या प्रस्तावास शासनाने मंजुरी दिली आहे. बेगवडे, बेलेवाडी (हुब्बळगी), बेलेवाडी (काळमा), हासूर बुद्रूक, मांगनूर आणि बामणी या सहा गावांसाठीच्या पथदर्शी प्रकल्पासाठी ३० कोटी ५४ लाख रुपये एवढ्या खर्चासही प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.




## वीजनिर्मिती

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत धरण पायथा तथा कालवा प्रपात वीजगृह अशा स्रोतांद्वारे जलविद्युत निर्मिती होऊ शकत असल्याने ८१.९० मेगावॅट क्षमतेच्या जलविद्युत प्रकल्पांची कामे ‘बांधा, ताब्यात घ्या, हस्तांतरित करा’ (बी.ओ.टी.) तत्त्वावर देण्यात आली. यापैकी २१.५० मेगावॅट क्षमतेची कामे पूर्ण झाली असून उर्वरित ६०.४० मेगावॅट क्षमतेची कामे प्रगतीपथावर आहेत.**



# २०११-१२ मधील महामंडळाची कामे

■ डिसेंबर -२०११ मध्ये वाकुर्डे उपसा सिंचन योजना अशंत: कार्यान्वित. यामुळे वाकुर्डे उपसा सिंचन योजना भाग-१ अंतर्गत वारणा डाव्या कालव्यातील पाणी उपसा करून वाकुर्डे तलावात सोडून पुढे येणपे बोगद्याद्वारे कराड तालुक्याच्या दुष्काळी भागातील २२०० हेक्टर क्षेत्रास पाणी मिळेल.

■ उरमोडी प्रकल्पांतर्गत खटाव कालव्यातून खटाव तालुक्यातील दुष्काळी भागास पिण्यासाठी व जनावरांसाठी मागणीनुसार पाणी सोडले. त्याद्वारे ३ मोठे बंधारे व विविध नाल्यांवरील ३५ लहान बंधारे भरण्यात आले. त्यामुळे २० गावांतील अंदाजे ४० हजार लोकसंख्येस सिंचनाचा लाभ मिळाला.

■ धोम बलकवडी प्रकल्पांतर्गत धोम बलकवडी उजवा कालवा ६८ ते ७८ कि.मी. (कोपर्डे गावापासून आदर्की गावापर्यंत) कार्यान्वित केल्यामुळे फलटण तालुक्यातील आदर्की परिसरातील १० दुष्काळी गावांतील अंदाजे १२ हजार लोकसंख्येस सिंचनाचा लाभ मिळाला.

■ टेंभू प्रकल्पातून टप्पा-१ अ, १ ब व जोडकालवा-१ चे काम पूर्ण करून हिंगणगाव तलावापर्यंत मार्च २०१२ मध्ये पाणी सोडण्यात आले. याद्वारे ४ लघू पाटबंधारे तलाव, ३० पाझर तलाव व गाव तलाव भरण्यात आले. यामुळे १९ गावांतील अंदाजे ४८ हजार लोकसंख्येस व ८०० हेक्टर क्षेत्रास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सिंचनाचा लाभ मिळाला.

■ कृष्णा कोयना उपसा सिंचन योजनेंतर्गत ताकारी मुख्य कालव्याच्या ६१ ते ९१ कि.मी. (मौजे विसापूर, भालवणी, ता. तासगाव)पर्यंत पाणी सोडण्यात आले. याद्वारे १ लघू पाटबंधारे तलाव, १ पाझर तलाव, २ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, १३ वसंत बंधारे व २ माती बंधारे भरण्यात आले. यामुळे ३२ गावांतील अंदाजे ९४ हजार लोकसंख्येस प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सिंचनाचा लाभ मिळाला.

■ कृष्णा कोयना उपसा सिंचन योजनेअंतर्गत म्हैसाळ भागातील कवठेमहांकाळ कालव्याच्या ६९ कि.मी.मधून नांगोळे तलावात पाणी सोडण्यात आले. जत कालव्याद्वारे बसाप्पावाडी तलावात पाणी सोडण्यात आले. याद्वारे ३ लघू पाटबंधारे तलाव, १७ पाझर तलाव, ५ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, १४ नाला बांध व ९ तलाव भरण्यात आले. यामुळे ५२ गावांतील सुमारे २लाख१३ हजार ५७० लोकसंख्येस प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सिंचनाचा लाभ मिळाला.

■ टेंभू, कृष्णा-कोयना (ताकारी व म्हैसाळ भाग), पुरंदर, जनाई शिरसाई, सिना माढा या उपसा सिंचन योजनांमधून तसेच उरमोडी व धोम बलकवडी या मोठ्या प्रकल्पांतून टंचाई परिस्थितीमध्ये पुणे, सातारा, सांगली व सोलापूर या जिल्ह्यांतील १६ तालुक्यांमधील २१९ गावांसाठी पाणी सोडण्यात आले. त्याद्वारे सुमारे २३० पाझर तलाव, लघू पाटबंधारे तलाव, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, नाला बंधारे भरून दिल्याने पिण्याचे पाणी उपलब्ध होण्याबरोबरच सिंचनातही वाढ झाली.

**(शब्दांकन : डॉ. दिलीप साधले)**

# आदिवासींचा सर्वांगीण विकास






बबनराव पाचपुते
आदिवासी विकास मंत्री

**आदिवासी मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची संधी मिळावी यासाठी ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर या प्रादेशिक कार्यक्षेत्रात प्रत्येकी एक याप्रमाणे केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सी.बी.एस.ई.) धर्तीवर चार एकलव्य निवासी पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता ६ वी ते १२ वीचे वर्ग सुरू करण्यात आले. या शाळांमध्ये प्रवेश देताना आश्रमीय आदिवासी विद्यार्थी असलेल्या तसेच शासकीय अनुदानित आश्रम शाळा, जिल्हा परिषद शाळा इत्यादी शाळांमध्ये इयत्ता ५ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षा घेऊन गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो. आतापर्यंत १,७८० विद्यार्थी या शाळांमधून शिकत आहेत. केंद्र सरकारकडे १४ एकलव्य शाळांसाठी प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत.**

आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आजवर अनेक उपाययोजना शासनाने घेतल्या आहेत आणि प्रगतीच्या दिशेने या समाजाची वाटचाल सुरू आहे. काळाबरोबर प्रगती आणि विकासाच्या संकल्पना बदलतात. काळाबरोबरच आवश्यक असणारे बदल लक्षात घेऊन गेल्या तीन वर्षांत विभागाचे मंत्री म्हणून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय व योजना हाती घेऊन आदिवासींच्या विकासाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न मी केला आहे.

### आश्रमशाळांच्या मालकीच्या इमारती

सर्व आश्रमशाळा आणि वसतिगृह पूर्वी भाडेतत्त्वावरील खाजगी इमारतीमध्ये भरविण्यात येत होत्या. खाजगी इमारतींच्या शाळांमधून क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात होता. त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत होती. ही बाब लक्षात आल्यावर विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये तसेच त्यांना चांगल्या पायाभूत सुविधा मिळाव्यात यासाठी आवश्यक आणि क्षमतेनुसार वसतिगृहे, आश्रमशाळांच्या इमारती बांधण्याकरिता खाजगी, सरकारी जमिनी मिळविणे किंवा तयार इमारती खरेदी करणे ही प्रक्रिया सुरू आहे. वसतिगृह आणि शाळांसाठी इमारती बांधण्यात येत आहेत. यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध असून, युद्धस्तरावर काम सुरू झाले आहे. या योजनेचा मुख्य गाभा शाळा, इमारत, परिपूर्ण इमारत असा आहे. ४७३ शासकीय आश्रम शाळांना जमीन उपलब्ध झाली आहे. त्यावर २२८ इमारती पूर्ण झाल्या आहेत. ९० इमारती प्रगतिपथावर आहेत. उर्वरित इमारतींचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात आला आहे. वसतिगृहासाठी २१८ जमिनी उपलब्ध झाल्या आहेत. ९० इमारती मालकीच्या झाल्या आहेत आणि ९० इमारतीचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. उर्वरित आश्रमशाळा, वसतिगृह इमारतींसाठी जमीन उपलब्ध होण्यासाठी जिल्हाधिकारी, वन विभाग, जलसंपदा या विभागाकडे प्रस्ताव करण्यात आले आहेत.

### ई-विकास

या कार्यक्रमांतर्गत ई-शिष्यवृत्ती हा उपक्रम राबवण्यात येतो. विद्यार्थी आणि शिक्षण संस्था यांना वेळेत शिष्यवृत्ती रक्कम उपलब्ध व्हावी यासाठी etribal.gov.in ही वेबसाइट सुरू करण्यात आली. या वेबसाईटवर विद्यार्थी आणि शिक्षण संस्था शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज करीत आहेत. विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होईल. त्यामुळे शिष्यवृत्ती मिळाली नाही, उशिरा मिळाली अशा तक्रारीला जागा राहणार नाही. शिष्यवृत्तीची हमखास प्रतिपूर्ती होत आहे.

त्याचप्रमाणे ई-विकास या उपक्रमात बजेट मॅनेजमेंट आश्रम शाळा, वसतिगृह योजना, व्यवस्थापन इत्यादी उपक्रम सुरू आहेत. त्यासाठी सॉफ्टवेअर तयार करण्यात आले असून ७० टक्के काम झाले आहे. लाभार्थ्याला कार्यालयांपर्यंत येण्याची गरज नाही. घरात बसून ऑनलाईन अर्ज ते सादर करू शकतात. तंत्रज्ञान खेड्यापर्यंत पोहोचले आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ६८ तालुक्यांत मोठ्या प्रमाणात आदिवासी आहेत. त्यामुळे हा प्रयोग प्रथम या तालुक्यांत करण्यात येत आहे. जनतेला योजनांची माहिती तसेच वसतिगृह व आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश घेण्याकरिता उपयुक्त होईल. यामुळे कामात पारदर्शकता व कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविणे आणि कामावर नियंत्रण करता येईल. आदिवासी विभागात ३० प्रकल्प कार्यालये, चार अप्पर आयुक्त कार्यालये व एक आयुक्तालय ही सर्व कार्यालये व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे जोडण्यात येतील.

### आदिवासींचा आर्थिक विकास

आदिवासींच्या आर्थिक विकासाबाबत विचार करताना जमीन, जंगल या बाबींचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. जंगलात मिळणाऱ्या वनौपजांवर तो उदरनिर्वाह करतो. हिरडा, आवळा यासारखे अनेक वनौपज आहेत. त्यासाठी प्रक्रिया युनिट स्थापन करून स्थानिक पातळीवर आदिवासी युवक-युवतींना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल. कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत स्थानिक गरजेवर आधारित तसेच कौशल्य अनुशेषावर आधारित १ लाख युवक-युवतींना कौशल्य प्रशिक्षण प्रस्तावित आहे. औरंगाबाद येथे ३५० मुलांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. स्थानिक पातळीवर स्वत:चा

## १० लाख विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

आदिवासी विद्यार्थ्यांची शाळेतील गळती थांबावी यासाठी सुवर्णमहोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना राज्यात सुरू करण्यात आली. इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. जिल्हा परिषद व खाजगी शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू केली. यामुळे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली. गळतीचे प्रमाणही कमी झाले. विद्यार्थी आणि पालक यांच्या संयुक्त नावाने बँकेत उघडलेल्या खात्यावर ही शिष्यवृत्ती दर महिन्याला जमा होते. १० लाख विद्यार्थी याचा लाभ घेत आहेत.

व्यवसाय करण्यासाठी ७० टक्के उमेदवारांना प्रत्यक्षात आर्थिक साहाय्य देण्यात येते. आदिवासींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी स्वयंरोजगार आणि नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. यामध्ये नोकरी करण्याचा या युवकांचा कल असतो. नोकरीनिमित्त त्यांनी इतरत्र जाऊ नये यासाठी उपलब्ध असलेल्या उत्पादनाच्या माध्यमातून व्यवसाय करावा म्हणून युवकांचे प्रबोधन करण्यात येते. आश्रमशाळा, वसतिगृह येथे विद्यार्थी आणि कर्मचारी यांची बायोमेट्रिक प्रणालीद्वारे उपस्थिती घेतली जाते. पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षण योजनेंतर्गत २२ हजार मुलांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. पोलीस भरतीमध्ये या मुलांना प्राधान्य दिले जाते. पाच ते साडेसात हजार मुलांना नोकरी मिळाली आहे. हे शिक्षण नामांकित संस्थेद्वारे दिले जाते.

**(शब्दांकन : मुक्ता पवार)**

आर्थिक विकासांबरोबरच आदिवासी समाजामध्ये सामाजिक, सांस्कृतिक बदल घडणे अपरिहार्य आहे. आदिवासींच्या हस्तकला, चित्रकला, आदिवासींनी विकसित केलेली वारली चित्रकला जगप्रसिद्ध झाली आहे. पाश्चिमात्य देशात या कलेचे प्रदर्शन भरविण्यात आली. त्यांच्या कलेला उत्तेजन मिळावे यासाठी जहांगिर आर्ट गॅलरी या कलादालनात वारली कलेचे प्रदर्शनाची संधी शासनाने उपलब्ध करुन दिली.
आदिवासींच्या या कलागुणांचा विकास करण्यासाठी शासनाने पावले उचलली आहेत. वारली चित्रकला, लाकडांवरील कोरीव काम करणाऱ्या या कलावंतांना मदतीचा हात देऊन आदिवासी संस्कृतीचा हा वारसा शासन जपत आहे.





## वनविकास आणि पर्यटनाला प्रोत्साहन

### गोंडवना बायोपार्क




नागपूरस्थित गोरेवाडा येथे २८.३७ हेक्टर वनक्षेत्रावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणिसंग्रहालय स्थापन केले जाईल. हा प्रकल्प महाराष्ट्र वनविकास महामंडळामार्फत पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशिप या तत्त्वावर राबविण्यात येईल. या प्रकल्पाचा खर्च सुमारे ७२० कोटी रुपये आहे. यात गोंडवना बायोपार्क, इंडियन सफारी व आफ्रीकन सफारी, रिव्हर राईड, गोरेवाडा रिझर्व्ह यांचा समावेश आहे.

### व्याघ्र प्रकल्पातील पर्यटन

व्याघ्र प्रकल्पात पर्यटनाला चालना देण्यासाठी राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरणाचे क्षेत्रीय कार्यालय नागपूर येथे सुरू करण्यात आले. या विभागात नवेगांव, नागझिरा आणि बोरला येथे अभयारण्य घोषित करण्यात आले.

### संयुक्त वनव्यवस्थापन

संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे बळकटीकरण आणि वन क्षेत्रात असलेल्या किल्ल्यांचे जतन केले जाईल. वनक्षेत्रात असलेली निसर्गरम्य ठिकाणे व ऐतिहासिक गड-किल्ले संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये आणण्यास मान्यता.
सध्या १२ हजार ५०० संयुक्त वन व्यवस्थापन समित्या कार्यरत आहेत. समितीस अकाष्ठ वनोउपजाचे फायदे व वर्ग केलेल्या क्षेत्राचे किमान ५ वर्ष संरक्षण केल्यानंतर चांगल्या वनक्षेत्रात २० % पर्यंत व ५०% पर्यंत उत्पन्नातील वाटा समितीला मिळेल.

## आघाडी आणि प्रगती

### रोजगार सेवांचे विकेंद्रीकरण

या योजनेद्वारे उमेदवार व उद्योजक यांना सर्व सेवा त्यांच्या राहत्या ठिकाणाच्या जवळ किंवा गावात पुरविली जाईल. सद्य:स्थितीत संपूर्ण राज्यातील महा-ई-सेवा केंद्रे (५,८६५), शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (४१६), तंत्रनिकेतन प्रशाला (१६३), अभियांत्रिकी महाविद्यालये (१३२), अशा एकूण ६,५७६ केंद्रांमधून रोजगार विषयक सेवा सशुल्क उपलब्ध.
राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती व विभागीय स्तरावर विभागीय कौशल्य विकास कार्यकारी समिती स्थापन.

### ८ लाख ईबीसी विद्यार्थ्यांना फी सवलत

आर्थिकदृष्ट्या मागास (ईबीसी) विद्यार्थ्यांसाठी फी सवलत योजनेसाठी निश्चित केलेली वार्षिक उत्पन्नाची मर्यादा १५ हजार रुपयांवरून एक लाख रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाचा लाभ सुमारे ८ लाख २१ हजार ५८८ विद्यार्थ्यांना होईल. १५ हजार रुपये ही मर्यादा १८ वर्षांपूर्वी निश्चित करण्यात आली होती.

### तीर्थक्षेत्रांचा विकास

देहू, आळंदी, पंढरपूर, भंडाराडोंगर, पालखीतळ, श्रीसंत गजानन महाराज समाधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, श्रीक्षेत्र जेजुरी गड, परशुराम तीर्थक्षेत्र येथे मूलभूत सुविधा निर्माण करण्याचे काम सुरू.

### मराठी शाळांसाठी गुगल मॅपिंग

मराठी माध्यमांच्या ग्रामीण भागातील प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी अनुक्रमे १, ३ व ५ कि.मी. अंतरावर जेथे जेथे शाळा उपलब्ध नाहीत अशी ठिकाणे गुगल नकाशावर घेण्यात आली.




# तंत्रशिक्षणात सुधारणा आणि संशोधनाला चालना



राजेश टोपे
उच्च व तंत्र शिक्षण आणि ऊर्जा मंत्री

**राज्यातील उच्च तांत्रिक शिक्षणाचा दर्जा आणि गुणवत्ता वाढून ते जागतिक दर्जाचे व्हावे यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने गेल्या तीन वर्षांत अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. तंत्र शिक्षण सुधार कार्यक्रमांतर्गत सर्वांत जास्त रुपये १६० कोटींचा निधी केंद्राकडून मिळविण्यात राज्याने यश मिळवले असून १७ संस्थांमार्फत या उपक्रमाची यशस्वी कार्यवाही सुरू आहे. उच्च दर्जाच्या संशोधनाला चालना देण्यासाठी संशोधन शिष्यवृत्ती योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तंत्रशिक्षण दर्जा सुधार कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात महाराष्ट्र राज्य सहभागी. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विकासासाठी १० तर पदवी अभ्यासक्रमाच्या विकासासाठी ६ संस्थांची निवड करण्यात आली आहे.**

राज्यातील उच्च शिक्षणात लक्षणीय बदल करून देशाला एक रोल मॉडेल देण्याचा प्रयत्न उच्च व तंत्रशिक्षण विभाग करीत आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री राजेश टोपे आणि राज्यमंत्री डी. पी. सावंत यांनी गुणवत्तापूर्ण सुधारणा करण्यावर भर दिला आहे. गेल्या तीन वर्षांत विभागाने बरेच बदल केले असून त्याचे सकारात्मक परिणाम पुढील काळात दिसणार आहेत.

या विभागाने १२ वी विज्ञान शाखेच्या मुलांसाठी अभियांत्रिकी प्रवेशास एकच संयुक्त प्रवेश परीक्षा (जॉईंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन-जेईई) घेण्याचा निर्णय नुकताच घेतला. यामागील भूमिका स्पष्ट करताना श्री. टोपे यांनी सांगितले, ''या निर्णयामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारून त्यांना व्यापक शैक्षणिक संधी उपलब्ध होतील. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आय.आय.टी.) मध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांची संख्या वाढेल. त्यांच्यातील आत्मविश्वास वाढण्याला मदत होईल. विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती साधताना उच्च शिक्षणात आमूलाग्र बदल घडून येतील असा विश्वास वाटतो.''

उच्च शिक्षणातील सुधार घडविण्यासाठी, १. डॉ. अनिल काकोडकर समिती, २. डॉ. राम ताकवले समिती, ३. डॉ. अरुण निगवेकर समिती अशा तीन समित्या विभागाने नेमल्या. त्यांचे अहवाल विभागाकडे प्राप्त झाले आहेत.

राज्याच्या उच्च शिक्षण विभागातील काही उपक्रम व शाखा राज्यात अग्रस्थानी आहेत. 'नॅक'चा दर्जा मिळविणारी सर्वांत जास्त महाविद्यालये राज्यात आहेत. महाराष्ट्रात ३२४ तंत्र निकेतन व ७५४ औद्योगिक प्रशिक्षण संस्था असून इतर राज्यांच्या तुलनेत ही संख्या अधिक आहे.

महाराष्ट्र ज्ञान मंडळाच्या माध्यमातून ५० लाखांहून अधिक विद्यार्थी संगणक साक्षर झाले आहेत.

सामाजिक व आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक, व्यावसायिक शिक्षण शुल्क परतावा योजना राज्यात राबविण्यात येते. प्रतिवर्षी रु. १२५० कोटी खर्च केले जातात. देशात पारंपरिक, तांत्रिक व व्यवसाय शिक्षण घेणारे सर्वांत जास्त विद्यार्थी महाराष्ट्रात आहेत.

देशात सार्वजनिक ग्रंथालयांच्या चळवळीत महाराष्ट्र अग्रेसर आहे. २०० पेक्षा अधिक वर्षांची परंपरा या चळवळीला आहे. शतक पूर्ण केलेली ८३ ग्रंथालये राज्यात आहेत. ४५ शासकीय तर १०,७३० अनुदानित सार्वजनिक ग्रंथालये आहेत. गतवर्षी पहिल्या डिजिटल ग्रंथालयाची स्थापना मुंबईत करण्यात आली. राज्य मध्यवर्ती ग्रंथालय देशातील सर्व प्रकाशित पुस्तकांसाठी प्रमुख Depositary आहे.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ देशात अग्रेसर आहे. तंत्र शिक्षण सुधार कार्यक्रम अंतर्गत सर्वांत जास्त रुपये १६० कोटींचा निधी केंद्राकडून मिळविण्यात राज्याने यश मिळवले असून १७ संस्थांमार्फत या उपक्रमाची यशस्वी कार्यवाही सुरू आहे. व्यवस्थापन शास्त्र अभ्यासक्रमाचे शिक्षण देणाऱ्या संस्थांचे राज्यभर जाळे असून २९५ संस्था कार्यरत आहेत.

औंध येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था देशात अद्ययावत व अग्रेसर आहे. राज्यात मुलींसाठी व आदिवासींसाठी स्वतंत्र आयटीआय आहेत. आयटीआय प्रवेशासाठी मुलींना वयाची अट नाही.

### महत्त्वाचे निर्णय

- राज्यातील १५ जिल्हा ग्रंथालयांना मान्यता. आता राज्यातील ३५ जिल्ह्यांत शासकीय जिल्हा ग्रंथालये कार्यरत.
- राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचे उपकेंद्र म्हणून अंधेरी, मुंबई येथे १८ ऑगस्ट २००९ पासून

## आय.ए.एस.पूर्व ट्रेनिंग सेंटर

राज्यातील जास्तीत जास्त विद्यार्थी केंद्रीय नागरी सेवेत दाखल व्हावेत या उद्देशाने मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर आणि नागपूर येथे प्री आय.ए.एस. ट्रेनिंग सेंटर सुरू. आणखी पाच ठिकाणी अशी केंद्रे सुरू करण्याचे प्रस्तावित.

आय.ए.एस. पूर्व ट्रेनिंग सेंटरमधील प्रशिक्षणार्थींच्या मासिक विद्यावेतनात १ हजार रुपयांवरून २ हजार रुपये इतकी वाढ. पाहुण्या प्राध्यापकांच्या मानधनात २२५ रुपये प्रतितास रुपयांवरून ६०० रुपये प्रतितास इतकी वाढ.

राज्यातील पहिले डिजिटल ग्रंथालय सुरू.

- नांदेड येथील जिल्हा ग्रंथालयाचे डिजिटल उपकेंद्र २७ फेब्रुवारी २०१२ पासून सुरू. नांदेडप्रमाणेच जालना, सातारा आणि रायगड येथे जिल्हा ग्रंथालयांची डिजिटल उपकेंद्रे स्थापन करण्याची कार्यवाही सुरू.
- विभागीय ग्रंथालय पुणे येथे महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या साहाय्याने शासकीय ग्रंथालयाचे संगणकीकरण करण्याचा पथदर्शी कार्यक्रम.
- शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या परीरक्षण अनुदानात ५० टक्के वाढ.
- महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील ३९ सार्वजनिक ग्रंथालयांना १ कोटी रुपयांचे अनुदान.
- चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यासाठी स्वतंत्र गोंडवाना विद्यापीठ.
- उच्च शिक्षणाचे आधुनिकीकरण करून शिक्षणाच्या कक्षा रुंदावण्यासाठी तसेच नवनवीन विषयावरील अत्याधुनिक पाठ्यक्रम सुरू करून उच्च दर्जाचे शिक्षण देण्यासाठी स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठे स्थापन करण्याचा निर्णय.
- जनतेच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी ललित कला, नाट्य, नृत्य याबाबतची ज्ञान निर्मिती आणि त्यांचे संवर्धन, संघटन आणि प्रचार आणि प्रसार करण्यासाठी ललित कला विद्यापीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव.
- फी प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये सुरू ठेवणार.
- खाजगी-सार्वजनिक-सहभागातून (प्रायव्हेट-पब्लिक-पार्टनरशिप) पुण्यात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नालॉजीची स्थापना करण्याचा निर्णय.
- १४ शासकीय तंत्रनिकेतनमध्ये दुसऱ्या पाळीची सुरुवात. सात तंत्रनिकेतनमध्ये अल्पसंख्याकांसाठी सुविधा.
- कॅनडा कॅलगरी विद्यापीठाचा मास्टर डिग्री इन प्रोजेक्ट मॅनेजमेंट तथा ॲडव्हान्स डिप्लोमा इन प्रोजेक्ट मॅनेजमेंट हे अभ्यासक्रम राज्यात सुरू करण्यासाठी सामंजस्य करार.
- अशासकीय कला संस्थेतील शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात गती आणण्यासाठी औरंगाबाद आणि नागपूर येथे नवीन विभागीय साहाय्यक निरीक्षक, चित्रकला आणि शिल्प कार्यालय सुरू करण्यास मंजुरी. नागपूर येथील कार्यालय सुरू.
- ललित कला शिक्षणाच्या विकासासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम.
- रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, हिंगोली, जालना, बुलढाणा व गडचिरोली या ७ जिल्ह्यांत मॉडेल कॉलेज.
- मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर येथे नवीन न्यायसहायक विज्ञान संस्था.
- सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या मुख्यालयी प्रत्येकी एक मुलींचे वसतिगृह सुरू करण्याचा प्रस्ताव.
- उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत येणाऱ्या शासकीय महाविद्यालयातील कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या मानधनात १२ हजार रुपयांवरून २४ हजार रुपये इतकी वाढ
- मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेची ऑनलाईन अंमलबजावणी. ई.सी.एस. पद्धतीचा अवलंब. या केंद्रांकडून मार्च २०१२ अखेर ४८ हजार ५०५ विद्यार्थ्यांच्या प्रस्तावास मंजुरी.
- ई.बी.सी. सवलतींसाठी उत्पन्न मर्यादेत १५ हजारांह□१ लाखांपर्यंत वाढ.
- विविध विद्यापीठांच्या उपकेंद्रांच्या स्थापनेस मान्यता.
- अलिगड मुस्लीम विद्यापीठांसाठी राज्यात विनामूल्य जागा.
- अमरावती, पनवेल व कोल्हापूर येथे अल्पसंख्याक निधीतून शासकीय महाविद्यालयाच्या आवारात मुलींसाठी वसतिगृहे.
- पनवेल आणि सोलापूर येथे नवीन विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयांची स्थापना.
- राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेच्या धर्तीवर राज्यातील कौशल्य विकास कार्यक्रमाला चालना देण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय शिखर परिषदेची स्थापना.




**(शब्दांकन : राजू पाटोदकर)**

# ललित कला

## ४०० दुर्मीळ पेंटिंगचे संवर्धन

सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई येथे नामांकित चित्रकार व कलाकारांच्या दुर्मीळ पेंटिंगचे जतन व संवर्धन करण्याकरिता आतापावेतो १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. या निधीमधून ४०० पेंटिंगचे जतन व संवर्धन केले जाईल. त्यापैकी ३०० पेंटिंगचे काम पूर्ण झाले. ही पेंटिंग्ज ललित कलेचे शिक्षण घेणाऱ्या महाराष्ट्रातील विद्यार्थी व कलाकारांना संदर्भासाठी व अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात येतात.

## टेक्सटाईल डिझाईनसाठी नवे तंत्र

टेक्सटाईल या अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांना अद्ययावत ज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई व शासकीय कला महाविद्यालय, औरंगाबाद येथील टेक्सटाईल डिझाईन या विभागासाठी नॉर्वे देशातून अत्याधुनिक इलेक्ट्रानिक जॅकार्ड मशीन व नवीन सॅम्पल लूम्स सन २०११-१२ मध्ये उपलब्ध करून देण्यात आली.

## ग्राफिक्स आणि ॲनिमेशन

ललित कलेचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अद्ययावत संगणकीय ज्ञान, ग्राफीक्स व ॲनिमेशन इ.चे ज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय कला संस्थेमध्ये अद्ययावत संगणक लॅब उभारण्यात आली.

## अद्ययावत डिजिटल फोटोग्राफी लॅब

२०११-१२ मध्ये सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई येथे अद्ययावत डिजिटल फोटोग्राफी लॅब तयार करण्यात आली. ४०० विद्यार्थ्यांना अद्ययावत फोटोग्राफीचे शिक्षण दिले जाते. शासकीय कला संस्थेसाठी विविध प्रकारची अद्ययावत सॉफ्टवेअर्स खरेदी करण्यात आली.

## नव्या कला संस्था

औरंगाबाद व नागपूर येथे नवीन विभागीय सहा. निरीक्षक, चित्रकला व शिल्प कार्यालय सुरू करण्यास मंजुरी मिळाली आहे. नागपूर येथे विभागीय कार्यालय सुरू करण्यात आले. २०१२-१३ औरंगाबाद येथे विभागीय कार्यालयाची सुरुवात करण्यात येईल.

# शैक्षणिक क्षेत्राचा नवा जागतिक चेहरा






राजेंद्र दर्डा
शालेय शिक्षण मंत्री

**राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचा दर्जा आणि गुणवत्ता उंचवावी या दृष्टीने विविध नावीन्यपूर्ण उपक्रम गेल्या ३ वर्षांत यशस्वीपणे राबविण्यात आले. महाराष्ट्रातील मुले जागतिक स्पर्धेला समर्थपणे तोंड देऊ शकतील, याद्दष्टीने राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा सन २०१० मध्ये तयार करण्यात आला. यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, बालभारती व बाल चित्रवाणी यांचे सहकार्य घेतले गेले. नवीन शैक्षणिक पद्धतीनुसार पहिली ते आठवीपर्यंत अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. विचार करायला लावणाऱ्या, बालक केंद्री, आनंददायी, स्वयंअध्ययनास चालना देणाऱ्या आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य देणाऱ्या शिक्षण पद्धतीवर भर देण्यात आला. अभ्यासाची व्यवहाराशी सांगड, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन, परीक्षेऐवजी सर्वांगीण मूल्यमापनावर भर, पुस्तकांसह चाचणी, वेळापत्रकाशिवाय मूल्यमापन, गुणांऐवजी श्रेणी, गुणपत्रिकेऐवजी प्रगतिपत्रक अशा वेगळ्या उपक्रमांमुळे महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्राला नवा चेहरा प्राप्त करून देण्यास यश मिळाले.**

प्राथमिक शिक्षण हाच विकासाचा मूलभूत पाया समजला जातो. समता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची प्रस्थापना ही मूल्ये, प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून साधली जातात. शिक्षणाद्वारे सामाजिक, आर्थिक परिवर्तन साध्य होऊ शकते. हे लक्षात घेऊन केंद्र शासनाने २००९ च्या सप्टेंबर महिन्यात 'बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षण हक्क अधिकार' कायदा लागू केला. त्याची अंमलबजावणी १ एप्रिल २०१० पासून राज्यात सुरू करण्यात आली. त्यामुळे बालकांना प्राथमिक शिक्षणासाठी आता सरकारी आणि अनुदानित मान्यताप्राप्त सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मोफत शिक्षण मिळत आहे. विद्यार्थ्यांना पाठ्यक्रम आधारित पुस्तके, शालेय गणवेश, शालेय उपयोगी इतर साहित्य मोफत मिळत आहे.

मुलांना त्यांच्या घरापासून पहिली ते पाचवीपर्यंतची शाळा १ किलोमीटर अंतराच्या आत तर सहावी ते आठवीची शाळा घरापासून ३ किलोमीटर अंतराच्या आत असण्याची सुविधा प्राप्त करून देण्यात आली आहे.

अपंग, कर्णबधिर मुलांना गावातल्या किंवा परिसरातल्या शाळेत जाण्याचा अधिकार आहे. १४ वर्षांवरील मुलांचे शिक्षण अपूर्ण राहिले असेल तर त्याला आठवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्याचा अधिकार या कायद्यामुळे मिळाला आहे. मुलांचे वय जर १० वर्षे असेल तर त्याला इयत्ता चौथीच्या वर्गात प्रवेश घेण्याची तरतूद या कायद्यात आहे.

आधीच्या वर्गातील राहिलेला अभ्यास, शाळेत जाऊ न शकलेल्या मुलांच्या अभ्यासक्रमावर विशेष लक्ष देऊन भरून काढण्याची जबाबदारी शाळेची आणि शिक्षकांची राहील. समाजातील वंचितांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, श्रीमंत आणि गरीब विद्यार्थ्यांमधील दरी कमी करणे हे लक्ष्य ठेवून राज्य शासनाने विनाअनुदानित आणि अनुदानित २५ टक्के वंचित व आर्थिक दुर्बल घटकांच्या बालकांसाठी आरक्षण लागू केले आहे.

### पटपडताळणी

शिक्षण क्षेत्रातील अपप्रवृत्तींना अटकाव करण्यासाठी शासनाने विविध पावले उचलली आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबद्दल राज्यातील सर्व जिल्ह्यांत विशेष पटपडताळणी मोहीम, खाजगी शाळांमध्ये आकारण्यात येणाऱ्या अवाजवी शुल्काला आळा या बाबींचा समावेश आहे. प्राथमिक शाळांना जोडलेल्या पूर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व अध्यापक विद्यालय यामध्ये अवाजवी शुल्क आकारले जाऊ नये, शिक्षणाचे बाजारीकरण रोखले जावे, विद्यार्थी व पालकांच्या हिताचे रक्षण व्हावे या भूमिकेतून खाजगी शाळांमध्ये आकारण्यात येणाऱ्या अवाजवी शुल्काबाबतही निर्णय घेण्यात आला.

केंद्र शासनाच्या मदतीने राज्यामध्ये माहिती तंत्रज्ञानासंबंधीचे प्रशिक्षण कार्य (ICT योजना) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये सुरू करण्यात आली आहे. हा कार्यक्रम महाराष्ट्रातील ५०० शाळांमध्ये पहिल्या टप्प्यात तर २ हजार ४०० शाळांमध्ये दुसऱ्या टप्प्यात सुरू करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त सर्व शिक्षा अभियानामधून ४ हजार ४४६ संगणक प्रयोगशाळा उच्च प्राथमिक शाळांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या असून ई-लर्निंग सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

### शिक्षणाचा गुणात्मक विकास

- शिक्षणाच्या गुणात्मक विकासाचा भाग म्हणून १० वी व १२ वीच्या परीक्षेमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कॉपीमुक्त अभियानाची अंमलबजावणी करण्यात आली.
- मराठी शाळांच्या परवानगीसाठी बृहत् आराखडा.
- शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ.
- शिक्षण सेवकाच्या पदनामात बदल.
- शिक्षण सेवकांना जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करणे.
- पाच हजार शाळांच्या मूल्यांकनास मान्यता.
- सीमा भागात मराठी शाळांना परवानगी.
- सर्वोत्तम पाच (बेस्ट-फाईव्ह) योजनेत सर्वोच्च न्यायालयात यश.
- १० वी व १२ वी परीक्षेचे वेळापत्रक वर्षाच्या सुरुवातीला जाहीर.

**(शब्दांकन : काशिबाई थोरात)**

## शिक्षकांना इंग्रजीचे प्रशिक्षण

**माहिती तंत्रज्ञानाच्या युगात माहितीचा साठा मोठ्या प्रमाणात इंग्रजी भाषेत उपलब्ध असल्याने महाराष्ट्रातील मुलांना मराठीबरोबरच उत्तम इंग्रजी येणे महत्त्वाचे आहे. यासाठी शिक्षकांच्या इंग्रजी कौशल्यात वाढ होणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळातील ६७ हजार प्राथमिक शिक्षकांना इंग्रजी भाषेचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी ब्रिटिश कौन्सिल, मुंबई व राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्यात 'इंग्रजी भाषा विषयक प्रशिक्षण' या उपक्रमावर सामंजस्य करार झाला आहे.**

# ४० हजार कोटींची गुंतवणूक आणि ११ लाख रोजगार







**मो.हम्मद आरीफ (नसीम) खान**
वस्त्रोद्योग, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्री


**महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक कापूस उत्पादन करणारे राज्य आहे. राज्यात दरवर्षी सुमारे ९२ लाख गाठी कापसाचे उत्पादन होते. त्यापैकी फक्त २० लाख गाठी कापसावरच (म्हणजे सुमारे फक्त २९ टक्के कापसावर) राज्यात प्रक्रिया होते. उर्वरित कापूस शेजारच्या राज्यात प्रक्रियेसाठी जातो. त्यामुळे राज्यात उत्पादित होणाऱ्या कापसाच्या प्रत्येक बोंडावर राज्यातच प्रक्रिया व्हावी या दृष्टीने नवीन वस्त्रोद्योग धोरण आखण्यात आले. या नव्या धोरणामुळे राज्यात येत्या पाच वर्षांत सुमारे ४० हजार कोटी रुपयांची नवी गुंतवणूक येणे अपेक्षित असून सुमारे ११ लाख नवे रोजगार निर्माण होतील. कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापसाला वाढीव भाव मिळेल. हे नवे वस्त्रोद्योग धोरण राज्याची विकास प्रक्रिया अधिक गतिमान करेल.**

मुंबईतील गिरण्या बंद पडल्यामुळे तसेच मागील काही वर्षांत असलेल्या मंदीच्या सावटामुळे महाराष्ट्रातील वस्त्रोद्योगाला ओहोटी लागल्याचे चित्र निर्माण झाले होते. प्रमुख कापूस उत्पादक क्षेत्र असलेल्या विदर्भात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाणही वाढले होते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासनामार्फत व्यापक प्रयत्न तर करण्यात आलेच, पण दीर्घकालीन उपाययोजना म्हणून विदर्भासह महाराष्ट्राच्या मागास भागातील शेतकरी, बेरोजगार यांच्यासाठी काही ठोस कार्यक्रम राबविणे गरजेचे होते. २००९ मध्ये मी वस्त्रोद्योग मंत्रीपदाचा कार्यभार हाती घेतला आणि या विभागामार्फत भरीव कार्य करण्याचा निर्णय घेतला.

### उद्योजकांना सवलती

वस्त्रोद्योग धोरणात सहकाराबरोबरच खाजगी उद्योजकांनाही गुंतवणुकीसाठी मोठ्या सवलती देण्यात आल्या आहेत. कापूस उत्पादित होणाऱ्या विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र या क्षेत्रात प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी १० टक्के भांडवली अनुदान व १२.५ टक्के व्याज सवलत असा दुहेरी लाभ दिला जाणार आहे. उर्वरित महाराष्ट्रात प्रक्रिया उद्योग उभारल्यास १२.५ टक्केपर्यंत व्याज सवलत दिली जाणार आहे.

जिनिंग, प्रेसिंग, विव्हिंग, निटिंग, डाईंग, यंत्रमाग, हातमाग, टेक्निकल टेक्स्टाईल, रेडीमेड गारमेंट आदी सर्व प्रकारच्या प्रक्रिया उद्योगांना चालना देऊन 'कापसापासून कापडापर्यंत' सर्व प्रक्रिया राज्यातच करून उद्योग आणि रोजगार वाढविणारे हे महत्त्वाकांक्षी धोरण आहे.

### धोरणाचे यश दृष्टिक्षेपात

राज्यात नुकतीच ४११ वस्त्रोद्योग प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून यातून सुमारे ३ हजार ८३४ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. तसेच यातून सुमारे २९ हजार बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे. ८ नामवंत उद्योग समूहांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याबाबत इरादापत्र दिले असून यातून साधारण ४ हजार कोटी रुपयांची नवीन गुंतवणूक होणार आहे.

वस्त्रोद्योग धोरणाच्या माध्यमातून जास्तीत जास्त गुंतवणूक महाराष्ट्रातील कापूस उत्पादक क्षेत्रात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. याचाच एक भाग म्हणून आम्ही अहमदाबाद (गुजरात) येथे नुकतीच वस्त्रोद्योजकांची एक भव्य परिषद घेऊन त्यात महाराष्ट्राच्या वस्त्रोद्योग धोरणाचे सादरीकरण केले. या धोरणाने प्रभावीत होऊन गुजरातेतील अनेक नामवंत उद्योजकांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यात स्वारस्य दाखविले.

## वस्त्रोद्योग धोरण

- नवीन येणाऱ्या वस्त्रोद्योगांसाठी लागणारे प्रशिक्षित कामगार व मनुष्यबळ पुरविण्यासाठी आयटीआयमध्ये वस्त्रोद्योगाशी संबंधित नवीन अभ्यासक्रम.
- वस्त्रोद्योग कामगारांसाठी सवलतीच्या दराने विमा योजना व घरकूल योजना.
- सर्व सहकारी व खाजगी औद्योगिक घटकांचा समावेश.
- अनुसूचित जाती, जमाती व अल्पसंख्याक समाजातील उद्योजकांना विशेष प्रोत्साहन.



मुंबईतही काही महिन्यांपूर्वी अशी परिषद घेण्यात आली. देशातील काही राज्यातही लवकरच अशा परिषदा घेऊन राज्यात जास्तीत जास्त गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

### अल्पसंख्याकांचा विकास

वस्त्रोद्योगाबरोबरच अल्पसंख्याक विकास विभागाच्या योजनांना मागील तीन वर्षांत गतिमान करण्यात आले आहे. सच्चर समितीच्या अहवालातील शिफारशी आणि पंतप्रधानांच्या अल्पसंख्याक विकासविषयक नवीन १५ कलमी कार्यक्रमास अनुसरून राज्य शासनामार्फत अनेक योजना राबविल्या जात आहेत. राज्यामध्ये मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, पारशी आणि जैन या धार्मिक समुदायांना अल्पसंख्याक म्हणून घोषित करण्यात आले आहे.

### शिक्षणावर भर

अल्पसंख्याक समाजातील मुलांचे शाळा गळतीचे प्रमाण अधिक असून उच्च शिक्षणातील प्रमाणही चिंताजनक आहे. हे लक्षात घेऊनच धोरणाची आखणी करण्यात आली असून त्याचे फलस्वरूप निदर्शनास येत आहे.

शाळांमध्ये मूलभूत सुविधांसाठी २ लाख रुपये निधीची योजना, विविध शिष्यवृत्ती योजना, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेली शैक्षणिक कर्ज योजना, मोफत गणवेष वाटप योजना आदींचा अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना लाभ मिळत आहे.

### शासकीय यंत्रणेत अल्पसंख्याक

विविध शासकीय यंत्रणांमध्ये अल्पसंख्याक समाजाचे प्रमाण कमी असल्याचे सच्चर समितीच्या अहवालातून पुढे आले. त्यामुळे शासकीय

## अल्पसंख्याकांचे सक्षमीकरण

- अल्पसंख्याक आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्रदान.
- आयोगाला कोणत्याही बाबतीत पुरावा गोळा करणे, शपथेवर पुरावा येणे, साक्षीदारांना समन्स काढून हजर राहण्यास भाग पाडण्याचे अधिकार प्राप्त.
- नगर परिषदा, नगरपालिका, महानगरपालिकांमधील अल्पसंख्याक बहुल भागांमध्ये पायाभूत सोयी निर्माण करण्यासाठी १० ते २० लाखांपर्यंत अनुदान देण्याची योजना यशस्वी.
- या योजनेची व्याप्ती अल्पसंख्याक बहुल ग्रामीण भागापर्यंत वाढवणार.
- विदर्भ, मराठवाडा व मध्य भारतातून हज यात्रेसाठी जाणाऱ्या मुस्लीम बांधवांसाठी नागपूर येथे हज हाऊस.
- औरंगाबाद येथे हज हाऊस बांधण्यासाठी मंजुरी.



- अल्पसंख्याक समाजामधील तरुणांना रोजगारक्षम बनविण्यासाठी राज्यातील ४४ आयटीआयमध्ये तसेच अल्पसंख्याक बहुल क्षेत्रातील १२ पॉलिटेक्निकमध्ये दुसऱ्या पाळीतील विशेष वर्ग सुरू.
- अल्पसंख्याक मुलींसाठी जिल्हा पातळीवर वसतिगृहे निर्माण करण्यात येणार असून याबाबत कार्यवाही सुरू आहे.
- अल्पसंख्याकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अनेक नावीन्यपूर्ण शैक्षणिक योजना कार्यान्वित.
- पोलीस भरतीमध्ये अल्पसंख्याकांसाठी विशेष प्रशिक्षणाचे आयोजन. त्या अंतर्गत आतापर्यंत १०४२७ युवकांना प्रशिक्षण.
- अल्पसंख्याकांसाठी सच्चर समितीने दिलेल्या अहवालानुसार पंतप्रधानांच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमांची राज्यात प्रभावी अंमलबजावणी.
- राज्यातील अल्पसंख्याकांच्या मागण्यांच्या मसुदा निर्मितीचे काम.

नोकऱ्यांमध्ये अल्पसंख्याकांचे प्रमाण वाढावे यासाठी राज्यात विशेष प्रयत्न केले जात आहेत. पोलीस भरतीच्या पूर्वतयारीसाठी शासनामार्फत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जात असून या योजनेला चांगले यश मिळाले. राज्यात या योजनेतून आतापर्यंत १० हजार ४२७ अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण घेतलेल्या १ हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची पोलीस दलात निवड झाली. यशदा आणि राज्य शासनाच्या आयएएस प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून



अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी राबविली जात असलेली आयएएस, आयपीएस परीक्षा प्रशिक्षण योजनाही यशस्वी होत आहे. या योजनेतून प्रशिक्षण घेतलेले ६ अल्पसंख्याक विद्यार्थी यूपीएससीची पूर्व परीक्षा उत्तीर्ण झाले असून आता ते मुख्य परीक्षेची तयारी करीत आहेत. एमपीएससीसह विविध राज्य शासकीय सेवेतील भरतीसाठीही अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याची योजना प्रस्तावित आहे. कोणत्याही योजनेला निधी कमी पडू दिला जाणार नाही.

**(शब्दांकन : ईर्शाद ल. बागवान)**


(पान ३१ वरून)

## पारदर्शक आणि हायटेक

- भरती प्रक्रियेतील परीक्षार्थ्यांसाठी, तसेच उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळा सोडल्याचा दाखला ग्राह्य धरून अधिवास प्रमाणपत्राची अट शिथिल केली.
- खंडकरी शेतकऱ्यांना जमीन वाटप सुरू केले.
- बेदखल कुळांना मालकी हक्क प्राप्त.
- प्रलंबित मोजणी पूर्ण करून कालबद्ध पद्धतीने काम करून मोजणी प्रकरणात शून्य प्रलंबितता.
- शेतकऱ्यांची प्रलंबित मोजणी प्रकरणे सत्वर निकाली काढण्यासाठी खाजगी सर्वेअरची नियुक्ती.
- वाळू लिलावात पारदर्शकता आणण्यासाठी ई-टेंडरिंग पद्धती.
- महसूल विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाचे नूतनीकरण व दुरुस्ती
- मोजणी प्रकरणांचे नियोजन करण्याकरिता आज्ञावली (ई-मोजणी)
- नझूल जमिनीचा भाडेपट्टा ठरवून हस्तांतरणाच्या परवानगीची पद्धत सोपी करणारे नागपूर व अमरावती विभागातील नझूल धोरण जाहीर.
- जनतेस उत्तम सेवा आणि सुविधा मिळाव्या यासाठी मुद्रांक शुल्क कार्यालयांचे अद्ययावतीकरण.
- संपूर्ण विदर्भातील भूमिधारी शेतकऱ्यांचे भूमिस्वामी शेतकऱ्यांत रूपांतर करण्याची विषेश मोहीम राबविण्यात येत आहे.
- प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख करण्यासाठी राज्यातील महसूल उपविभागांची पुनर्रचना करणार. दोन तालुक्यांसाठी एक उपविभाग आणण्याचा मनोदय. राज्यात ७१ नवीन उपविभागांची निर्मिती.

**(शब्दांकन : अर्चना शंभरकर)**

# जीवनदायी-देशात आघाडी







**सुरेश शेट्टी**

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण आणि राजशिष्टाचार मंत्री


**आरोग्य विभागाच्या प्रशासकीय कार्यपद्धतीत सुधारणा करण्यासोबत रुग्णांना मिळणाऱ्या सेवांचा दर्जा उंचावण्याकडे प्राधान्याने लक्ष दिले जात आहे. नुकतीच राज्यात महत्त्वाकांक्षी अशी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात गडचिरोली, अमरावती, नांदेड, सोलापूर, धुळे, रायगड, मुंबई उपनगर व मुंबई शहर या ८ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्र हे देशात एकमेव असे राज्य आहे जेथे या योजनेसाठी उत्पन्नाची मर्यादा एक लाख रुपयांपर्यंत ठेवली आहे. ती देशात सर्वाधिक आहे. अन्य राज्यांमध्ये अशा योजनेसाठी वार्षिक उत्पन्नाची अट ही ५० ते ६० हजार रुपये एवढीच आहे.**


सामान्य नागरिकांना वेळेवर आरोग्य सेवा मिळावी यासाठी आरोग्यमंत्री सुरेश शेट्टी यांनी आरोग्य संस्थांच्या बळकटीकरणाबरोबरच प्रशासकीय पातळीवर पारदर्शकता आणून सकारात्मक निर्णयांद्वारे बदल केले. राज्याच्या दृष्टीने महत्त्वाकांक्षी असलेल्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची यशस्वी अंमलबजावणी सुरू झाली.

### व्हिजन डॉक्युमेंट

आरोग्य विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर जनतेच्या अपेक्षांचे प्रतिबिंब असलेले व्हिजन डॉक्युमेंट तयार केले. आरोग्य विभागात मोठ्या प्रमाणात प्रशासकीय सुधारणा करण्याची आवश्यकता होती. गेल्या अनेक वर्षांपासून डॉक्टर्स, नर्सेस, पॅरामेडिकल यांच्या रिक्त पदांची संख्या जास्त होती. हे लक्षात घेऊन तातडीने भरती प्रक्रिया राबविण्याची मोहीम हाती घेतली. गेल्या अडीच वर्षांत अशा दोन मोहिमा राबविल्या. तज्ज्ञ डॉक्टरांचं केडर तयार केलं.

### माहिती तंत्रज्ञानाचा वापर

आरोग्य विभागामध्ये मोठ्या प्रमाणावर माहिती तंत्रज्ञानाचा (आयटी) वापर सुरू झाला आहे. यामध्ये औषधाविषयीच्या वेबबेस्ड इनव्हेंटरी मॅनेजमेंट सिस्टीमचा समावेश आहे. राज्यामध्ये विविध आरोग्य संस्थांमध्ये आंतररुग्ण / बाह्यरुग्ण तसेच इतर दिल्या जाणाऱ्या सेवांचा त्याच दिवशीचा अहवाल 'पुल एसएमएस'द्वारे प्राप्त होतो. आरोग्य विभागामध्ये कार्यरत वैद्यकीय अधिकारी तसेच विशेषज्ञांच्या सेवा तपशिलाचे संगणकीकरण करण्यात आले. वार्षिक सर्वसामान्य बदल्यांसाठी 'ऑनलाईन' पद्धतीने वैद्यकीय अधिकाऱ्यांना अर्ज पाठविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारित आणि अस्तित्वात असलेल्या दोन




आरोग्य संस्थांमधील अंतर विचारात घेऊन विविध आरोग्य संस्था स्थापनेचा आणि अस्तित्वात असलेल्या आरोग्य संस्थांच्या श्रेणीवर्धनाचा बृहत् आराखडा शासनाने नुकताच मान्य केला आहे. यामुळे जवळपास १२५७ विविध आरोग्य संस्था स्थापन करण्यात येणार असून, अस्तित्वात असलेल्या ५७ विविध आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये १९१६ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदांसहीत एकूण २११५२ विविध पदांची निर्मिती करण्यात येणार आहे.

आरोग्य विभागातील महत्त्वाचा घटक असलेल्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत दर्जेदार व विनामूल्य आरोग्य सेवा सामान्य माणसापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले जातात. मातामृत्यू आणि बालमृत्यू कमी करणे आणि लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे, हे मुख्य उद्दिष्ट या अभियानाचे आहे.

या अभियानांतर्गतच ई-फायलिंग कार्यप्रणाली राज्याने अवलंबिली आहे. मला सांगायला आनंद वाटतो की, महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे ज्याने पंतप्रधान कार्यालयानंतर ई-फाईलिंग सेवेचा अंगीकार केला आहे. या नव्या प्रणालीनुसार राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान मुंबई यांच्या कार्यालयातून पत्रांचे वाटप, नस्त्यांची आवक-जावक, त्यावरील अभिप्राय आणि निर्णय टप्प्याटप्प्याने पूर्णपणे संगणकावर पार पाडले जात आहेत. ही ई-फाईल प्रणाली सध्या मुंबई येथील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य कार्यालय व पुणे येथील कुटुंब कल्याण कार्यालयात राबविण्यात येत आहे.


स्त्रीभ्रूणहत्येसारख्या सामाजिक समस्येविरुद्ध लढण्यासाठी शासनाने कायद्याच्या अंमलबजावणीसोबतच समाजाची मानसिकता बदलण्यासाठीदेखील प्रयत्न केले जात आहेत. स्त्रीभ्रूणहत्येला प्रतिबंध व्हावा म्हणून सोनोग्राफी केंद्र व गर्भपात केंद्र यांची तपासणी मोहीम घेण्यात येत आहे. राज्यातील जनतेला चांगल्या प्रकारे आरोग्य सेवा मिळण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. त्याच भावनेतून अनेक चांगल्या योजना अंमलात आणण्याचा प्रयत्न केला आहे.

**(शब्दांकन : अजय जाधव)**

## ९३७ रुग्णवाहिका

**आपत्कालीन वैद्यकीय सेवा हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्यात येईल. याद्वारे ९३७ रुग्णवाहिका सुरू करण्यात येतील. इतक्या मोठ्या प्रमाणावर रुग्णवाहिकांची सेवा असणारे महाराष्ट्र हे जगातील पहिले राज्य ठरेल. कारण, सध्या जगात सर्वांत जास्त रुग्णवाहिका सेवा (७००) ही लंडनमध्ये दिली जाते.**

# कामगारांच्या कल्याणासाठी






**हसन मुश्रीफ**
कामगार आणि विशेष सहाय्य मंत्री

**राज्यातील संघटित, असंघटित कामगारांना न्याय देण्याबरोबरच बालकामगारांना कामाच्या ठिकाणावरून मुक्त करून त्यांचे पुनर्वसन करणे, कामगारांची ऑनलाइन नोंदणी करणे, कामगार विभागाचा कारभार ऑनलाइन करणे, बांधकाम कामगार, घरेलू कामगारांसाठी कल्याण मंडळांचे गठण असे निर्णय मागील तीन वर्षांत कामगार विभागाने घेतले. अनेक कंपन्यांच्या व्यवस्थापनासोबत झालेल्या बैठकांमध्ये संप संपुष्टात आणून काम पूर्ववत सुरू केले. निलंबित कामगारांना पुन्हा कामावर घेण्यासाठी आस्थापनांना बाध्य केले. कामगारांचे वेतन, कामगार कायद्यांची अंमलबजावणी हे महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन कामगारांना मोठा दिलासा दिला आहे.**

गेल्या तीन वर्षांत कामगारमंत्री हसन मुश्रीफ यांनी विविध क्षेत्रातील संघटित-असंघटीत कामगार यांच्या कल्याणाच्या दृष्टीने कामगार कल्याण विभागाला नवी दिशा दिली आहे. त्यामुळे कामगारांचे अनेक प्रश्न सुटले आहेत.

माथाडी कामगारांकडून ५० किलोपेक्षा जास्त वजनाची चढ-उतार किंवा हाताळणी करून घेण्यास मज्जाव करणारा निर्णय घेण्यात आला. शेजारच्या राज्यातून महाराष्ट्रात पोत्यातून येणारा मालही ५० किलोपेक्षा जास्त वजनाचा नसावा असे त्यांना कळविण्यात आले.

### ऑनलाईन कामगार विभाग

www.mahashramm.gov.in या वेबसाईटवर कामगार संघटना, पदाधिकारी, असंघटित कामगारांसाठी काम करणारे कार्यकर्ते कामगारविषयक कायदे, शासन निर्णय, परिपत्रके उपलब्ध होणे सुलभ झाले. कामगार कायद्याच्या अंमलबजावणीचे सुलभीकरण होण्याच्या दृष्टीने 'कामगार व्यवस्थापन प्रणाली' नावाची ऑनलाईन पद्धती सध्या काही जिल्ह्यांमध्ये पथदर्शी तत्त्वावर सुरू करण्यात आली आहे.

### मोलकरीण, गवंड्यांचे कल्याण

कामगार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली बांधकाम कामगार कल्याण मंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळामार्फत आतापर्यंत साधारण ६७ हजार ७४५ बांधकाम कामगारांची नोंदणी झाली. बांधकाम व्यावसायिक, बिल्डर, विकासक आदींना बांधकाम किमतीच्या १ टक्का उपकर मंडळाच्या खात्यावर भरणे अनिवार्य करण्यात आले असून याअंतर्गत ऑगस्ट २०१२ अखेर ८०७ कोटी रुपये जमा झाले. या निधीतून गवंडी, सुतार, रंगारी, आदींसारख्या बांधकाम कामगारांकरिता विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातील.

घरेलू कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी घरेलू कामगार कल्याण मंडळ गठीत करण्यात आले आहे. महाराष्ट्रात घरेलू कामगारांची नोंदणी सुरू करण्यात आलेली असून ऑगस्ट २०१२ अखेर १ लाख ४१ हजार ६८३ घरेलू कामगारांची नोंद झाली आहे. या मंडळामार्फत घरेलू कामगारांकरिता विविध कल्याणकारी योजना राबविल्या जाणार आहेत.

### धनादेशाद्वारे कामगारांचे वेतन

## दुर्बलांना आधार

**राज्यातील निराधार, वृद्ध, अपंग, विधवा, घटस्फोटित महिला आदी उपेक्षित, वंचित घटकांना निवृत्तिवेतन देण्यात येते. विविध निवृत्तिवेतन योजनांद्वारे दुर्बल घटकांना थेट अनुदान दिले जाते. या योजनांमधून केंद्र व राज्य शासनामार्फत ६०० रुपये निवृत्तिवेतन दिले जाते.**

**या योजनांचा लाभ लाभार्थ्यांना गावात जाऊन देण्यात येतो. या नव्या पद्धतीत पारदर्शकता राहावी व खऱ्या लाभार्थ्याला रोख स्वरूपात अनुदानाचा लाभ मिळावा यासाठी बायोमेट्रीक पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.**

विविध दुकाने, आस्थापना, कारखाने, कंपन्या आदी कोणत्याही ठिकाणी कार्यरत असलेल्या सर्व प्रकारच्या कामगारांचे वेतन बँकेमार्फत किंवा धनादेशाद्वारे देण्याबाबत नियम करण्यात आला असून त्याच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न सुरू आहेत.

### आधी कामगारांची देणी - मगच ना-हरकत

राज्यातील बंद पडलेल्या गिरण्या, कंपन्या, कारखाने यांच्या जमिनीची विक्री, विकास किंवा हस्तांतरण करताना तसेच एमआयडीसीतील उद्योगांचे हस्तांतरण किंवा विक्री करताना कामगारांची सर्व देणी अदा करून देणी प्रलंबित नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे नाहरकत प्रमाणपत्र असल्याशिवाय कारखान्याची विक्री, विकास किंवा हस्तांतरणाची कोणतीही कार्यवाही पूर्ण करता येत नाही. त्यामुळे कंपनी बंद करताना कामगारांची सर्व देणी देणे कंपनी मालकांना भाग पडू लागले आहे.

### बालकामगारांचे पुनर्वसन

बालकामगार प्रथेच्या निर्मूलनासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स निर्माण करण्यात आले आहेत. त्याअंतर्गत दुकाने, कारखान्यांवर धाडी टाकून बालकामगार मुक्त करून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात येत आहे. राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प १६ जिल्ह्यांमध्ये कार्यान्वित असून ४८३ शाळांमध्ये २० हजार ६२८ बालकामगार शिक्षण घेत आहेत.

### विशेष साहाय्य योजना

पेन्शन योजनेचा लाभ घेण्यासाठी घटस्फोटित मुस्लीम स्त्रीबाबत तिच्या सासर किंवा माहेरच्या वास्तव्याच्या परिसरातील मस्जिदमधील काझीने दिलेला दाखला किंवा मुस्लीम समाजासाठी धार्मिक कार्य करणाऱ्या नोंदणीकृत संस्थेने ठराव केल्यास तो ग्राह्य धरण्यात येईल.

विशेष साहाय्य योजनेंतर्गत लाभार्थ्यांना दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये अनुदान, निवृत्तिवेतन देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले आहेत.

### भूमिहीन कुटुंबांचे संरक्षण


ग्रामीण भागातील १८ ते ५९ वयोगटातील भूमिहीन शेतमजुरांसाठी राबविल्या जाणाऱ्या आम आदमी विमा योजनेतून

(उर्वरित पान ५६ वर)

# रोहयोचा कायापालट



डॉ. नितीन राऊत
रोहयो आणि
जलसंधारण मंत्री




**क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयीन यंत्रणांमध्ये व्यापक जागृती, कार्यपद्धतीचे सुलभीकरण, प्रशासकीय सुधारणा, योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता नागपूर येथे स्वतंत्र आयुक्तालय, राज्य महात्मा गांधी रा.ग्रा.रो.ह. निधीची निर्मिती, कर्मचाऱ्यांचे प्रभावी प्रशिक्षण, २९ जिल्ह्यांमध्ये तक्रार निवारण अधिकाऱ्यांची नियुक्ती, पोस्टाची व बँकेची सुविधा नाही अशा गावांसाठी ८ तालुक्यांमध्ये राष्ट्रीयीकृत बँकांच्या व्यावसायिक प्रतिनिधींची नियुक्ती, कर्मचाऱ्यांचे प्रभावी प्रशिक्षण, माहिती व्यवस्थापन कार्य प्रणालीचे बळकटीकरण व मुनष्यबळ आऊटसोर्स अशा प्रकारे या योजनेंतर्गत नावीन्यपूर्ण नियोजन व अंमलबजावणी केल्याने या योजनेचा कायापालट झाला आहे. ही योजना आता सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचली आहे.**

राज्याच्या ग्रामीण भागाचा कायापालट करण्याबरोबरच रोजगार हमी योजनेने ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे मोठे काम केले आहे. ग्रामीण भागाच्या समृद्धीचे श्रेय बरेचसे या योजनेला जाते. दुष्काळग्रस्तांना संजीवनी देण्याचे कार्य या योजनेमार्फत केले जात आहे. स्थायी स्वरूपाची मालमत्ता निर्माण करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

## महत्त्वाचे निर्णय

- विविध यंत्रणा व ग्रामपंचायती मार्फत तयार करण्यात आलेल्या रोपवाटिकांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोपवाटिका असे नाव देण्याचा निर्णय.
- या योजनेंतर्गत आर्थिक व तांत्रिक मापदंड निश्चित करून ग्रामपंचयात व यंत्रणांमार्फत शेततळ्यांची कामे घेण्याचा निर्णय.
- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार योजनेंतर्गत आवश्यक रजिस्टर व अर्ज यांचे नमुने विहित करून संबंधितांना छपाई करून देण्याबाबत सूचना.
- जॉब कार्ड नूतनीकरणाची विशेष मोहीम.
- इलेक्ट्रॉनिक फंड मॅनेजमेंट सिस्टीम (ईएफएमएस) हा पथदर्शी प्रकल्प ठाणे जिल्ह्यात कार्यान्वित.
- योजनेंतर्गत पोस्ट ऑफिसमध्ये असलेली मजुरांची खाती बँकांमध्ये स्थलांतरित करण्यासाठी विशेष मोहीम.
- या योजनेबाबत राज्यात दीर्घकालीन सुधारणा होण्यासाठी दिनांक २ ते ३१ ऑक्टोबर २०१२ या कालावधीत महात्मा गांधी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार जागृती अभियान.

रोजगार हमी योजना आणि जलसंधारण मंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली रोजगार हमी योजना आणि जलसंधारण विभागाच्या कार्यात व्यापक परिवर्तन झाले आहे.

केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या महत्त्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये करण्यात येत आहे. या योजनेच्या कार्यप्रणालीचे सुलभीकरण करून अंमलबजावणीस गती देण्यात येत आहे. पारदर्शकता हे या योजनेचे प्रमुख वैशिष्ट्य असून मजुरांना १५ दिवसांत बँक अथवा पोस्टामार्फत मजुरी प्रदान करण्यात येते.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना – महाराष्ट्र अंतर्गत सन २००९-१० मध्ये ३२१ कोटी रु. तर सन २०१०-११ मध्ये ३५१ कोटी रुपये खर्च झाले. त्यानंतरच्या काळात घेतलेले विविध निर्णय आणि उपाययोजनांमुळे सन २०११-१२ या आर्थिक वर्षात या योजनेंतर्गत सुमारे १५०० कोटी रुपये खर्च झाले. सन २०१२-१३ या चालू आर्थिक वर्षात ऑगस्ट २०१२ अखेर ११९४ कोटी ४६ लाख रुपये इतका खर्च झाला.

मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी राज्याची धुरा आपल्या हाती घेतल्यानंतर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेत अधिकाधिक कामे व जास्तीत जास्त निधी आपल्या राज्यात आला पाहिजे, अशी सकारात्मक भूमिका घेतली.

### नवे उपक्रम

- स्व. वि. स. पागे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या जन्मशताब्दीपूर्ती निमित्त सन २०१२ मध्ये या योजनेंतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा, ग्रामपंचायत, कार्यान्वयीन यंत्रणा व अधिकारी यांना राज्यस्तरावर पुरस्कार देण्यात येणार आणि राष्ट्रीय परिषदेचे आयोजन.

### विशेष उपाययोजना

- तत्कालिक व भविष्यकालीन उपाययोजना म्हणून या योजनेंतर्गत नियोजन करण्यात येत आहे. विशेषत: सामाजिक वनीकरणाची कामे या योजनेंतर्गत घेऊन जास्तीत जास्त वृक्षलागवड करून जमिनीत पाणी मुरवून भूगर्भातील जलपातळीत वाढ होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.
- या योजनेंतर्गत ऑगस्ट अखेरीस चालू कामे ९१,९३५ असून त्यावर मजूर उपस्थिती ५,४९,७६४ आहे. शेल्फवरील कामे ९,२८,९४८ इतकी आहेत.
- दुष्काळग्रस्त राज्यातील शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत १५० दिवस काम मिळणार आहे.
- या योजनेला राज्यात चालना देण्याच्या उद्देशाने आणि योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागपूर येथे स्वतंत्र आयुक्तालय सुरू करण्यात आले आहे.

### जलसंधारण

पाणीटंचाई तसेच दुष्काळी परिस्थितीवर मात करण्याच्या दृष्टीने जलसंधारण कार्यक्रमाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. लघु पाटबंधारे, मृदसंधारण व सामाजिक वनीकरण या तीन उपक्रमांद्वारे जलसंधारणाचे काम केले जाते.

### लघु पाटबंधारे प्रकल्प

सध्या ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेचे ६४,३९१ लघु पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यात आले आहेत. या प्रकल्पांच्या माध्यमातून १५.५५ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

जर्मन बँक, राज्य शासन व लाभार्थींकडून सिंचन व कृषी विकास प्रकल्पाच्या माध्यमातून २८ लघु पाटबंधारे योजनांची कामे हाती घेण्यात आली. यापैकी गेल्या वर्षभरात १३

योजनांची कामे पूर्ण करण्यात आली. या योजना पाणी वापर संस्थांना चालविण्यासाठी देण्यात आल्या आहेत. या नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून १५०० हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमतेची निर्मिती करण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या जलसंधारण विभागाकडून दुरुस्ती, नूतनीकरण व पुनर्स्थापना अंतर्गत एकूण १,५४६ लघू पाटबंधारे योजनांच्या दुरुस्तीचे २४३.९८ कोटी रुपयांचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर केले आहेत.

राजीव गांधी सिंचन व कृषी विकास कार्यक्रम २०११ मध्ये सुरू करण्यात आला असून या कार्यक्रमांतर्गत ४२३८ हेक्टर क्षमतेची पुनर्स्थापना करण्याचे उद्दिष्ट आहे. सध्या या कार्यक्रमात २५ लघु पाटबंधारे प्रकल्पांची निवड करण्यात आली आहे.

**सामाजिक वनीकरण**

- वृक्षलागवड कार्यक्रमात ग्रामीण जनतेचा सहभाग वाढविण्यात आला आहे. सन २०१२ मध्ये शासनाने १०० कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट ठेवले असून सामाजिक वनीकरण विभागाला २ कोटी वृक्षलागवडीचे व ४.१३ कोटी रोप निर्मितीचे उद्दिष्ट दिले आहे. १३.०५ लाख वृक्षलागवड करण्यात आली आहे.

**मृदसंधारण**

- टंचाई परिस्थितीवर मात करण्याच्या उद्देशाने राज्यातील कमी पाऊस असलेल्या ७८ तालुक्यांत सिमेंट नाला बांध बांधण्याचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्याकरिता १७५ कोटी रु. उपलब्ध करून देण्यात आले. त्यामधून २,८७७ सिमेंट नाला बांध बांधण्यात येणार असून आतापर्यंत ५५६ सिमेंट नाला बांध बांधण्यात आले.
- गेल्या एका वर्षामध्ये राज्यातील पाणलोट विकासासाठी पात्र असलेल्या क्षेत्रापैकी २,५३,३३३ हेक्टर क्षेत्रावर ३०९ कोटी रुपये खर्च करून मृद व जलसंधारणाची कामे करण्यात आली. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी उंचावून शेतीचे उत्पादन वाढण्यास मदत झाली.



**ठळक नोंदी**

- राज्यातील जत, कवठे महांकाळ, आटपाडी, खानापूर, कडेगाव, मिरज, तासगाव, खटाव, माण, मंगळवेढा, सांगोला, पुरंदर, संगमनेर, पारनेर व भूम या दुष्काळग्रस्त १५ तालुक्यांत सिमेंट नाला बांध बांधण्याकरिता १३५ कोटी रु. एवढा निधी वितरित.
- जलसंधारणाअंतर्गत लघु पाटबंधारे विभागाच्या कामात सुधारणा करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्सची स्थापना.
- वृक्ष लावणे आणि त्यांचे संवर्धन करणे या क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांचा गुणगौरव वनश्री पुरस्काराने करण्यात येतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वृक्षराजीबाबत दूरदृष्टीने घेतलेल्या धोरणाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या उद्देशाने या पुरस्काराचे नामाभिधान 'छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार' या नावाने करण्याचा निर्णय गेल्या वर्षी घेण्यात आला.

**(शब्दांकन : डॉ. दिलीप साधले)**



सातारा जिल्ह्यातील जलसंधारण

## मेगा पाणलोट विकास कार्यक्रम

- ग्रामीण पायाभूत विकास निधी नाबार्ड या कार्यक्रमाअंतर्गत सन २००९-१० मध्ये ६८ मेगा पाणलोट (२६० प्रकल्प) निवडण्यात आले. त्यापैकी १४० प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार असून ११७.८३ कोटी रु. किमतीच्या २५ प्रकल्पांकरिता नाबार्डने मंजुरी दिली आहे.
- एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाखाली मृदसंधारण आणि जलसंधारणाला बळकटी आणण्यात येत आहे. हा कार्यक्रम सन २००९-१० पासून सुरू झाला असून एकूण तीन बॅचमध्ये ८२८ प्रकल्प मंजूर आहेत. या अंतर्गत एकूण ३५.४१ लाख हेक्टर क्षेत्रावर हे काम करण्यात येईल. त्याची प्रकल्प किंमत ४४.७३ कोटी इतकी आहे. ८२८ मंजूर प्रकल्पांपैकी सध्या ३९९ प्रकल्पांत कामे सुरू आहेत.



यवतमाळ जिल्ह्यातील जलसंधारण

- महात्मा फुले जल भूमी संधारण अभियान हा कार्यक्रम १ मे २०१२ पासून सुरू करण्यात आला असून तो प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. सन २०१२-१३ मध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजनेमधून ४५ कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे.
- विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमाकरिता विदर्भातील ११ जिल्ह्यांसाठी केंद्र शासनाने ३२५० कोटी रुपये एवढ्या निधीला मान्यता दिली आहे. सन २०१२-१३ साठी ३०० कोटी रु.चा कार्यक्रम मंजूर करण्यात आला आहे.

# पायाभूत सुविधांचे बळकटीकरण







**मधुकरराव चव्हाण**
पशुसंवर्धन, दुग्धविकास
व मत्स्यव्यवसाय मंत्री


**येणाऱ्या काळात अन्न सुरक्षेच्या दृष्टीने अन्नाची वाढती गरज, केवळ शेती उत्पादनावर भागणे शक्य नसल्याने पशुपालन, मत्स्य उत्पादन आणि कुक्कुटपालन यांना अधिकाधिक प्रोत्साहन देणे आवश्यक ठरते. ही बाब लक्षात घेऊन पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्सव्यवसाय विकास (पदुम) विभागाच्या पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणाकडे प्राधान्याने लक्ष पुरविण्यात येत आहे. दुष्काळातही जनावरांच्या आरोग्याची काळजी सक्षमपणे विभागामार्फत घेतली जाते. रिक्त पदे भरली जात आहेत. बंदरे व जेट्टीच्या बांधणीला निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मासळी बाजारांची निर्मिती केली जात आहे. वेगवर्धक दुग्धविकास कार्यक्रम राबविण्यात येत**

शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी पशुसंवर्धन दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय हे विभाग महत्त्वाची भूमिका बजावतात. ही बाब लक्षात घेऊन या विभागाला अधिक सक्षम करण्यावर या विभागाचे मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी लक्ष केंद्रित केले आहे. या विभागात चारशे-साडेचारशे पदे रिक्त होती. राज्यात पशुवैद्यकीय दवाखान्यांचे जाळे चांगले असले तरी अनेक दवाखाने मोडकळीस आले होते. अनेक बंदरे आणि जेट्टी यांचीही स्थिती चांगली नव्हती. त्यामुळेच या सर्व पायाभूत सुविधा मजबूत करण्याला त्यांनी सर्वोच्च प्राधान्य दिले.

राज्यात ४८५७ पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. त्यातील अनेक स्वांतत्र्यपूर्वकाळातील असल्याने दवाखान्यांच्या इमारती मोडकळीस आल्या आहेत. या दवाखान्यांच्या नवीन बांधकामाकरिता जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून ३४८ दवाखान्यांची बांधकामे सुरू केली आहेत. आतापर्यंत ९८ पशुवैद्यकीय दवाखान्यांची बांधकामे पूर्ण झाली असून तालुका स्तरावरील लघु पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयांच्या १७ नवीन इमारत बांधकामांसाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त केला आहे. काही इमारतींची दुरुस्ती करण्याकरिता राज्याच्या योजनेतून निधी उपलब्ध केला आहे व टप्प्याटप्प्याने नवीन पशुवैद्यकीय इमारतींचे बांधकाम व दुरुस्ती सुरू आहे. पशुधनाचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी दवाखान्यांच्या इमारतींच्या बांधकामावर प्राधान्याने लक्ष देण्यात येत आहे.

### कृत्रिम रेतन कार्यक्रमाचे यश

पशुधनाची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी शासकीय, स्वयंसेवी संस्था, सहकारी दूध संघ, सुशिक्षित बेरोजगार व खाजगी संस्थांच्या साहाय्याने कृत्रिम रेतनाचा कार्यक्रम गेल्या तीन वर्षांपासून राबविण्यात येत आहे. त्यामुळे ३३ लक्ष जनावरांवर कृत्रिम रेतन करण्यात यश येऊन ९.३० लाख वासरे जन्मास आली. सन २०११-१२ कामधेनू योजना सुरू करण्यात आली. या योजनेंतर्गत प्रत्येक दवाखान्याद्वारे एक गाव दत्तक घेऊन तेथील जनावरांचे १०० टक्के लसीकरण, जंत निर्मूलन करण्यात येते. त्यानंतर वांझपणा निवारण करून जनावरे पुन्हा माजावर आणण्यासाठी पशुतज्ज्ञाद्वारे सेवा पुरविल्या जातात.

### दूध संस्थांचे बळकटीकरण

राज्यातील प्राथमिक सहकारी दूध संस्थांचे बळकटीकरण करण्यात येत आहे. या अनुषंगाने एकात्मिक दुग्ध उपवन प्रकल्प विदर्भ, मराठवाडा व कोकण विभागात राबविण्यात येत आहे. या निर्णयामुळे प्रत्येक जिल्ह्यात दोन आणि प्रत्येक प्रकल्पात १०० जनावरे असे ४६ प्रकल्प उभारण्यात आले. त्यामुळे या दूध संस्थांच्या दूध संकलनात वाढ झाली.

### निर्यातीवरील बंदी उठली

या वर्षी दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा देण्यात आला. केंद्र सरकारने दूध-भुकटी निर्यातीवर बंदी घातली होती. त्यामुळे भुकटी उत्पादन करणाऱ्या प्रकल्पांनी शेतकऱ्यांचे दूध घेणे बंद करण्याची स्थिती निर्माण झाली होती. या द्रवरूप दुधाची भुकटी केली जावी व दूधभुकटी प्रकल्पांनी शेतकऱ्यांचे दूध घ्यावे यासाठी दूधभुकटी प्रकल्पधारकांना शासनाने प्रति लिटर दुधास २ रुपयांचे अनुदान दिले. राज्य शासनाने अनुदानापोटी २८ कोटी रुपये आजपर्यंत दिले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. दूधभुकटी निर्यात बंदी उठविण्यासाठी पदुम मंत्री मधुकरराव चव्हाण आणि मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे दूधभुकटीवरील निर्यात बंदी केंद्र शासनाने उठविली. यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.

### बंदरे व जेट्टी उभारणी

कोकणातील कोळी बांधवांना चांगल्या पायाभूत सुविधा मिळाव्यात म्हणून मत्स्य व्यवसायासाठी बंदरे व जेट्टीच्या उभारणीचा मोठा कार्यक्रम राबविण्यात आला आहे. करंजा, अर्नाळा, वर्सोवा, खारटी, नाटे, हर्णे, आनंदवाडी, मिरकरवाडा टप्पा-२ अशा एकूण ८ मोठ्या बंदरांचा विकास करण्यात येईल. त्यापैकी तीन ठिकणी प्रत्यक्ष काम सुरू झाले आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनेमधून पहिल्या टप्प्यात १९ ठिकाणी जेट्टी उभारण्यासाठी ७० कोटी मंजूर झाले. जेट्टी उभारण्यासाठी २० कोटी रुपये सार्वजनिक बांधकाम विभागास देण्यात आले. नाबार्ड अंतर्गत २० ठिकाणी जेट्टी उभारल्या जातील. त्यासाठी १०२ कोटी रुपये मंजूर झाले आहेत.

### मासळींसाठी पिंजरा

मत्स्य उत्पादन वाढीसाठी पिंजरा पद्धतीने जलाशयात मत्स्य उत्पादन घेण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात वर्धा जिल्ह्यातील बोर आणि अहमदनगर जिल्ह्यातील मुळा, सातारा जिल्ह्यातील तारळी या ठिकाणच्या जलाशयात हा कार्यक्रम राबविला जात आहे. राज्यातील मासळीबाजार वाईट स्थितीत असल्याने नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात २८ ठिकाणी मासळीबाजार निर्माण करण्याचे काम राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्डामार्फत सुरू करण्यात आले आहे. नौकांचे यांत्रिकीकरण व वाहतूक, साठवण व पणन यासाठीही या वर्षी विविध उपक्रम राबविण्यात येतील. (उर्वरित पान ६२ वर)

## दुग्धविकास कार्यक्रम

**सहकारी दूधसंघाच्या साठवणूक क्षमतेत वाढ आणि ग्रामीण पातळीवर शीत साखळी निर्माण करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण, दूध वाहतुकीकरिता सामग्री, दुग्धशाळा व प्रक्रिया प्रकल्प उभारणे यासाठी वेगवर्धक दुग्धविकास कार्यक्रम राबवण्यात येत आहे. यासाठी पहिल्या टप्प्यात १७ दूध संघांसाठी ६४.४७ कोटी रुपये मंजूर केले आहेत. ८० टक्के अनुदान राज्य शासनातर्फे उपलब्ध करून देण्यात येते.**

# देशातील पहिले युवा व क्रीडा धोरण






**पद्माकर वळवी**
क्रीडा व युवक कल्याणमंत्री

**शारीरिक व मानसिकदृष्ट्या युवक सुदृढ राहावेत म्हणून सर्वांसाठी खेळ योजना, खेळाचा हक्क, आवश्यक तिथे क्रीडा मार्गदर्शकांची तरतूद, त्यांना प्रोत्साहन, युवकांना कौशल्यपूर्ण शिक्षण देण्यासाठी अभ्यासक्रमांमध्ये सुधारणा घडवून आणणे, युवा सुविधा केंद्राच्या माध्यमातून मार्गदर्शन करणे आदी बाबींचा समावेश युवा व क्रीडा धोरणात करण्यात आला आहे. व्यक्तिमत्त्व शिबिरांचे आयोजन केले जाईल. युवांसाठी सर्व सुविधा असलेली केंद्रे उभारली जातील. या सुविधा पुरवून त्यांना रोजगारासाठी मार्गदर्शन केले जाईल. कौशल्यपूर्ण युवक बनविण्याचा प्रयत्न या धोरणाच्या माध्यमातून केला जाईल.**

क्रीडा धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. महाराष्ट्र शासनाने २० एप्रिल २०१२ ला क्रीडा व युवा धोरणाला मंजुरी दिली. खेळ क्षेत्राचा विकास करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची जोड असणे आवश्यक आहे. या धोरणात पुढील बाबींचा समावेश आहे. राज्यातील क्रीडा प्रशिक्षणासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाची ओळख, क्रीडा विद्यापीठाची स्थापना, क्रीडा विषयक अभ्यासक्रमात सुसूत्रता आणण्यासाठी आवश्यक संशोधन, राज्य क्रीडा विकास निधी, साहसी खेळांना प्रोत्साहन, क्रीडा विषयक पायाभूत सुविधांचा विकास, क्रीडा वातावरण निर्मिती यांचा उल्लेख करावा लागेल.

**युवा धोरण**

यावर्षी पहिल्यांदाच राज्य सरकारने युवा धोरण स्वीकारले आहे. यामध्ये युवकांच्या प्रगतीवर भर देण्यात आला आहे. त्यासाठी प्रेरक घटकांचा अभ्यास, युवाशक्तीचा, देशाच्या तसेच राज्याच्या विकासासाठी कसा उपयोग करून घेता येईल याचा विचार यामध्ये करण्यात आला आहे. युवकांना सर्वच क्षेत्रांत समान संधी उपलब्ध करून देणे या उद्देशाने जागतिकीकरणामध्ये मराठी युवकांना केंद्रबिंदू मानून हे धोरण तयार करण्यात आले आहे.

क्रीडा खात्यांतर्गत असलेल्या राष्ट्रीय छात्र सेना, स्काऊट आणि गाईड, केंद्रीय राष्ट्रीय सेवा योजना, नेहरू युवा केंद्र आदींच्या माध्यमातून दहशतवाद विरोधी दिन, पर्यावरण दिन, जागतिक तंबाखू विरोधी दिन यासारखे कार्यक्रम वर्षभर करण्यासाठी युवांच्या साहाय्याने व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे.




क्रीडा विभागामार्फत विविध योजना राबविल्या जातात. अनुदान दिले जाते. मार्गदर्शन केले जाते. आता राज्यभर क्रीडा संकुल उभारणे, क्रीडा मार्गदर्शक नेमणे, क्रीडा प्रशिक्षण केंद्र उभारणे, खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण देणे, क्रीडा क्षेत्रासाठी राखीव असलेल्या मैदानाचा फक्त खेळासाठीच कसा उपयोग करता येईल यासाठी प्रयत्न करणे, बृहन्मुंबई क्रीडा प्राधिकरणाची स्थापना करणे या बाबींना प्राधान्य देण्यात येत आहे. ग्रामीण भागातील खेळाडूंचा स्तर उंचविण्यासाठी या भागातील खेळाडूंचा शोध घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यात येईल. राज्य क्रीडा विकास निधी, विकास परिषद मार्फत खेळाडूंना शासन नेहमीच मदत करीत आले आहे. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा देण्याचा प्रयत्न तसेच क्रीडा प्रबोधिनीची स्थापना आदी महत्त्वपूर्ण उपाययोजना त्या अनुषंगाने करण्यात येत आहेत.

**महाराष्ट्राचे क्रीडा धोरण : प्रमुख वैशिष्ट्ये**

- क्रीडा विषयक पायाभूत सुविधांची निर्मिती.
- आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय स्तराचे खेळाडू घडविणे व अत्याधुनिक प्रशिक्षणाकरिता आर्थिक साहाय्य.
- खेळाडूंना प्रोत्साहन सवलती व गौरव.
- क्रीडा वातावरण निर्मिती.
- क्रीडा महोत्सवांचे आयोजन.
- तांत्रिक मनुष्यबळ विकास.
- क्रीडा विद्यापीठाची स्थापना.
- राज्यातील क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन.
- राज्यात साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन.
- क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समितीची स्थापना.

**राज्याचे युवा धोरण – प्रमुख वैशिष्ट्ये**

- युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना.
- युवा वसतिगृहाची निर्मिती.
- युवा पुरस्कार.
- युवक कल्याण कार्यक्रम.
- युवा मित्रांची नियुक्ती.

**(शब्दांकन : विकास माळी)**

## खेळाडूंना नोकरी

**राज्य क्रीडा विकास निधीमधून खेळाडूंना आतापर्यंत २ कोटी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील पदक विजेत्या अत्युच्च गुणवत्ताधारक १२ खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यापैकी ८ खेळाडूंना शासन सेवेत नियुक्ती देण्यात आलेली असून उर्वरित ४ खेळाडूंना नोकरी देण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.**

# कुपोषण : ३५ वरून १५ टक्क्यांवर






वर्षा गायकवाड
महिला व बाल विकास मंत्री

**कुपोषण मुक्तीसाठी लोकसहभागाने राजमाता जिजाऊ कुपोषणमुक्त ग्राम अभियान राबविण्यात आले. या अभियानाद्वारे जनजागृती करण्यात आली. माता व कुटुंब सक्षमीकरणावर भर देण्यात आला. कुपोषणाची कारणे व दुष्परिणाम याबाबत प्रबोधन करण्यात आले. कुपोषण मुक्तीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग घेण्यात आला. या प्रयत्नांमुळे अभियानाच्या पाच महिन्यांच्या कालावधीत १ लाख ३९ हजार १०४ बालकांना कुपोषणातून बाहेर काढण्यात यश आले. गेल्या तीन वर्षांत ० ते ६ वयोगटातील साधारण श्रेणीतील बालकांचे प्रमाण ६५ टक्क्यांवरून ८५ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात यश आले. याचा अर्थ कुपोषणाचे प्रमाण ३५ टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत कमी झाले. लोकप्रबोधन आणि कुपोषण निर्मूलनासाठी प्रत्यक्ष उपाययोजना यामुळे आज असंख्य बालके कुपोषणाच्या विळख्यातून मुक्त झाली आहेत.**

महिला आणि बालक राज्याच्या लोकसंख्येतील महत्त्वाचे घटक आहेत. त्यामुळेच महिला आणि बालविकास विभागाचे मंत्रीपद स्वीकारल्यानंतर प्रा. वर्षा गायकवाड यांनी कुपोषणाची समस्या सोडवण्यास सर्वोच्च प्राधान्य दिले. या प्रयत्नांचा पहिला भाग म्हणजे युनिसेफच्या साहाय्याने राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशनची पुनर्स्थापना करण्यात आली.

अज्ञान, गरिबी, वैद्यकीय सेवांचा अभाव, कमी वयात मुलींची लग्ने, महिला व मुलींमध्ये रक्ताची कमतरता यामुळे एकतर मुले कमी वजनाची जन्मतात, आजारी पडतात आणि काही मुले कुपोषणामुळे मृत्युमुखी पडतात.

जन्मत: कमी वजनाची मुलं, आहार देण्याची चुकीची पद्धत, जलजन्य आजार व अन्य आजार यावर जगभर ज्या यशस्वी उपाययोजना करण्यात आल्या त्यांचा समावेश अभियानात करण्यात येत आहे. गरोदर महिला आणि किशोरवयीन मुलींचे हिमोग्लोबीन अणि बॉडीमास इंडेक्स (उंचीप्रमाणे वजन) वाढविण्यासाठी उपाय योजल्यामुळे बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी होत आहे. कुपोषण संपविण्यासाठी शासनाच्या २३ विभागांचा समन्वय साधण्यात आला. स्थानिक ठिकाणी रोजगार, रास्त शिधावाटप दुकान, प्राथमिक आरोग्य केंद्र, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध केली जात आहे. विशेषत: आदिवासी आणि दुर्गम भागातील लोकांचे स्थलांतर थांबविण्यास मदत होत आहे.

राज्यातील आदिवासीबहुल सहा जिल्ह्यांमध्ये तीन वर्षांखालील मुलांसाठी ६०० पाळणाघरे सुरू करण्याचा महिला आणि बालविकास विभागाने निर्णय घेतला. मुलांना खायला किती वेळा द्यावे, आरोग्य, स्वच्छता कशी राखावी याबाबत प्रबोधन करण्यात येत आहे. किशोरवयीन मुलींना औपचारिक व अनौपचारिक शिक्षणाबरोबर आरोग्य सुविधा देऊन त्यांच्यात जागृती करण्याचा प्रयत्न सबला योजनेंतर्गत प्रभावीपणे करण्यात येत आहे.

या प्रयत्नांमुळे कमी वजनाची मुले सर्वसामान्य मुलांच्या वजनाच्या श्रेणीमध्ये परावर्तीत होत आहेत.

### ठळक निर्णय

- इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजनेची राज्यात अंमलबजावणी करून गरोदर स्त्रिया आणि स्तनदा माता यांना गरोदर आणि स्तनपानाच्या कालावधीत मजुरीपोटी रोख रक्कम देणे.
- महिलांची कौटुंबिक छळापासून सुटका व्हावी यासाठी राज्यात कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा प्रभावीपणे राबविण्यासाठी या वर्षी ५१ समुपदेशन केंद्रांची स्थापना करण्याबरोबर आणखी ५४ समुपदेशन केंद्रे निर्मितीची प्रक्रिया सुरू.
- हिंसाचारग्रस्त महिलांसाठी संरक्षण अधिकारी, समुपदेशकांची भरती सुरू.
- कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ थांबविण्यासाठी शासकीय, निमशासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये महिला तक्रार निवारण समित्यांची स्थापना करण्यासाठी प्रभावी उपाययोजना सुरू.
- शाळेतील मुलींची गळती रोखण्यासाठी आणि स्त्रीभ्रूणहत्या, हुंडाबळी आणि बालविवाह थांबविण्यासाठी प्रबोधनाबरोबरच समाजाची मानसिकता बदलण्यावर भर.
- देवदासींच्या मुलींना शिक्षण घेता यावे म्हणून शिष्यवृत्ती.
- देवदासींच्या मुलींच्या लग्नासाठी आर्थिक साहाय्य
- देवदासींच्या पुनर्वसन करणाऱ्या संस्था व व्यक्तींच्या पुरस्कारात दुपटीने वाढ.
- शरीरविक्रय करण्याची वेळ आलेल्या महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे यासाठी प्रशिक्षण.
- निराधार व अनाथ मुलांना अनाथ प्रमाणपत्र देण्याचा निर्णय.
- राज्यात आणखी ५ अनुरक्षणगृहे सुरू करण्याचा निर्णय.
- १८ वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्या अनाथ मुलांसाठी कमवा व शिका योजना सुरू.
- अनाथ व निराधार महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्यातील सात उद्योग संस्थांशी प्रशिक्षणासाठी राज्य शासनाचा करार.
- २० अनाथ विद्यार्थ्यांची पहिली बॅच प्रशिक्षण घेऊन नोकरी करू लागली आहे.
- मुस्लीम बहुल भागातील अंगणवाड्यांमध्ये मराठीबरोबर अल्पसंख्याक मुलांसाठी उर्दू व हिंदी भाषेतून अनौपचारिक शिक्षण देण्याचा निर्णय.
- १२ हजार अंगणवाडी सेविका मदतनीस यांची भरती.

**(शब्दांकन : आकाश जगधने)**

## तिसरे महिला धोरण

**आतापर्यंत राज्य शासनाने महिलांचा विकास व सक्षमीकरणासाठी दोन महिला धोरणे जाहीर केली. तिसऱ्या महिला धोरणाचा मसुदा अंतिम टप्प्यात आहे. यासाठी महिला व बालविकास मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. महिलांच्या आत्मसन्मानाला बाधा येऊ नये, कोणत्याही भेदभावाला त्यांना सामोरे जावे लागू नये, त्यांचा सन्मानपूर्वक जगण्याचा हक्क अबाधित राहावा, यासाठी तिसऱ्या महिला धोरणात सर्वंकष विचार करण्यात येणार आहे.**



# पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकास






**संजय देवतळे**
पर्यावरण आणि
सांस्कृतिक कार्य मंत्री

**राज्याच्या पर्यावरण विभागाचे मुख्य ध्येय हे पर्यावरण संरक्षण, संवर्धन, जतन साधून शाश्वत विकास करणे हे आहे. यासाठी पर्यावरण संरक्षण कायदा, हवा कायदा, जल कायदा याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यात औद्योगिकीकरणाचा वेग वाढला आहे. या औद्योगिक विकासाचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष नैसर्गिक स्रोतांवर परिणाम होतो. हा परिणाम कमी करून शाश्वत मानव विकासासाठी नैसर्गिक स्रोतांचे संवर्धन करणे, त्याचे संरक्षण करणे आणि जतन करणे अत्यावश्यक आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रीय व राज्य सरोवर संवर्धन हरित प्रकल्प योजना, राज्यातील १२ जिल्ह्यांत पर्यावरण सेवा योजनेची अंमलबजावणी, पश्चिम घाट विकास क्षेत्र कार्यक्रमाची अंमलबजावणी, २०११ -२०१२ पासून राज्यस्तरीय नदी संवर्धन योजनेंतर्गत ११ शहरांचे प्रस्ताव विचाराधीन आदी उपाययोजना केल्या आहेत.**

जी वनमानाचा दर्जा गुणवत्तापूर्ण राखण्यासाठी नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी नैसर्गिक स्रोतांची जोपासना करायला हवी. विकास आणि पर्यावरण या दोन्ही बाबी एकमेकांशी निगडित आहेत. त्यासाठी विकास, संतुलन व संवर्धन यांचा सुवर्णमध्य साधणे आवश्यक आहे.

सध्याच्या प्रगतीच्या वाटचालीत पर्यावरणाचे अनेक प्रश्न उभे राहत आहेत. पर्यावरणाशी आपले अतूट नाते आहे. पर्यावरणाशी निर्मळ नाते ठेवणे हे प्रत्येक सर्जन नागरिकाचे कर्तव्य ठरते.

**पश्चिम घाट संवर्धन**

जैविक घटक जसे मानव, प्राणी, वनस्पती वने इत्यादी व अजैविक घटक जसे डोंगर, नद्या, समुद्र या सर्व घटकांचा समतोल राखणे महत्त्वाचे असते.

## पर्यावरण सेवा योजना

पर्यावरणाचे संवर्धन, जतन व संरक्षण करूनच समृद्ध व संपन्न गावाची निर्मिती करता येते. त्यासाठी राज्यातील विद्यार्थ्यांच्या मनात लहानपणीच पर्यावरण संवर्धनाची बीजे रुजविण्यासाठी पर्यावरणपूरक संवेदनशील भावी पिढीच्या निर्मितीसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. राष्ट्रीय हरित सेना व पर्यावरण सेवा योजना या दोन योजना राबवण्यात येत आहेत. राष्ट्रीय हरित सेना योजनेअंतर्गत शाळांमध्ये ८,८९८ इको क्लब स्थापन करण्यात आले आहेत. त्यापैकी सुमारे चार लक्ष हरित सैनिकांमार्फत विविध पर्यावरणविषयक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

त्यासाठी पश्चिम घाट संवर्धन कार्यक्रमात महाराष्ट्रातील १३ जिल्ह्यांचा समावेश आहे. तज्ज्ञ गटाच्या अहवालावर राज्य शासनाने जानेवारी २०१२ मध्ये आपला अभिप्राय केंद्र शासनास पाठविला. या अहवालाद्वारे पश्चिम घाटाचे संवर्धन शाश्वत विकास व पुनरुज्जीवन यासाठी सहभागीय व सर्व समावेशक पद्धतीला प्रोत्साहन देण्यात आले. युनेस्कोने जुलै २०१२ मध्ये पश्चिम घाटातील ३९ ठिकाणांना जागतिक दर्जा दिला आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील कासचे पठार, कोयना अभयारण्य, चांदोली अभयारण्य व राधानगरी अभयारण्य या चार ठिकाणांचा समावेश आहे.

सागरतटीय शाश्वत विकासाच्या दृष्टीने सीआरझेड अधिसूचना १९९१ च्या अंमलबजावणीत आलेल्या काही अडचणी लक्षात घेऊन त्यातील तरतुदी अधिक परिणामकारक करण्यासाठी केंद्रीय पर्यावरण व वनविभागाने सीआरझेड अधिसूचना २०११ मध्ये जाहीर केली. महाराष्ट्राच्या सागरतटीय क्षेत्राच्या दृष्टीने विचार करता सीआरझेड अधिसूचना २०११ मध्ये विशेष देखभालीची गरज असलेल्या क्षेत्रांमध्ये बृहन्मुंबईचा समावेश करण्यात आला. येथील पारंपरिक मच्छिमार, वसाहती, कोळीवाडे त्याचप्रमाणे धोकादायक मोडकळीस आलेल्या इमारती, सेस इमारती व झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पुनर्विकासाच्या दृष्टीने विशेष तरतुदीचा अंतर्भाव करण्यात आला.

**हरित प्रकल्प**

पर्यावरण, जैवविविधता, ऊर्जा, हवा व पाणी या पाच महत्त्वपूर्ण नैसर्गिक घटकांच्या संतुलन–संरक्षणाच्या आणि जागृतीच्या उद्देशाने पर्यावरण जनजागृती व प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रकल्प लोकांच्या सहभागाने राबविण्यासाठी पर्यावरण विभागामार्फत हरित प्रकल्प ही नावीन्यपूर्ण योजना ५ जून २०१० पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत आतापर्यंत राज्यभरातून ३६६ प्रकल्पांची छाननी करण्यात आली असून २५ नावीन्यपूर्ण प्रकल्पांची निवड करण्यात आली.

**पर्यावरण सेवा योजना**

ही योजना २०११-२०१२ या वर्षापासून पुणे, सोलापूर, अमरावती, यवतमाळ, नागपूर, औरंगाबाद, जालना, चंद्रपूर, नाशिक, जळगाव, रत्नागिरी व ठाणे या जिल्ह्यांमधील एकूण पन्नास इच्छुक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये, पर्यावरण शिक्षण केंद्र, पुणे या संस्थेद्वारे राबविण्यात येत आहे.

**ठळक नोंदी**

- पर्यावरणविषयक माहिती प्रणाली.
- पर्यावरणविषयक जनजागृती शिक्षण व वातावरण बदल कृती आराखडा.
- पर्यावरणपूरक गणेश महोत्सव.
- शालेय विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण सजगता निर्माण करण्यासाठी पर्यावरण सेवायोजना, राष्ट्रीय हरित सेना व पश्चिम घाट इको क्लब.

स्थानिक पातळीवर पर्यावरण संवर्धन व संरक्षणात जनतेचा सहभाग वाढविण्यासाठी जिल्हा पर्यावरण समिती व जिल्हा सागरतटीय संनियंत्रण समिती गठीत.

**(शब्दांकन : काशिबाई थोरात)**

## पाणीपुरवठा

# पहिला मान महाराष्ट्राचा



रणजीत कांबळे

राज्यमंत्री

**पाणी पुरवठा आणि स्वच्छता, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, पर्यटन आणि सार्वजनिक बांधकाम या विभागांचे राज्यमंत्री म्हणून श्री रणजीत कांबळे हे कार्यरत आहेत. या विभागाने गेल्या तीन वर्षांत विविध लोकोपयोगी निर्णयांचा धडाका लावला.**

■ पुरवठा आधारित पाणीपुरवठा योजना ऐवजी मागणी व सामूहिक तत्त्वावर आधारित पाणीपुरवठा योजना असा बदल करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य.

■ पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची १०० टक्के रासायनिक तपासणी अभियान. अशा प्रकारची मोहीम राबविणारे देशातील पहिले राज्य.

■ जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन व गट संसाधन केंद्राच्या कर्मचाऱ्यांची भरती व प्रशिक्षण प्रक्रिया पूर्ण करणारे देशातील पाहिले राज्य.

■ महाराष्ट्र सुवर्णमहोत्सवी नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा व स्वच्छता योजनेअंतर्गत एकूण ४० हजार लाभार्थींना खाजगी नळजोडणी व वैयक्तिक शौचालयांचा लाभ.

■ महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत १३२ नागरी स्थनिक संस्थांच्या रु. ७६९.०३ कोटी किमतीच्या सुधारणा कामांना मंजुरी.

■ शाळा व अंगणवाड्यांमध्ये स्वच्छतेच्या सुविधा पुरविण्यासाठी संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत ८८,१९० शालेय शौचालय व ५८,५५५ अंगणवाडी शौचालयांचे बांधकाम.

### २३ शहरांत चौपदरी रस्ते

■ खाजगीकरणाच्या माध्यमातून राज्यातील २३ प्रमुख शहरे चौपदरी रस्त्यांनी जोडण्याचे काम घेण्यात आले आहे.

■ सीमा तपासणी नाक्यांचे संगणकीकरण व आधुनिकीकरण.

■ शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना दोन प्रकल्प नियोजन स्तरावर.

**निर्मल ग्राम पुरस्कार देशात सर्वाधिक महाराष्ट्राला. ९,५२४ ग्रामपंचायती व ११ पंचायत समित्यांना गतवर्षापर्यंत केंद्र शासनाचा निर्मल ग्राम पुरस्कार जाहीर.**

■ ११ चौपदरीकरणाचे प्रकल्प पूर्ण. १२ प्रकल्प प्रगतिपथावर.

■ खाजगीकरणाच्या माध्यमातून नवी दिल्ली येथे नवीन महाराष्ट्र सदनाचे बांधकाम.

■ मुंबई येथे बांधकाम भवन.

### पर्यटन

■ अंजिठा व वेरूळ येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे डिजिटल सेंटर उभारण्याची कार्यवाही सुरू.

■ राज्यातील गड किल्ले, धार्मिक स्थळांचे जतन करण्याला प्राधान्य.

**(शब्दांकन : विष्णू काकडे)**

---

# महसूल प्रशासन लोकाभिमुख



प्रकाश सोळंके

राज्यमंत्री

**महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग या विभागाचे राज्यमंत्री म्हणून श्री. प्रकाश सोळंके कार्यरत आहेत. हे सर्व विभाग सर्वसामान्य नागरिक, शेतकरी यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित आणि महत्त्वपूर्ण आहेत. म्हणूनच त्यांना केंद्रबिंदू ठेवून त्यांचे प्रश्न व अडचणी लक्षात घेऊन तत्काळ मदत मिळावी यासाठी शासन धोरणात्मक निर्णय घेत आहे. नागरिकांच्या गरजेनुसार जुन्या योजनांमध्ये बदल आणि काही नवीन योजनांच्या माध्यमातून बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर याद्वारे नागरिकांच्या समस्या सोडवण्यात येत आहेत. पारदर्शक व्यवहार, कार्यक्षम व गतिमान प्रशासन करण्यावर शासनाचा भर आहे.**

महसूल अधिकारी प्रशासनाचा कणा आहेत. ते लोकप्रतिनिधी व जनतेमधील महत्त्वाचा दुवा आहेत. म्हणून महसूल प्रशासन लोकाभिमुख व गतिमान करण्यात येत आहे. शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी उपलब्ध साधनसामग्री व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे.

### महत्त्वाचे निर्णय

❍ भूसंपादनाची प्रलंबित प्रकरणे तातडीने तडजोडीने निकाली काढण्यासाठी व मूल्यांकनाबाबतची कार्यकक्षा ठरविण्यासाठी उच्चाधिकार समितीची स्थापना, जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांच्या वित्तीय अधिकारात वाढ.



❍ औद्योगिक क्षेत्राचा विकास, निर्यातीस चालना, रोजगार निर्मिती यासाठी विशेष आर्थिक क्षेत्रांचे विकासक व त्यातील घटकांना बिगर शेती करातून सूट देणे.

❍ सुवर्ण जयंती राजस्व अभियान विविध उपक्रम राबविणे.

### सहकार

जागतिकीकरणाच्या आणि खुल्या अर्थव्यवस्थेच्या वातावरणात सहकारी क्षेत्रासमोर अनेक आव्हाने आहेत. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सहकार चळवळीचा शिरकाव झाला आहे. वाढत्या जागतिक स्पर्धेत आणि उदारीकरण व खासगीकरणाच्या काळात सर्वसामान्यांना विकासात सहभागी करून घेणारी सहकार चळवळ टिकून तिचा विस्तार झाला पाहिजे. त्यामुळे ही चळवळ निकोप व पारदर्शक राहण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

काळाची गरज ओळखून व्हिजन २०१५ सहकार विभागाने तयार केले आहे. त्या अंतर्गत खालील बाबींचा समावेश आहे.

❍ सहकार कायद्यात दुरुस्ती.

❍ निवडणुकीसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारणे.

❍ पीक कर्ज वाटपात वाढ.

❍ मूल्यवर्धीत कृषी उत्पादनासाठी कृषी निर्यात झोनची स्थापना.

❍ दलालमुक्त पणन व्यवस्था निर्माण करणे.

**(शब्दांकन : मुक्ता पवार)**

# पायाभूत सुविधांना प्राधान्य

**शहरीकरणाच्या वाढत्या वेगामुळे महानगरातील नागरिकांना पायाभूत सुविधा पुरविणे हे आव्हान आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना हे आव्हान पेलण्यासाठी शासनातर्फे आवश्यक ते साहाय्य देण्याचे कार्य नगरविकास विभागाचे राज्यमंत्री भास्कर जाधव मुख्यमंत्र्यांसोबत करीत आहेत. या विभागांबरोबरच वने, बंदरे, खार जमीन, संसदीय कार्य, क्रीडा व युवक कल्याण, माजी सैनिक कल्याण, विधी व न्याय आणि मत्स्य-व्यवसाय विभागाची धुरा ते सांभाळत आहेत.**



**भास्कर जाधव**

राज्यमंत्री

### नगर विकास

- भांडवली मूल्यावर आधारित मालमत्ता कर आकारणीसाठी महानगरपालिका व नगर परिषद अधिनियमात सुधारणा.
- महिला आरक्षणात ५० टक्क्यांपर्यंत वाढ.
- महानगरपालिका / नगर परिषद मालमत्ता कर मंडळाची स्थापना.
- महानगरपालिकांच्या कामकाजात गतिमानता आणण्यासाठी विविध सुधारणा.
- सर्व महानगरपालिकांत अतिरिक्त आयुक्त पद निर्माण करण्यासंबंधी कायद्यात सुधारणा.
- नागपूर सुधार प्रन्यासच्या अधिनियमात सुधारणा.
- राज्यातील ७ नगरपालिकांच्या यात्राकर अनुदानात वाढ.
- नगर रचना योजना तयार करण्याबाबत प्रादेशिक व नगर रचना अधिनियमात बदल.
- लातूर व चंद्रपूर येथे महापालिका स्थापन.
- १९९५ नंतर वास्तव्य करणाऱ्या झोपडीधारकांना विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतिम बदलाच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात पात्र घोषित.

### विधी व न्याय

- मुंबई दिवाणी न्यायालयाच्या आर्थिक अपील अधिकारितेत वाढ करण्याचा निर्णय. या निर्णयामुळे १ कोटीपर्यंतचे दावे शहर दिवाणी न्यायालयाकडे वर्ग होऊन हायकोर्टावरील कामाचा ताण कमी होईल.
- न्यायप्रक्रिया सर्वसामान्य जनतेच्या आवाक्यात असावी व न्याय हा सर्वसामान्य जनतेच्या दारापर्यंत पोहोचावा या उद्देशाने मुंबई दिवाणी न्यायालये अधिनियम १८६९ मध्ये सुधारणा.
- शासकीय मंडळे, शासकीय कंपन्या व शासनाच्या अधिपत्याखाली असणाऱ्या संस्था यांना साहाय्य / अनुदान उपलब्ध करून देण्याचे अधिकार श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी या न्यासास प्रदान करण्याचा आणि त्यानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ च्या कलम २१ मध्ये दुरुस्ती.
- सोलापूर जिल्ह्याच्या महानगरपालिका हद्दीतील क्षेत्रासाठी कौटुंबिक न्यायालय. या न्यायालयासाठी न्यायाधीश या पदासह आवश्यक १६ पदे निर्माण करण्यास मान्यता.

### वने

- १ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट.
- वनरक्षक पदाच्या भरतीतील अटीत शिथिलता.
- संयुक्त वन व्यवस्थापन समितीत स्थानिक लोकांचा सहभाग.
- उत्कृष्ट वन व्यवस्थापन समितीस संत तुकाराम पुरस्कार.
- व्याघ्र प्रकल्पात बफर झोन जाहीर.
- वाघांच्या शिकारी रोखण्यासाठी वन रक्षकांना आवश्यक साधनसामग्री.

### मत्स्यव्यवसाय

- कोकण विभागात मत्स्यव्यवसायावर अवलंबून असणाऱ्या कोळी बांधवांना चांगल्या सुविधा मिळाव्यात म्हणून मत्स्यव्यवसायासाठी बंदरे व जेट्टीच्या उभारणीचा कार्यक्रम घेण्यात आला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत करंजा, अर्नाळा, वर्सोवा, खारटी, नाटे, हर्णे, आनंदवाडी, मिरकर वाडा टप्पा–२ अशा एकूण ८ बंदरांचा विकास करण्यात येणार असून, तीन ठिकाणी प्रत्यक्ष काम सुरू झाले आहे.
- मत्स्य उत्पादन वाढीसाठी पिंजरा पद्धतीने जलाशयात मत्स्य उत्पादन घेण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात वर्धा जिल्ह्यातील मुळा आणि सातारा जिल्ह्यातील तारळी या ठिकाणच्या जलाशयात हा कार्यक्रम राबविला जात आहे.
- राज्यात नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रात २८ ठिकाणी मासळी बाजार निर्माण करण्याचे काम राष्ट्रीय मत्स्य विकास बोर्डामार्फत सुरू करण्यात आले आहे. नौकांचे यांत्रिकीकरण व वाहतूक, साठवण व पणन यासाठी या वर्षी कार्यक्रम घेण्यात आले.

**(शब्दांकन : डॉ. दिलीप साधले)**

---

### कामगारांच्या कल्याणासाठी

(पान ४८ वरून)

भूमिहीन कुटुंबांना विम्याद्वारे संरक्षण तसेच कुटुंबातील नववी ते बारावी इयत्तेत शिकणाऱ्या दोन मुलांना प्रति विद्यार्थी प्रति महिना १०० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. या योजनेसाठी आवश्यक असलेला २०० रुपये विम्याचा हप्ता राज्य व केंद्र शासनामार्फत भरला जातो. लाभार्थ्यास कोणत्याही प्रकारचा विमा हप्ता भरण्याची गरज पडत नाही.

या योजनेंतर्गत अधिकाधिक लाभार्थ्यांना लाभ देता येणे शक्य व्हावे यासाठी भूमिहीन कुटुंबाची व्याख्या स्पष्ट करण्यात आली असून त्यानुसार २.५ एकर बागायती किंवा ५ एकर जिरायती जमीन धारण करीत असलेल्या व्यक्तीही आता या योजनेसाठी पात्र आहेत. २०१२-१३ या आर्थिक वर्षात या योजनेसाठी १३.५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेसाठी केंद्राने राज्याला ३२.५० लाख लाभार्थ्यांचे उद्दिष्ट दिले होते. यापैकी सुमारे २७ लाख लाभार्थ्यांची गावनिहाय ऑनलाईन नोंदणी करण्यात आली आहे. भारतीय आयुर्विमा महामंडळामार्फत या योजनेची अंमलबजावणी केली जाते.

### कामगारांच्या हिताचे निर्णय

- **सुरक्षा रक्षकांच्या वेतनामध्ये वाढ.**
- **औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, बाष्पके संचालनालय यांचे बळकटीकरण.**
- **महाराष्ट्र सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व त्याअंतर्गत निर्माण करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदी राज्यातील सर्व जिल्ह्यांना फेब्रुवारी २०१२ पासून लागू.**
- **राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना राज्यातील २७ जिल्ह्यांमध्ये कार्यरत, त्यात १८ लाख कुटुंबांचा समावेश.**
- **विशेष साहाय्य योजनांचा लाभ अपगांना त्वरित मिळण्यासाठी त्यांना अपंगत्व प्रमाणपत्र उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर अपंग मेळाव्याचे आयोजन.**
- **आधार कार्डावर आधारित अनुदान वितरण प्रकल्पाचा औरंगाबाद महापालिका क्षेत्रात प्रारंभ.**

**(शब्दांकन : ईर्शाद ल. बागवान)**

# घर घेणाऱ्या ग्राहकांना दिलासा




**पावसाळी अधिवेशनात महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) विधेयक २०१२ मंजूर करण्यात आले. हा कायदा राष्ट्रपतींच्या संमतीनंतर अंमलात येईल. असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य होय. या कायद्यामध्ये ग्राहकांच्या हिताच्या तरतूदीसोबत बिल्डरांच्या मनमानीलाही चाप बसवणाऱ्या तरतूदी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या विधेयकातील तरतुदीनुसार गृहनिर्माण आयोग तसेच गृहनिर्माण लवादाची स्थापना केली जाईल.**



सचिन अहिर

राज्यमंत्री

## कायदा मोडणाऱ्यांना १० लाखांचा दंड

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियमांच्या वेगवेगळ्या कलमांच्या उल्लंघनाबाबत शिक्षेच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्राधिकरण शिक्षेचे आदेश देऊ शकेल. कोणत्याही व्यक्तीने गृहनिर्माण नियामक प्राधिकरण किंवा गृहनिर्माण अपील न्यायाधिकरणाच्या आदेशाचे अनुपालन हेतुपुरस्सर केले नाही, तर प्राधिकरण अथवा न्यायाधिकरण अशा व्यक्तीला १० लाख रुपये दंड किंवा तीन वर्षे कारावास अथवा दोन्ही या प्रमाणे शिक्षा करू शकेल.**



पावसाळी अधिवेशनात महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) विधेयक २०१२ मंजूर करण्यात आले.

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ हा कायदा व त्यामध्ये यापूर्वी झालेल्या अनेक सुधारणांचा विचार या अधिनियमासाठी करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या रिअल इस्टेट बिलाच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या सर्व बाबींचा समावेश व्हावा असाही प्रयत्न करण्यात आला आहे. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून सर्वसमावेशक व प्रभावी कायदा असावा यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) अधिनियम २०१२ तयार करण्यात आले आहे.

### विधेयकातील तरतुदी

या सुधारित अधिनियमामुळे सदनिका खरेदी विक्रीमध्ये झालेल्या करारांच्या अटी व शर्तींचे अनुपालन व्हावे व सर्व व्यवहारांवर पारदर्शकपणे शिस्त आणण्यासाठी गृहनिर्माण नियामक प्राधिकरण व अपिलीय न्यायाधिकरणाची स्थापना करण्यात येईल.

नव्या शिखर संस्था, अनिवार्य मोकळ्या जागा, सामायिक क्षेत्रे व सुविधा, जाहिरात, चटई क्षेत्र, अभिन्यास, प्रवर्तक (विकासक व बांधकाम व्यावसायिक) आणि वाहनतळ यासारख्या व्याख्या सामाविष्ट करण्यात आल्या आहेत.

प्रवर्तकाने कोणत्याही नवीन प्रकल्पातील सदनिकेची विक्री किंवा जाहिरात करण्यापूर्वी त्याची गृहनिर्माण प्राधिकरणाकडे नोंदणी करणे व अशी नोंदणी करताना स्थानिक प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर केलेल्या आराखड्याचा पुरावा नोंदणीपूर्वी देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

सुरू असलेल्या परंतु भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न झालेल्या प्रकल्पांची नोंदणी करणे बंधनकारक राहील.

प्रवर्तकाने स्वत:सह सर्व संबंधितांची आणि पुरविण्यात येणाऱ्या जमिनीच्या मालकीसंबंधात संपूर्ण माहिती देणे बंधनकारक राहील.

नियामक प्राधिकरणाच्या वेबसाईटवर नोंदणी केल्याशिवाय विकासकाला सदनिका विक्री संबंधात कोणतीही आगाऊ रक्कम (Advance) स्वीकारता येणार नाही.

प्रकल्पातील सदनिकेचा ताबा दिल्यापासून पुढील पाच वर्षांपर्यंत आढळून येणारे दोष दूर करणे व त्यांचा खर्च भागविणे विकासकावर बंधनकारक राहील.

करार करतेवेळी आराखड्यात दर्शविलेले मैदान, उद्यान किंवा बाग यांचे ठिकाण खरेदीदाराच्या लेखी संमतीशिवाय बदलता येणार नाही.

कायद्यातील नवीन तरतुदीनुसार विकासकाला भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यापूर्वी इमारतीमधील सर्व सदनिका विकण्याचा अधिकार असणार नाही.

नवीन प्रकल्पातील प्रत्येक इमारतीच्या एकूण क्षेत्राच्या १० टक्क्यांहून अधिक सदनिकांची विक्री विकासकाला करता येणार नाही.

विकासकांकडून विक्री संदर्भात कोणताही व्यवहार सुरू करण्यापूर्वी अशा सदनिकांचा तपशील गृहनिर्माण नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.

जुन्या कायद्यातील मानीव अभिहस्तांतरणाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीमध्ये अडचणी येत होत्या. त्या अडचणी दूर करण्यात आल्या असून लेआऊटमधील इमारतींचे मानीव अभिहस्तांतरण करण्याच्या तरतूदीदेखील नव्याने अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.

काही कारणास्तव एखादा गृहनिर्माण प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही, तर विक्री झालेल्या सदनिकांपैकी ६० टक्के खरेदीदारांची मान्यता असल्यास त्यांची संस्था स्थापन करण्यात येईल. या संस्थेमार्फत प्रकल्पाच्या पूर्णत्वाची कार्यवाही केली जाईल.

**(शब्दांकन : शांताराम शेरवाडे)**

**गृहनिर्माण, गलिच्छ वस्ती सुधारणा, घर दुरूस्ती व पुनर्बांधणी, नागरी जमीन कमाल धारणा, उद्योग, खनिकर्म, सामाजिक न्याय, व्यसनमुक्ती कार्य, पर्यावरण आणि विमुक्त/भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण या विभागाचे राज्यमंत्री म्हणून श्री सचिन अहिर कार्यरत आहेत. या विभागाने गेल्या तीन वर्षांत विविध लोकोपयोगी निर्णय घेतले आहेत.**

# कुपोषणमुक्तीला प्राधान्य



**राज्यमंत्री श्रीमती फौजिया खान यांच्याकडे सामान्य प्रशासन विभाग, माहिती व जनसंपर्क, सांस्कृतिक कार्य, राजशिष्टाचार, शालेय शिक्षण, महिला आणि बालविकास, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण आणि अल्पसंख्याक विकास (औकाफसह) या विभागांचा कार्यभार आहे. या विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ सर्वसामान्यांना तातडीने व पारदर्शकपणे पोहोचावा, यासाठी त्या आग्रही असतात. या विभागांना अधिक कार्यक्षम बनविण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.**

## महिला आणि बाल विकास

- एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत (आयसीडीसी) महाराष्ट्रातील कुपोषण समस्येवर विशेष प्रयत्न व उपाययोजना
- कुपोषण मुक्त गाव योजना
- कुपोषणाची ओळख आणि प्रतिबंध करण्यासाठी ग्राम बाल विकास केंद्राची रचना
- नवीन महिला धोरणासाठी पुढाकार
- राज्यातील प्रत्येक विभागात वर्किंग वुमेन हॉस्टेल उभारण्याचे प्रस्तावित
- नवीन बाल धोरणाच्या विकासाचे काम प्रस्तावित
- बालगृहासाठी माहिती व्यवस्थापन यंत्रणा
- दवाखान्यातील प्रसुतीसाठी प्रसार, प्रचार स्थानिकांचा सहभाग वाढविण्यावर भर
- गाव, तालुका, जिल्हा, विभागीय आणि राज्य स्तरावर पुनर्तपासणी समितीची स्थापना
- उर्दू अंगणवाडी सेविकांची नेमणूक
- अंगणवाडी बांधणीसाठी विशेष मोहीम
- बालहक्क आयोगाचे बळकटीकरण

## आरोग्य विभाग

- सामान्यांना साहाय्यभूत ठरणारी राजीव गांधी जीवनदायी योजना आठ जिल्ह्यांत सुरू
- औषध आणि अन्य साहित्याची खरेदी ई-टेंडरिंगच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न
- आरोग्य विभागात प्रशासकीय सुधारणा
- स्पेशालिस्ट डॉक्टरांसाठी डिप्लोमाधारक आणि पदवीधारक या पद्धतीने संवर्ग तयार केले
- रिक्त पदे भरण्यासाठी अडीच वर्षांत दोन वेळा भरती मोहीम घेतली
- बदलीसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया
- स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी

## शिक्षण विभाग

- प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व अध्यापक विद्यालय यामध्ये अवाजवी शुल्क आकारले जाऊ नये, शिक्षणाचे व्यापारीकरण रोखले जावे, विद्यार्थी व पालकांच्या हिताचे रक्षण व्हावे या भूमिकेतून महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) विधेयक, २०११ विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत मंजूर
- बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार
- मराठी शाळांच्या परवानगीसाठी बृहत् आराखडा
- शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ
- शिक्षण सेवकाच्या पदनामात बदल
- ५ हजार शाळांच्या मूल्यांकनास मान्यता
- राज्याच्या सीमा भागात मराठी शाळांना परवानगी




**लिंगनिदानाबाबत तक्रारी वेबसाईट**
www.amchimulgi.gov.in

**हेल्पलाइन टोल फ्री क्रमांक**
१८००२३३४४७५

## सामान्य प्रशासन विभाग

- शासनाचे सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकरिता नवीन प्रशिक्षण धोरण
- कार्यालयीन कामकाजामध्ये कामांची द्विरुक्ती टाळून वेळेत काम करण्याची व्यवस्था निर्माण करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना पुरस्कृत करणाऱ्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान पुरस्कारांच्या निवड प्रक्रियेत सुधारणा
- शासनाचे काम गतीने आणि पारदर्शक होण्यासाठी ई गव्हर्नन्स धोरण
- मिहान प्रकल्प पुनर्वसन पॅकेजसाठी तरतूद
- राज्यासाठी जन माहिती धोरण विकसित करण्याचे काम प्रस्तावित

## माहिती व जनसंपर्क

- माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाचे सशक्तीकरण
- जिल्हा माहिती कार्यालयांचे आधुनिकीकरण
- लोकराज्य मासिकाच्या मराठी, उर्दू, भाषेतील आवृत्त्यांमध्ये आणि महाराष्ट्र अहेड या इंग्रजी मासिकांमध्ये गुणात्मक बदल, विषयनिहाय विशेषांकांची निर्मिती
- जुन्या छायाचित्रांचे डिजिटायझेशन आतापर्यंत ५ लाख फोटोंचे डिजिटायझेशन पूर्ण
- विविध खात्यांचे सचिव, मंत्री यांना महत्त्वाच्या दैनंदिन वृत्तपत्रीय बातम्यांची कात्रणे ऑनलाईन पाठविण्यासाठी डॅशबोर्ड सुविधेचा वापर
- 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमाचे आतापर्यंत ४८४ भाग प्रक्षेपित
- 'दिलखुलास' या आकाशवाणीवरून प्रसारित होणाऱ्याचे कार्यक्रमाचे १४९० भाग प्रसारित
- महान्यूज या वेब पोर्टलला नवे रूप
- दूरचित्रवाणीवरील 'जय महाराष्ट्र' या कार्यक्रमाचे आणखी सशक्त सादरीकरण
- ताडदेव मुंबई येथील स्टुडिओचे आधुनिकीकरण
- जाहिरात धोरणाचा आढावा. यामध्ये प्रामुख्याने वृत्तपत्रांचा दर्जा, रोटेशननुसार जाहिरातींचे वितरण, यादीबाह्य भाषिक अल्पसंख्याक वृत्तपत्रांची वर्गवारी

## सांस्कृतिक कार्य

- चित्रनगरी मुंबईच्या व्यावसायिक विकासासाठी एकत्रित बृहत आराखडा
- नवीन सांस्कृतिक धोरण

**(शब्दांकन : वंदना थोरात )**

# परिवर्तनाच्या दिशेने परिवहन



गुलाबराव देवकर

राज्यमंत्री

राज्यमंत्री श्री. गुलाबराव देवकर यांच्याकडे कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास, जलसंधारण, रोजगार हमी योजना, रोजगार व स्वयंरोजगार आणि परिवहन या विभागांची जबाबदारी आहे.

वाढती लोकसंख्या, वाहनांमुळे होणारे प्रदूषण, अपघातांमध्ये झालेली वाढ या बाबी विचारात घेऊन सार्वजनिक परिवहन व्यवस्था अधिकाधिक बळकट, सुकर आणि लोकाभिमुख करण्यासाठी श्री. देवकर यांनी मा. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या तीन वर्षांत महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. व इतरही विभागांच्या निर्णयप्रक्रियेत महत्त्वाचा सहभाग दिला आहे.




● शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतुकीसाठी स्कूल बस धोरण ● ज्या गावात पुरेशा प्रमाणात एस.टी. सुविधा उपलब्ध नाहीत अशा गावांसाठी मिडी बस सेवा ● एस.टी. बस स्थानकाचे आधुनिकीकरण ● ऑटोरिक्षांना इलेक्ट्रॉनिक डिजिटल भाडे मीटर बसविणे बंधनकारक ● जुन्या वाहनांना ग्रिन टॅक्स ● प्रीपेड टॅक्सी सेवा ● प्रवाशांच्या मदतीसाठी आणि तक्रारींसाठी टोल फ्री दूरध्वनी सेवा ● शिकाऊ अनुज्ञप्ती चाचणीचे संगणकीकरण ● स्मार्ट कार्ड अनुज्ञप्ती व नोंदणी प्रमाणपत्रे पोस्टाने पाठविणे ● परिवहन संवर्गातील वाहनांना वेग मर्यादा नियंत्रक (स्पीड गव्हर्नर) बसविणे ● मोटार वाहन कराचा भरणा करण्यासाठी ई-पेमेंट योजना ● पथकर नाक्यांचे संगणकीकरण ● एस.टी.साठी ऑनलाईन तिकीट आरक्षणाची सुविधा.

## कृषी विभाग

● शेतकऱ्यांच्या उत्पन्नातील घट लक्षात घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत ● किमान चारा उत्पादन कार्यक्रम ● गाव व तालुकानिहाय रासायनिक खत वापराचे माहितीचे संकलन

● शेतकऱ्यांना गटाच्या माध्यमातून बांधावर खत उपलब्ध ● ऑनलाइन पद्धतीने कृषी निविष्ठा परवाने ● शेतकरी जनता अपघात विमा योजनेंतर्गत प्रकरणांचा गतीने निपटारा ● शेतकऱ्यांना परदेश अभ्यास दौऱ्यांसाठी अनुदान ● सूक्ष्म सिंचन, ठिबक सिंचन दर निश्चितीसाठी जागतिक निविदा ● सूक्ष्म सिंचन संच अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा ● स्वयंचलित हवामान केंद्र ● विदर्भ पॅकेजची प्रभावी अंमलबजावणी

## जलसंधारण विभाग

● खारपाण पट्ट्यासाठी उपसा जलसिंचन योजना

● केंद्र पुरस्कृत एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम

● नाबार्डचा ग्रामीण पायाभूत विकास निधी साहाय्यित पाणलोट विकास कार्यक्रम मेगा पाणलोटाच्या धर्तीवर राबवणार

● शेततळ्यांची योजना अधिक व्यापक. ही योजना महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना निधी तसेच पाणलोटाच्या विविध योजनांच्या निधीतून राबविली.

● पर्जन्यमान जास्त असलेल्या ठिकाणी गॅबियन बंधारे ● महात्मा फुले जल व भूमी अभियानाची अंमलबजावणी.

## पशु- दुग्धसंवर्धन आणि मत्स्यव्यवसाय विकास

● पशुवैद्यकीय दवाखान्यांचे नूतनीकरण व नवीन इमारतींचे बांधकाम ● सहकारी दूध संस्थांचे बळकटीकरण ● कृत्रिम रेतन कार्यक्रम

● मत्स्यव्यवसायासाठी बंदरे व जेट्टीची उभारणी ● पिंजरा पद्धतीने मत्स्य उत्पादन कार्यक्रमाची सुरुवात ● दूध भुकटीवरील निर्यात बंदी उठविली.

(शब्दांकन : सुधा महाजन)

# सांस्कृतिक संवर्धन




✡ महाराष्ट्र भूषण हा महाराष्ट्रातील सर्वोच्च नागरिक सन्मान असल्यामुळे हा पुरस्कार देताना कोणत्याही क्षेत्रात निरपेक्ष वृत्तीने सेवा करणाऱ्या तसेच त्यामुळे मानवी जीवन उंचावण्यासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सर्व क्षेत्रांतील मान्यवरांचा आता विचार करण्यात येणार आहे.

✡ सांस्कृतिक विभागाकडून दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांच्या रकमांत दुप्पट वाढ.

✡ वृद्ध कलावंतांना मानधनाची रक्कम बँकेमार्फत थेट प्रदान करण्याची कारवाई.

✡ स्थानिक कलावंतांना वाव मिळण्यासाठी राज्यात प्रत्येक जिल्ह्यात प्रतिवर्षी सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन.

✡ सांस्कृतिक कार्य संचालनालयाची ३ क्षेत्रीय कार्यालये उघडण्यास मान्यता.

✡ कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्या पुनरुज्जीवनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

✡ नाट्यगृह बांधकाम अनुदान योजनेंतर्गत ३ कोटींवरून ५ कोटी रु. अनुदान देण्याचा निर्णय.

✡ पुराभिलेख कार्यालयातील दुर्मीळ अभिलेख्यांचे संगणकीकरण करून जतन व संवर्धन करणे.

✡ दादासाहेब फाळके चित्रनगरीचा विकास करण्यासाठी मास्टरप्लॅनची (बृहत् आराखाड्याची) प्रक्रिया सुरू.

✡ चित्रपटसृष्टीच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त लघुपट व माहितीपटाच्या महोत्सवाचे आयोजन.

✡ दर्जेदार चित्रपट निर्मितीसाठी अर्थसाहाय्य योजनेंतर्गत पुरस्कारप्राप्त चित्रपटांना अर्थसाहाय्य.

(काशिबाई थोरात)

# लोकसंख्येनुसार नवीन पोलीस ठाणी



सतेज पाटील

राज्यमंत्री

**गृह (शहरे), गृह (ग्रामीण), ग्रामविकास आणि अन्न व औषध प्रशासन या विभागांची श्री. सतेज पाटील यांनी राज्यमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर या विभागांत आमूलाग्र बदल घडवून आणण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.**

## गृह

- पोलीस पाटलांच्या मानधनात प्रतिमाह ८०० वरून प्रतिमाह ३ हजारपर्यंत वाढ.
- पोलीस पाटलांकरिता विमा योजना.
- लोकांमध्ये जागरूकता व वाहतुकी संदर्भात नियमांच्या पालनासाठी दि. १ ते १५ जानेवारी दरम्यान राज्यात रस्ता सुरक्षा पंधरवडा सुरू.
- राज्यातील लोकसंख्या व गुन्ह्यांची संख्या विचारात घेता नवीन पोलीस स्टेशन व चौक्या कार्यान्वित करण्याची मोहीम.

## ग्रामविकास

- पंचायतराज क्षेत्रात उत्कृष्ट काम केल्याबद्दल महाराष्ट्राला देशपातळीवर सलग तीन वर्षे पुरस्कार. गतवर्षी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीसाठी या वर्षी पहिल्या क्रमांकाचा दोन कोटी रुपयांचा पुरस्कार.
- संगणकीकृत ग्रामीण महाराष्ट्र कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी.
- ई-पंचायत कार्यक्रमात महाराष्ट्र देशात पहिला. ५० लाख रुपयांचा विशेष पुरस्कार.
- राज्यातील १७ स्थानिक स्वराज्य संस्थांना देशपातळीवर १ कोटी ३९ लाख रुपयांचे पुरस्कार.
- गावांच्या शाश्वत विकासासाठी पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेची अंमलबजावणी.
- यशवंत पंचायतराज अभियानाचा देशपातळीवर स्वीकार. 'पंचायतराज उत्तरदायित्व आणि प्रोत्साहन योजना' नावाने देशभर अंमलबजावणी.
- स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ई-टेंडरिंग.
- स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय.
- राज्यात राष्ट्रीय जीवनोन्नती अभियानाची अंमलबजावणी.
- कंत्राटी ग्रामसेवकांच्या वेतनात वाढ.

## अन्न व औषधे

राज्यामध्ये ५ ऑगस्ट २०११ पासून अंमलबजावणी.

- स्त्रीभ्रूणहत्या व नशा यासाठी गैरवापर होणाऱ्या औषध विक्रीवर नियंत्रण आणण्याकरिता विशेष मोहीम.
- गुणवत्तापूर्वक दूधपुरवठा होण्याच्या अनुषंगाने दूधभेसळविरोधी अभियान.
- तंबाखुमुक्त शैक्षणिक परिसर अभियान.
- अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत १ लाख ९० हजार परवाने मंजूर. या परवाना फीमुळे २०१२ पर्यंत शासनास ४२ कोटींचा महसूल प्राप्त.

**(शब्दांकन : विकास माळी)**



## आघाडी आणि प्रगती

### व्हर्च्युअल क्लासरूम

राज्यात प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी व्हर्च्युअल क्लासरूम, डिजिटल क्लासरूम, ई-लर्निंग अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे.

### रेशीम उत्पादन वाढीला चालना

आपल्या राज्याचे हवामान हे रेशीम उत्पादनासाठी अनुकूल असून, त्यात ग्रामीण जनतेला नियमित व खात्रीलायकरीत्या उत्पन्न मिळवून देण्याची क्षमता आहे. पुढील ५ वर्षांत तुतीच्या लागवडीखालील क्षेत्रात सध्याच्या २४०० हेक्टरवरून १० हजार हेक्टरपर्यंत वाढ करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे सुमारे १ लाख ३० हजार इतक्या लोकांना नियमित रोजगार मिळेल.

### पीक कर्जाच्या कमाल मर्यादेत वाढ

'डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत 'नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना व्याज सवलतीचा लाभ मिळण्यासाठी पीक कर्जाच्या कमाल मर्यादेत वाढ केली आहे. त्यामुळे आता नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना १ लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज शून्य टक्के व्याज दराने व त्यापुढील ३ लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज केवळ एक टक्का व्याज दराने उपलब्ध झाले आहे.

### राज्य नदी संवर्धन योजना

नद्यांच्या काठी वसलेली शहरे आणि मोठी गावे यांमधून सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्यामुळे होणाऱ्या प्रदूषणापासून नदीच्या पाण्याचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी, शासनाने २०११-१२ या वर्षापासून 'राज्य नदी संवर्धन योजना' सुरू केली आहे. अशी शहरे आणि मोठी गावे यांमधील निर्माण झालेल्या सांडपाण्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावणे आणि त्याद्वारे नदीच्या पाण्याच्या गुणवत्तेत सुधारणा करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

# भारनियमनमुक्तीच्या दिशेने



राजेंद्र मुळक

राज्यमंत्री

ऊर्जा विभागाने गेल्या तीन वर्षांत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. या निर्णयांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात ऊर्जा राज्यमंत्री राजेंद्र मुळक यांचा महत्वाचा सहभाग राहिला. ऊर्जा विभागासोबतच श्री. मुळक हे वित्त, नियोजन, जलसंपदा, संसदीय कार्य आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे राज्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत.

**ऊर्जा विभाग**

राज्याच्या सर्वांगीण विकास ऊर्जानिर्मितीशी निगडित आहे. कृषी, उद्योग, सिंचन, गृहनिर्माण अशा अनेक क्षेत्राच्या विकासाठी ऊर्जेची अत्यंत आवश्यकता आहे.

- डिसेंबर २०१२ अखेर महाराष्ट्र भारनियमनमुक्त होणार.
- वीज वितरणातील तूट १६.०३ टक्क्यांपर्यंत खाली आणण्यात यश.
- कृषीपंपांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा
- गणेशोत्सव, रमजान व अन्य सण उत्सव काळात संपूर्ण राज्य भारनियमन मुक्त
- औद्योगिक क्षेत्रातील भारनियमन पूर्णपणे बंद.

**जलसंपदा विभाग**

- सन २००२ ते २०११ या कालावधीत सिंचनासाठी ४०,२०० कोटींची गुंतवणूक.
- जून २०११ अखेर राज्यस्तरीय प्रकल्पातून ४८.२५ लाख एवढी सिंचन क्षमता.
- सिंचन क्षमतेचा अधिकाधिक वापर होण्याच्या दृष्टीने प्रयत्न.
- केंद्र शासनाच्या वेगवर्धित सिंचन लाभ उपक्रमांतर्गत ३९ मोठे- मध्यम प्रकल्प घटक व १०० लघु पाटबंधारे प्रकल्प पूर्ण.
- कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये यशस्वी लेक टॅपींग.
- पाणी वाटपाच्या प्राधान्यक्रमात बदल.
- सिंचन व्यवस्थापनात शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी १५०८ पाणी वापर संस्थांची स्थापना.

**राज्य उत्पादन शुल्क विभाग**

- बोरीबंदर येथे राज्य उत्पादन शुल्क भवन व अधिकाऱ्यांच्या निवासस्थानासाठी प्रशासकीय इमारत बाधणे प्रस्तावित.
- प्रत्येक जिल्हयात तसेच विभागीय कार्यालय येथे उत्पादन शुल्क भवन बांधणे प्रस्तावित.
- नवीन भरारी पथके स्थापन करणार.

**(शब्दांकन : श्वेता येसाजी)**

# प्रभावी आणि पारदर्शक



राजेंद्र गावित

राज्यमंत्री

आदिवासी विकास, कामगार, पाणलोटक्षेत्र विकास आणि फलोत्पादन या विभागांचा राज्यमंत्री म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर राजेंद्र गावित यांनी या आदिवासी, कामगार आणि शेतकरी यांच्या हिताचे निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी प्रभावी आणि पारदर्शकरित्या व्हावी यासाठी प्राधान्याने लक्ष केंद्रीत केले.

**कामगारांना दिलासा**

- आदिवासी विकासासाठी शिक्षण व प्रशिक्षण.
- विवादग्रस्त कंपन्यांच्या आस्थापना आणि कामगार यांच्याशी चर्चा करून कामगारांच्या समस्या सोडवण्यात यश.
- ठाणे येथील रेमण्ड कारखान्यातील कामगारांना कायदेशीर व स्वेच्छानिवृत्तीपोटी १९४ कोटी रुपये मिळवून दिले.
- सुरक्षा रक्षकांच्या वेतनामध्ये ९०० ते ११०० रुपयांची वाढ.
- व्होरॅक इंजिनीअरिंग चाकण, पुणे कंपनीतील १३ कामगारांचे निलंबन रद्द करण्यात यश.
- कल्याणी हेज लेमर्ज, चाकण या कंपनीतील ७६ कामगारांना ६.५० कोटी इतका आर्थिक लाभ.
- मे. व्हायलाईट लिटाका, पिंपरी या कंपनीतील कामगारांच्या अन्य राज्यात केलेल्या बदल्या रद्द करून ७९ कामगारांना १.३९ कोटी रुपये देण्यात आले.
- मे. बॉस चासिस सिस्टीम प्रा.लि. खेड, पुणे या कंपनीतील कंत्राटी कामगारांना कामावर हजर करून घेण्यात यश.
- थाई सुमित निल टो, चाकण, पुणे या कंपनीतील ७० प्रशिक्षणार्थी कामगारांना सेवेत कायम करण्यात यश.
- मे. व्हिडीओकॉन इंडस्ट्रीज वरोरा हा कारखाना पूर्ववत सुरू करण्यात यश.
- महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाची ऑगस्ट २०११ मध्ये स्थापना. जानेवारी २०१२ पर्यंत ८३ हजार घरेलू कामगारांची नोंदणी. कल्याणकारी योजनांसाठी रु. ६.५० कोटींचा नियतव्यय प्रस्तावित.
- राष्ट्रीय स्वास्थ विमा योजनेअंतर्गत १,३७,८०० लाभार्थ्यांचे दावे मंजूर.
- जनश्री विमा योजना २०११-१२ मध्ये ६,११,७८१ लाभार्थ्यांना संरक्षण.
- बाल कामगार प्रतिबंध नियंत्रण अधिनियमणाच्या अंमलबजावणीसाठी ३ कोटींची तरतूद. बालकामगार प्रथेविरुद्ध जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली.
- अनुसूचित जातीतील बालकामगारांच्या पालकांच्या कौशल्य वाढीसाठी विशेष प्रकल्प.

**फलोत्पादन**

- आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला पिकाची लागवड योजना.
- हवामानावर आधारित पथदर्शक फळपीक विमा योजना.
- राष्ट्रीय बांबू अभियानांतर्गत गेल्या दोन वर्षांत ३४४.९४ हेक्टरवर बांबू लागवड.
- अतिउष्णतेमुळे २०१० मध्ये संत्रा पिकाच्या अपादग्रस्त शेतकऱ्यांना पिकाच्या नुकसानीपोटी १००.७२ कोटींचा निधी.
- २०१० मध्ये अतिउष्णतेमुळे नागपूर - वर्धा व अमरावती या जिल्ह्यातील मोसंबी, लिंबू वर्गीय पिकांच्या बाधित क्षेत्रासाठी हेक्टरी रु. १५ हजार अनुदान.
- कीड आणि रोगाचे योग्य पद्धतीने सर्वे करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर. केंद्राचा राज्य शासनाला २०११-१२ च्या वर्षासाठी ई-गव्हर्नन्ससाठी सुवर्णपदक पुरस्कार

**सूक्ष्मसिंचन**

- राष्ट्रीय सूक्ष्म सिंचन अभियान २०११ पासून अल्प व अत्यल्प भूधारकांना ६० टक्के व बहू भूधाकरांना ५० टक्के दराने अनुदान; रु. ४४८.०३ कोटी अनुदान देऊन १.८९ लाख हेक्टर सिंचनक्षेत्र सिंचनाखाली.

**(शब्दांकन : राहुल भालेराव)**

# विद्यार्थ्यांसाठी १० हजार सौर अभ्यासिका



**वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, विशेष साहाय्य आणि अपारंपरिक ऊर्जा या विभागाने गेल्या तीन वर्षांत अनेक महत्त्वाचे निर्णय घेऊन सर्वसामान्यांना दिलासा दिला आहे. या विभागाचे निर्णय प्रभावीपणे जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यमंत्री डी. पी. सावंत यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.**

**अपारंपरिक ऊर्जा**

अपारंपरिक साधनांमधून विद्युतीकरण करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प १३१ खेड्यापाड्यांमध्ये राबविण्यात आला.

- पवनऊर्जाची क्षमता वाढविण्यासाठी राज्यात २२६ ठिकाणी वारा परिमापन केंद्रांची उभारणी करून अभ्यास करण्यात आला. ४४ ठिकाणे पवनऊर्जा निर्मितीक्षेत्र म्हणून घोषित.
- राज्यात अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात नावीन्यपूर्ण ऊर्जा प्रकल्प राबविण्यास शासनास साहाय्य करण्यासाठी सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क संस्थेशी करार.
- शासकीय, निमशासकीय संस्था/ स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या अखत्यारीतील इमारतींमध्ये ऊर्जा संवर्धनाचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी महाऊर्जामार्फत अर्थसाहाय्य. लघु व मध्यम उद्योगात ऊर्जा संवर्धनासाठी आर्थिक साहाय्य देण्याच्या योजनेस मान्यता.
- भारनियमनाच्या कालावधीत खेडेगावातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होऊ नये यासाठी मागील तीन वर्षांत एकूण १०,७३१ गावांतील सार्वजनिक ठिकाणी सौर अभ्यासिका योजना हाती घेतली आहे.



- २०१५ पर्यंत एकूण वीजनिर्मितीच्या १० टक्के वीजनिर्मिती अपारंपरिक ऊर्जा स्रोतांपासून करण्याचे लक्ष्य आहे.

**उच्च तंत्र शिक्षण**

- राज्यातील विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेला तोंड देता यावे यासाठी उच्च व तंत्र शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा सुधारणे यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. त्यानुसार या विभागाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.
- डॉ. अनिल काकोडकर, डॉ. राम ताकवले व डॉ. अरुण निगवेकर यांच्या अध्यक्षतेखाली समित्या गठित.
- विद्यापीठांची उपकेंद्रे स्थापन करण्यास मान्यता.
- प्रत्येक महाविद्यालयाला नॅक व नॅबचे मानांकन मिळविणे अनिवार्य
- महापालिका क्षेत्रातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी व तिसरी पाळी व उर्वरित अल्पसंख्याकांसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी पाळी सुरू.
- राज्यातील १० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ॲडव्हान्स मॉड्यूकल ट्रेनिंग सुरू.
- विविध परदेशी विद्यापीठांशी सामंजस्य करार.

**वैद्यकीय शिक्षण**

- मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा अंतर्गत समित्या.
- अलिबाग, नंदुरबार, सातारा, मुंबई महानगर येथे १०० विद्यार्थी प्रवेशक्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ५०० रुग्ण खाटांचे संलग्नित रुग्णालय सुरू करण्यास केंद्र शासनाची मान्यता.
- महाराष्ट्र वैद्यकीय संशोधन परिषद स्थापना. परिषदेतर्फे महत्त्वपूर्ण प्रकल्प राबविण्यात येत आहेत. ४० लाख रुपयांचे अनुदान वितरित.
- जे. जे. रुग्णालय परिसरात अतिविशेषोपचार रुग्णालय उभारणार.
- राष्ट्रीय स्तरावर वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमासाठी सामायिक प्रवेश परीक्षेत सामील होण्याचा निर्णय.

## पायाभूत सुविधांचे बळकटीकरण

**(पान ५१ वरून)**

राज्यात मांसाची मागणी ज्या प्रमाणात आहे त्यापेक्षा कितीतरी कमी उत्पादन राज्यात होते. याची दखल घेऊन शेळी गट व कुक्कुट गट वाटपासाठी राष्ट्रीयीकृत बँकांकडून अर्थसाहाय्याची प्रकरणे मंजूर करून घेण्यात आली. ठाणबंद शेळी मेंढी गट वाटप व कुक्कुट पालनासाठी नावीन्यपूर्ण योजना राबविली जात आहे. अत्यल्प, अल्प भूधारक शेतकरी, अनुसूचित जाती-जमाती आणि आर्थिकदृष्ट्या मागास असणाऱ्या घटकांना मागील वर्षी शासनाने ६ दुधाळ जनावरे, १० शेळी व एक बोकडाचे वाटप केले. सर्वसाधारण गटासाठी ५० टक्के तर अनुजाती जमातीसाठी ७५ टक्के अनुदान देण्यात आले. त्यामुळे शेळ्या-मेंढ्यांचे दूध, मांस व लोकर उत्पादनात लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. पायाभूत सेवांमध्ये सुधारणा व बळकटीकरण यामुळे मोठ्या प्रमाणावर दूध उत्पादक, सहकारी संस्था, मच्छीमार, पशुपालक यांना लाभ होत आहे.



**(शब्दांकन : आकाश जगधने)**

# डिसेंबरअखेर भारनियमनमुक्ती




**ऊर्जानिर्मितीत वाढ आणि ऊर्जेची बचत या द्विसूत्रीच्या आधारावर राज्याने भारनियमनमुक्तीबाबत यश मिळवले आहे. विविध माध्यमांतून आजमितीस साडेतेरा हजार मेगावॅट ऊर्जेची निर्मिती केली जाते. राज्याची सध्याची ऊर्जेची गरज ही साधारणपणे १४ ते १५ हजार मेगावॅटच्या दरम्यान आहे. सध्या असलेली १ हजार मेगावॅट विजेची तूट ही अल्पकालीन कराराद्वारे वीजखरेदी करून भरून काढण्यात येते. राज्याची ऊर्जानिर्मिती क्षमता आणि ऊर्जेची एकूण मागणी लक्षात घेतली तर वीज भारनियमनमुक्तीचं लक्ष्य सहजसाध्य झालं आहे.**

ऊर्जासंपन्न महाराष्ट्राच्या दिशेने सुरू असलेली आपली वाटचाल आता अंतिम टप्प्यात पोहोचली असून, डिसेंबरअखेर संपूर्ण राज्य भारनियमनमुक्त झाल्याचे चित्र आपल्याला पाहायला मिळणार आहे.

राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री अजित पवार यांनी ऊर्जा विभागाची सूत्रे स्वीकारतानाच संपूर्ण महाराष्ट्र भारनियमनमुक्त करण्याचा निर्धार जाहीरपणे व्यक्त केला आणि त्यासाठी आवश्यक सर्व पावले उचलली. त्यांनी घेतलेले धडाडीचे निर्णय आणि केलेल्या जाणीवपूर्वक प्रयत्नांमुळे भारनियमनमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न आता साकार होण्याच्या मार्गावर आहे.

केंद्रीय ऊर्जामंत्री वीरप्पा मोईली यांनी नुकतीच महाराष्ट्राला भेट दिली. त्यावेळी त्यांनी इथल्या ऊर्जा प्रकल्पांची तसेच राज्यातील ऊर्जा क्षेत्राच्या सुधारणांची माहिती घेतली. त्यावेळी राज्यात ऊर्जानिर्मिती वाढविण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांची तसेच भारनियमनमुक्त महाराष्ट्रासाठी आपण करीत असलेल्या प्रयत्नांची केंद्रीय ऊर्जामंत्र्यांनी प्रशंसा केली.

ऊर्जा हा विकासाचा मुख्य स्रोत आहे. राज्यातील कृषी, उद्योग, सिंचन, गृहनिर्माण अशा अनेक क्षेत्रांच्या विकासासाठी ऊर्जा ही मूलभूत गरज आहे. राज्याचा विकास हा ऊर्जानिर्मितीशी निगडित आहे. त्यामुळे ऊर्जानिर्मिती वाढविण्यावर गेल्या काही वर्षांत भर देण्यात आला. या सर्व पार्श्वभूमीवर राज्याच्या ऊर्जा विभागाने गेल्या काही वर्षांत केलेली प्रगती अभिमानास्पद आहे.

मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि विद्यमान ऊर्जामंत्री राजेश टोपे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या ऊर्जाक्षेत्राची ही घोडदौड भविष्यात अशीच सुरू राहणार आहे.

नुकत्याच संपलेल्या गणेशोत्सव काळात तसेच त्यापूर्वी रमजानच्या पवित्र महिन्यात रात्रीच्या वेळी संपूर्ण राज्य भारनियमनमुक्त करून आपण आपली क्षमता सिद्ध केली. राज्यात आजमितीस सुमारे १ कोटी ९५ लाख वीजग्राहक आहेत. यापैकी ७०.२३ टक्के घरगुती ग्राहक आहेत. १७.६५ टक्के कृषी ग्राहक, ९.९१ टक्के व्यापारी ग्राहक, १.५६ टक्के औद्योगिक क्षेत्रातील, तर इतर स्वरूपाच्या ग्राहकांची संख्या ०.६५ टक्के आहे.

वीजगळतीचं प्रमाण शून्यावर आणण्याचं ध्येय ठेवून भविष्यातील आपली वाटचाल असली पाहिजे. वीजबिलांची थकबाकी हादेखील काही वर्षांपूर्वीपर्यंत गंभीर मुद्दा होता, परंतु वीजबिलांच्या वसुलीत चांगली वाढ झाली आहे. वर्ष २००६-०७ मध्ये वीजबिलांच्या वसुलीचं प्रमाण हे ९४.०७ टक्के होतं. २००९-१० मध्ये ते ९८.९८ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आपण यशस्वी ठरलो होतो, सध्या हे प्रमाण ९७.२१ टक्के आहे.

## तूट कमी करण्यात यश

**मोठ्या संख्येने ग्राहकांना वीजपुरवठा करीत असताना वीज वितरणातील तूट ही गंभीर समस्या आहे. परंतु गेल्या ६ वर्षांत ही तूट कमी करण्यात यश मिळाले. वर्ष २००६-०७ मध्ये ही तूट २९.६ टक्के होती. ती टप्प्याटप्प्याने कमी करून वर्ष २०११-१२ मध्ये हे प्रमाण १६.०३ टक्क्यांपर्यंत खाली आणण्यात आले.**

### ऊर्जाप्रकल्पांची निर्मिती क्षमता

राज्यातील ऊर्जाप्रकल्पांची एकूण निर्मिती क्षमता आजमितीस २० हजार ४७६ मेगावॅट आहे. भविष्यकाळात स्थापन होणाऱ्या प्रकल्पांमधून ही क्षमता २१ हजार ८५१ मेगावॅटपर्यंत वाढणार आहे. सध्या स्थापित प्रकल्पांची क्षमता विचारात घेता आपल्याला कोळशापासून ६ हजार ९८० मेगावॅट, नैसर्गिक वायूपासून ६७२ मेगावॅट, जलविद्युत प्रकल्पातून २ हजार ३४४ मेगावॅट, रत्नागिरी गॅस (दाभोळ) प्रकल्पातून १ हजार ९४० मेगावॅट, केंद्रीय प्रकल्पांमधून ३ हजार २९० मेगावॅट, पवनऊर्जा आणि कोजनच्या माध्यमातून ३ हजार १५२ मेगावॅट, तसेच अन्य प्रकल्पांमधून १ हजार ८२३ मेगावॅट, अशा पद्धतीने एकूण २० हजार ४७६ मेगावॅट वीज निर्माण करण्याची आजची क्षमता आहे. सध्या काम सुरू असलेल्या प्रकल्पांची उभारणी पूर्ण झाल्यानंतर ही क्षमता २१ हजार ८५१ मेगावॅटपर्यंत वाढणार आहे.


### विजेची गळती आणि चोरी रोखण्यासाठी

वीजनिर्मितीच्या क्षमतेत वाढ करीत असताना, विजेची गळती आणि वीजचोरी रोखण्यासाठीही उपाययोजना करण्यात आल्या आहेत. वीजगळती आणि वीजचोरीच्या प्रमाणात विभाग पाडण्यात आले असून त्यांची अ ते फ तसेच सर्वाधिक गळती असलेल्या विभागांची जी१, जी२ आणि जी ३ अशी वर्गवारी करण्यात आली आहे. सर्वाधिक वीजगळती असलेल्या विभागात अधिक भारनियमन आणि कमी गळती असलेल्या ठिकाणी कमी भारनियमन ही पद्धत अवलंबून वीजगळती रोखण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. ३४ टक्क्यांपर्यंत गळती असलेल्या विभागांना भारनियमनमुक्त ठेवून नागरिकांना दिलासा देण्यात आला आहे.

### औद्योगिक विकासाला गती

औद्योगिक क्षेत्रातील भारनियमन पूर्णपणे थांबविण्यात आल्याने राज्याच्या औद्योगिक विकासाला फार मोठी गती मिळाली आहे. कृषीपंपांनाही रात्री १० तास आणि दिवसा ८ तास वीजपुरवठा करण्यात येत आहे. याचा फायदा निश्चितच शेतकऱ्यांना होतो आहे. या वाढलेल्या ऊर्जानिर्मिती क्षमतेचा योग्य वापर व्हावा तसेच वीजगळतीचे प्रमाण रोखले जावे यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेण्यात येत आहे. त्यासाठी अत्याधुनिक माहिती केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. प्रभागनिहाय ग्राहकांची नोंदणी, वीज देयकांचे संगणकीकरण, ऑनलाईन बील भरण्याची सोय, ऊर्जेचे लेखापरीक्षण आदी सुविधा आणि उपाययोजनांच्या माध्यमातून ग्राहकांना अधिकाधिक चांगली सेवा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. ग्राहकांसाठी विशेष सेवा केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.

**(शब्दांकन: संजय देशमुख)**



# वर्ल्ड क्लास मुंबई

लालबाग उड्डाणपूल

- मुंबई महानगर प्रदेशातील परिवहन व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र शासन, भारतीय रेल्वे व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी एकत्रितरीत्या राबविलेला मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-१ पूर्ण झाला.
- मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-२ मधील कामांची अंदाजित किंमत रुपये ५ हजार ३०० कोटी असून, याकरिता जागतिक बँकेने रुपये १ हजार ९१० कोटींचे कर्जसाहाय्य मंजूर केले आहे. या प्रकल्पाचा ५०:५० टक्के खर्च रेल्वे व राज्य शासन करेल. २०१२-१३ मध्ये रुपये ७१० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी ३५५ कोटी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत खर्च केला जाईल.
- नरिमन पॉइंट ते बोरीवली पश्चिम किनारा जलवाहतूक प्रकल्पांतर्गत पायाभूत सुविधांसाठी रुपये ७५० कोटी खर्च अपेक्षित आहे. हा खर्च राज्य शासन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व शहर औद्योगिक विकास महामंडळ करेल. नेरूळ ते दक्षिण मुंबई व पुढे मांडवा जिल्हा रायगड हा पूर्वकिनारा जलवाहतूक प्रकल्प 'बांधा, वापरा व हस्तांतरित करा' या तत्त्वावर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून राबविण्यात येईल. हे दोन्ही प्रकल्प जून, २०१४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. यामुळे जलद, स्वस्त व पर्यावरणास पूरक प्रवासी सुविधा उपलब्ध होईल.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे (एमएमआरडीए) विविध प्रकल्प राबविण्यात येत आहेत. मेट्रो रेल, मोनो रेल, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, विरारहून अलिबागपर्यंत जाणारा बहुउद्देशीय मार्ग, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (यामध्ये सहार उन्नत मार्ग आणि मिलन रेल्वे ओलांडणी पुलाचाही समावेश आहे.) पूर्व मुक्त मार्ग, जलस्रोत विकास, रस्त्यांचा विकास, घन कचरा व्यवस्थापन आणि ई-कचरा व्यवस्थापन प्रकल्पांचा समावेश आहे.

### मेट्रो रेल प्रकल्प

मुंबई शहरामध्ये १४६ कि.मी. लांबीचे मेट्रो मार्ग उभारण्यात येतील. हा प्रकल्प तीन टप्प्यांमध्ये पूर्ण करण्यात येईल. पाहिल्या टप्प्यामध्ये वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर-चारकोप- वांद्रे-मानखुर्द आणि कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मार्गांचा समावेश आहे. या वर्षाअखेर मेट्रो रेल्वेमार्गाचे बांधकाम पूर्ण करण्याचा प्राधिकरणाचा प्रयत्न राहील.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ हा मेट्रो मार्ग पूर्णपणे भुयारी असावा असा प्राधिकरणाचा प्रस्ताव आहे. हा मेट्रो मार्ग कुलाबा सीप्झ प्रमाणेच स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय विमानतळांनाही जोडण्यात येणार आहे.

### मोनो रेल्वे प्रकल्प

भारताची पाहिली मोनो रेल, चेंबूर ते वडाळा आणि वडाळा ते संत गाडगे महाराज चौक या मार्गावर धावणार आहे. हे २० कि.मी.चे अंतर कापण्यासाठी सध्या जवळपास दोन तास लागतात. मात्र, हाच प्रवास मोनो रेलमुळे ४० मिनिटांत करणे शक्य होईल. हा प्रकल्प दोन टप्प्यांमध्ये पूर्ण करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात चेंबूर ते वडाळा तर दुसऱ्या टप्प्यात वडाळा ते संत गाडगे महाराज चौक हे मार्ग पूर्ण करण्यात येतील. ६०० प्रवासी वाहून नेणारी ही मोनो रेल ४ डब्यांची असेल आणि प्रत्येक ५ मिनिटाला धावेल. मोनो रेल रबरी टायर्सवर धावणार असल्यामुळे आवाजाचे प्रदूषण टळणार आहे. मोनो रेल पर्यावरणप्रेमीही आहे.

पहिल्या टप्प्यावरील मोनो रेल मार्ग पुढील वर्षी सुरू होणे अपेक्षित आहे.




### मुंबई ट्रान्स हार्बर लिंक

या प्रकल्पामुळे शहरामध्ये येण्या-जाणाऱ्यांचा प्रवास सुखकर, कमी खर्चाचा आणि वेळ वाचविणारा ठरेल. २२ कि.मी.चा हा सागरी सेतू शिवडीपासून चिर्ले मार्गे राष्ट्रीय महामार्ग ४ ला जाऊन मिळेल. या प्रकल्पामुळे वाहतुकीच्या समस्या कमी होण्याबरोबरच संपूर्ण रायगड जिल्हा आणि आसपासचा परिसर विकसित होत आहे.

### विरार ते अलिबाग बहुउद्देशीय मार्ग

मुंबई शहरामध्ये जर जागतिक दर्जाची व्यावसायिक केंद्रे उभी राहणार असतील तर मुंबई शहराकडे येणाऱ्यांसाठी सर्वांगीण वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देणेसुद्धा महत्त्वाचे ठरते. म्हणूनच विरारपासून अलिबागपर्यंत १२६ कि.मी. लांबीचा विविधोपयोगी आणि विविध मार्गी रस्ता बांधण्याचे प्राधिकरणाने ठरविले आहे. हे अंतर दोन तासांत कापता येणे शक्य

होईल. विरारपासून सुरू होणारा हा मार्ग भिवंडी, कल्याण, डोंबिवली आणि पनवेल मार्गे अलिबागकडे जाईल. नुकतीच ७९ कि.मी. लांब अशा विरार तो चिरनेरपर्यंतच्या बहुउद्देशीय मार्गासाठी मंजुरी देण्यात आली.

**सहार उन्नत मार्ग**

२ कि.मी. लांबीचा हा उन्नत मार्ग पाश्चिम द्रुतगती महामार्गापासून छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे थेट पोहोचतो. जाण्या-येण्यासाठी प्रत्येकी तीन मार्गिका असणारा हा उन्नत मार्ग २०१३ च्या मध्यास खुला होण्याची अपेक्षा आहे.

**पूर्व मुक्त मार्ग**

हा प्रकल्प दक्षिण मुंबईतून सुरू होत असून पूर्व उपनगरातील घाटकोपरपर्यंत जोडणारा १६.८ कि.मी. अंतराचा आहे. त्यापैकी १३ कि.मी. लांबीचा मार्ग उन्नत असेल. तीन टप्प्यांमध्ये विभागण्यात आलेला हा प्रकल्प एकाच वेळी राबविण्यात येत आहे. या प्रकल्पातील विशेष नोंद घेण्यासारखा टप्पा आणिक-पांजरपोळ जोड रस्ता म्हणावा लागेल. या मार्गावर दोन बोगदे आहेत. हा संपूर्ण प्रकल्प २०१३ च्या मध्यास पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**विस्तारित नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प**

हा प्रकल्प मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाचा पुढचा टप्पा आहे. या २६०० कोटी रुपये किमतीच्या प्रकल्पांतर्गत १७ रस्ते १५ उड्डाणपूल आणि ३ खाडीपूल बांधण्यात येणार आहेत. हे सर्व प्रकल्प मुंबई महानगरामध्ये राबविण्यात येणार आहेत. याच प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेले घोडबंदर रोडवरील वाघबीळ आणि पनवेल शहरातील उड्डाणपूल नुकतेच वाहतुकीसाठी खुले करण्यात आलेले आहेत.

**भाडेतत्त्वावरील घरे योजना**

घरांची समस्या सोडविण्यासाठी प्राधिकरणामार्फत ५ लाख घरे बांधण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या योजनेतील प्रत्येक घराचे क्षेत्रफळ १६० ते ३०० चौ.फू. इतके असेल.

महाराष्ट्रामध्ये किमान १५ किंवा अधिक वर्षे वास्तव्य असणाऱ्या आणि किमान रु. ५,००० प्रतिमहा मिळकत असणाऱ्या व्यक्तीस ही घरे रु. ८०० ते रु. १,५०० प्रतिमहा इतक्या भाड्यावर उपलब्ध होऊ शकतील.

झोपडपट्टी निर्मूलन कार्यक्रमांतर्गत राबविल्या जाणाऱ्या या प्रकल्पास 'अतिमहत्त्वाचा लोकोपयोगी प्रकल्प' असा

# पायाभूत सुविधा प्रकल्प




पश्चिम द्रुतगती महामार्ग

प्राधिकरणातर्फे एकूण १८ रस्त्यांचे काम हाती घेण्यात आले. त्यापैकी १३ रस्त्यांचे काम पूर्ण करून हे रस्ते नोहेंबर २००८ मध्ये मुंबई महानगर पालिकेकडे हस्तांतारित करण्यात आले. पाश्चिम द्रुतगती महामार्ग आणि पूर्व द्रुतगती महामार्गही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सुपूर्द करण्यात आले होते. या रस्त्यांपैकी एलबीएस मार्गावर ५२० कल्वर्टस् बांधलेली आहेत. एकूण १५० कि.मी.चे रस्ते बांधण्यात किंवा विस्तारित करण्यात आले. याच रस्त्यांवर ३१५ कि.मी.ची सांडपाणी वाहून नेणारी व्यवस्था बांधून पूर्ण केली. यापैकी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील पाश्चिम द्रुतगती महामार्ग आणि पूर्व द्रुतगती महामार्ग प्राधिकरणातर्फे विकसीत करण्यात आले. यापूर्वी हे दोन्ही महामार्ग सहा मार्गीकांचे होते. आज मात्र या दोन्ही रस्त्यांवर प्रत्येकी चौदा मार्गीका आहेत.

प्राधिकरणातर्फे जानेवारी २०१२ मध्ये ११ उड्डाणपूल बांधण्याचा कार्यक्रम पूर्ण करण्यात आला. दिंडोशी ठाकूर संकूल, मालाड जंक्शन, सांताक्रुझ विमानतळ, बर्फीवाला जंक्शन, नवघर जंक्शन, सायन हॉस्पिटल, महेश्वरी उद्यान, तुळपुळे चौक, हिंदमाता, भारतमाता, लालबाग आणि सुमननगर येथील ११ उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुले करण्यात आले आहेत.

**मिलन रेल्वे ओलांडणी पूल**

सांताक्रूझच्या मिलन सबवे येथे ७०० मीटर लांबीचा आणि जाण्यायेण्यासाठी प्रत्येकी दोन मार्गिका असणारा रेल्वे ओलांडणी पूल ८२ कोटी रुपये खर्च करून उभारण्यात येत आहे. या पुलामुळे पूर्व-पाश्चिम उपनगरांना जोडणे शक्य होण्याबरोबरच या ठिकाणी दरवर्षी पावसाळ्यात पाणी साचल्यामुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीवर कायमचा उपाय मिळेल. या प्रकल्पाच्या पाश्चिमेकडील पोहोचमार्गाचे ९८ टक्के काम पूर्ण झाले आहे. रेल्वे मार्गावरून जाणाऱ्या स्टील ब्रीजचे काम प्रगतीपाथावर आहे. स्लिपा रोड फूटपाथ आणि सांडपाणी वाहून नेणाऱ्या व्यवस्थेचे पूर्व-पाश्चिमेकडील ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पातील पुनर्वसन आणि पुनर्वसाहतीचे बहुतेक प्रश्न निकालात निघाले असल्यामुळे ओलांडणी पूल पुढील वर्षी मार्च अखेरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.



सांताक्रूझ-विलेपार्ले उड्डाणपूल

दर्जा देण्यात आला आहे.

आजपर्यंत प्राधिकरणाने ४५ प्रस्तावांना मंजुरी दिलेली असून त्यापैकी २० प्रकल्पांना बांधकाम करण्याची परवानगी मिळालेली आहे. यातून सुमारे १ लाख घरे पुढील २ वर्षांत तयार होणे अपेक्षित आहे.

ठाणे येथील वर्तकनगर आणि मानपाडा येथे सुरू असलेल्या प्रकल्पांमधून योजनेसाठी जवळपास ३ हजार घरे लवकरच उपलब्ध होणार आहेत.

**मिठी नदी विकास प्रकल्प**



पाहिल्या टप्प्यामध्ये रुंदीकरण, खोलीकरण आणि खडक खोदाईचे काम पूर्ण करण्यात आले. दुसऱ्या टप्प्यामध्ये रुंदीकरण, खोलीकरण आणि खडक खोदाई प्रमाणेच संरक्षण भिंत आणि सुशोभीकरणाचे कामही घेण्यात आले. उर्वरित काम प्रगतिपथावर आहे. या दरम्यान रुंदीकरण आणि खोलीकरणाची महत्त्वाची कामे पूर्ण झाली आहेत. पुणे येथील संस्थेने केलेल्या सर्वेक्षणामध्ये प्राधिकरणाने टप्पा १ व टप्पा २ ची कामे यशस्वीरीत्या पूर्ण केल्यामुळे मिठी नदीची वहन क्षमता तिपटीने तर धारण क्षमता दुपटीने वाढल्याचे नमूद करण्यात आले आहे. यामुळे समुद्र भरतीचे पाणी मिठी नदीमध्ये येण्याचे प्रमाण वाढले आणि पर्यायाने मिठी नदीच्या पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढले. यामुळे पाण्यातील प्रदूषण कमी झाले. या सर्वांचा एकंदरीत परिणाम म्हणून जलचर प्राणी व वनस्पती वाढीस लागून पर्यावरणामध्ये सुधारणा होईल.

मिठी नदी विकास प्रकल्पाचे काम हाती घेतल्यानंतर गेल्या सहा पावसाळ्यांमध्ये नदीचे उग्र स्वरूप दिसले नाही, यातच मिठी नदी विकास प्रकल्पाचे यश दडलेले आहे.

**जलस्रोत**

पाण्याची वाढत जाणारी गरज भागविण्यासाठी प्राधिकरणातर्फे शाही, काळू आणि पोशिर या नद्यांवर जलस्रोत विकसित करण्याचा प्रकल्प घेण्यात आला आहे. याच अनुषंगाने ३ हजार दशलक्ष इतका पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याचे प्राधिकरणाने नियोजित केले आहे. यासाठी ४ हजार ७०० कोटी रुपयांची तरतूदही करण्यात आली आहे. यामुळे तब्बल ३ हजार दशलक्ष लीटर अतिरिक्त पाणी ठाणे रायगड जिल्हा आणि महानगर प्रदेशासाठी उपलब्ध होऊ शकेल.

सूर्या धरणासाठी प्राधिकरणाने रुपये ९६ कोटी शासनाकडे जमा केले आहेत. या प्रकल्पामुळे ३०३ दशलक्ष इतका अतिरिक्त जलसाठा ठाणे जिल्ह्यातील मीरा-भाईंदर, वसई-विरार, नालासोपारा आणि नवघर-माणिकपूर या प्रदेशाला उपलब्ध होणार आहे.

**घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प**

घन कचऱ्याची विल्हेवाट ही सध्या भेडसावणारी फार मोठी समस्या आहे. परंतु, प्राधिकरणाने घन कचरा व्यवस्थापन विशेष प्रकल्प कक्षाची स्थापना केल्यानंतर पहिल्या टप्प्यामध्ये सामाईक भराव भूमीसाठी सुयोग्य अशा सहा जागा (एकूण ३ हजार हेक्टर)निश्चित केल्या आहेत.

**ई-कचरा व्यवस्थापन प्रकल्प**

प्राधिकरणातर्फे ई-कचरा व्यवस्थापन प्रकल्प माणकोली भिवंडी येथे सार्वजनिक - खाजगी भागीदारी तत्त्वावर राबविण्यात येणार आहे.

## ३५ स्कायवॉक

**अनेकदा रेल्वे प्रवाशांना रेल्वे स्थानकापर्यंत किंवा स्थानकापासून प्रवास करणे मोठे जिकिरीचे होताना दिसते. स्थानकाबाहेरील वाहनांची आणि प्रवाशांची भाऊगर्दी, अतिक्रमणे आणि प्रामुख्याने पावसाळ्यादरम्यान उडणारी प्रावाशांची भंबेरी या साऱ्या समस्या ध्यानात ठेवून निरनिराळ्या रेल्वे स्थानकांजवळ स्कायवॉक उभारण्यात येत आहेत. प्राधिकरणातर्फे मुंबई व महानगर प्रदेशामध्ये एकूण ३५ स्कायवॉक बांधण्यात आले आहेत.**



## आघाडी आणि प्रगती

### मिहानला गती




**या विशेष आर्थिक क्षेत्राचा जलद विकास तसेच अन्य राज्यांच्या तुलनेत गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी मिहानच्या कामाला गती देण्यात आली. दुसऱ्या धावपट्टीचे काम सुरू झाले असून, भूसंपादनासाठी प्रकल्पग्रस्तांना आजपर्यंतचा प्रति एकरी सर्वाधिक मोबदला देण्यात आला. विकासकामांना मूल्यवर्धित कराचा पूर्ण भरणा केल्यानंतर त्याचा कालबद्ध पद्धतीने परतावा देण्यात येत आहे.**

### कामकाजात गतिमानता

- ⇨महानगरपालिकांच्या कामकाजात गतिमानता आणण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सहआयुक्त व सहआयुक्त सुधार हे पद.
- ⇨विविध समित्यांच्या बैठका विहित कालावधीत न घेणाऱ्या महापौर अथवा सभापतींना अनर्ह ठरविण्याची तरतूद.
- ⇨कामकाजास गती देण्यासाठी आयुक्तांनी पाठविलेल्या प्रस्तावावर तो प्राप्त झाल्यापासून महासभेने ९० दिवसांत निर्णय घेणे आवश्यक.
- ⇨महापौर अथवा उपमहापौर यांच्याकडून गैरवर्तन झाल्यास त्यांना पदावरून काढून टाकण्यासारखी कार्यवाही.
- ⇨महानगरपालिकांचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखा कार्यालयामार्फत करण्याचा आणि महानगरपालिकांमध्ये मुख्य लेखापरीक्षक, शासनामार्फत नियुक्ती करण्याचा निर्णय.
- ⇨शासनाच्या अनुभवी व शैक्षणिक अर्हता असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या सेवा महानगरपालिकेस प्रतिनियुक्तीवर उपलब्ध करून देता येतील.



# प्रगती आणि आघाडी

- शेतकऱ्यांना १ लाखापर्यंतचे पीककर्ज बिनव्याजी, एक लाखापासून तीन लाखांचे पीककर्ज १ टक्का व्याजदराने देणार.
- ५१ लाख शेतकऱ्यांना १५ हजार कोटींच्या पीककर्जाचे वाटप
- नागपूर व अमरावती विभागातील सुमारे ४० हजार नझूल मिळकतीबाबतचे धोरण मंजूर
- १०० कोटी वृक्षांची लागवड करणार
- द्राक्ष, डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी, पेरू व काजू या फळपिकांसाठी ३३९ तालुक्यात फळपीक विमा योजना कार्यान्वित, सर्वकष पीक विमा योजनेसाठी पाठपुरावा सुरू
- कृषी विकासासाठी २८४ कोटी, तर कोरडवाहू शेती विकासासाठी २०० कोटींचा अतिरिक्त निधी वितरित
- सिंचनक्षमता वाढविण्यासाठी केंद्राकडे २२०० कोटींचा प्रस्ताव
- ऊर्जानिर्मिती क्षमतेत वाढ, सुयोग्य वीज व्यवस्थापनामुळे भारनियमनमुक्तीकडे वाटचाल
- राज्यात ३२४ मेगा प्रकल्पांना मान्यता, त्यापैकी ७५ टक्के प्रकल्प मागास भागात
- देशातील एकूण थेट परदेशी गुंतवणुकीपैकी ४२ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात
- वस्त्रोद्योग धोरण जाहीर,४० लाख रोजगार उपलब्ध होणार
- आरोग्य यंत्रणेचा बृहद्आराखडा मंजूर,नवीन १२५७ आरोग्यसंस्था स्थापन होणार
- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरू,विविध आजारांवरील ९१७ उपचारांचा समावेश,आतापर्यंत ११ हजार रुग्णांवर उपचार
- गुटखा व पानमसाल्यावर बंदी
- आपत्कालीन परिस्थितीमधील तातडीच्या वैद्यकीय सेवेसाठी ९३७ रुग्णवाहिका उपलब्ध करून देणार
- युवकांच्या आणि क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी स्वतंत्र युवा आणि क्रीडा धोरण
- ई-स्कॉलरशिप योजना सुरू, शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा
- अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी १०० शासकीय वसतिगृहे
- आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या निर्वाहभत्यामध्ये वाढ.
- मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या भाग भांडवलामध्ये ८० कोटी रुपयांची वाढ
- नागपूर येथे हज हाऊसची उभारणी
- मराठी भाषेच्या संवर्धनासाठी स्वतंत्र विभाग
- आधार योजनेंतर्गत फेब्रुवारी २०१२ अखेर ४ कोटी रहिवाशांची नोंदणी, महाराष्ट्र देशात प्रथम
- महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) अधिनियम २०१२ विधेयकास मंजुरी, गृहनिर्माण नियामक आयोगाची स्थापना
- मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे मेट्रो रेले, मोनो रेल, ट्रान्स-हार्बर लिंक, विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्ग, पूर्व मुक्त मार्ग, जलस्रोत विकास आदी पायाभूत सुविधांची निर्मिती
- गिरणी कामगारांना ६ हजार ९२५ सदनिकांच्या वितरणाची कार्यवाही सुरू
- प्रस्तावित मुंबई ट्रान्स-हार्बर लिंक प्रकल्पांतर्गत शिवडी आणि न्हावा-शेवा बंदराला जोडणाऱ्या सहापदरी द्रुतगती मार्गाच्या उभारणीला केंद्राची मंजुरी
- गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये अल्प उत्पन्न गटांसाठी २० टक्के सदनिका राखीव ठेवणे बंधनकारक

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, November 2012.
Date of Publication : 10th of every Month




O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ

लोकराज्य LOKRAJYA

प्रति / To :

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रमोद त्र्यं. नलावडे, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रमोद त्र्यं. नलावडे